# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० ४ माहे जानेवारी सन १८७४ इ० अंक १

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| | ६० |
| [वर्षा]चे अगाऊ | ६ |
| [म]ालभरेर | ७ |
| [क]ुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील. | |
| [व]र्षाचे अगाऊ | १०८ |
| [म]गलेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| [दुस]रे खेपेस | ०२ |

## पाहिजे.

मराठी टाइप जुळण्याचे कामाकडे उमेदवाराची गरज आहे. ज्याची तें काम शिकण्याची इच्छा असेल त्यानें भेटावें. उमेदवार वऱ्हाडी असावा. शिकण्याकरितांही थोडा थोडा पगार दिला जाईल. याच प्रमाणें शिळा प्रेसाकरितां एक लेखक व एक प्रेसम्यान पाहिजे. तें कोठलेही चालतील. पगाराविषयी त्यांनीं कळवावें.

अकोलें तारिख ७ डिसेंबर सन १८७३ इसवी.

लंडेराव बाळाजी क[...]
वऱ्हाडसमाचाराचे माल[क]

## जाहिरात.

सन १८७४ । ७५ सालचा अकोले जिल्ह्याचा अबकारीचा लिलाव मवोन्यास मेहेरबान डिपुटी कमिशनर कचेरींत तारिख २८ माहे ज्यानेवारी सन १८७४ इसवी रोजीं ११ वाजतां सुरू होईल. ज्या[स श]र्ती पाहिजे असल्यास लिलावाचे तारखेपूर्वी ८ दिवस डिपुटी कमिशनर साहेबाचे कचेरींत मिळेल. कळावें तारिख १९ डिसेंबर सन १८७३ इसवी मुकाम अकोट.

विष्णु सखाराम बापट
क्लार्क आफ धि कोर्ट.

J. T. Bushby, Major
Dy. Commitionor
Akola Dist.

## नोटिस.

नोटिस— कुसरीलाल मयत वारस पुत्र अज्ञान पालण करणार राधाबाई व मिसरीलाल कुसरीलाल वल्लद दालचंद रहाणार अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचे तीन दावे दिवाणींत तुम्हावर सुरू आहेत ते आमचे वती फैसल झाल्यावर त्याचे अमलबाजावणींत तुमचा माल सापडू नये या हेतुनें तुम्ही आपली मिळकत वाशिम, अकोले, हिवरखेड वगैरे ठिकाणीं हल्लीं विकत आहा असें मालूम झालें. यास्तव तुम्हास कळविण्यांत येते कीं तुम्ही या कारणानीं आपली मिळकत विकाल तर ती विक्री कायदेशीर व खरेपणाची समजली न जातां वरील कारणानीं विक्री असें समजलें जाईल.

सर्वत्रांस मालूम होण्याकरितां कळवित आहे कीं; सदरील इसम आपली जी मिळकत विकीत आहेत ती आमचे हुकूमनामे खर्चासह सुमारें आठ हजार रुपयांचे त्याजवर होतील त्याचे अमल वारीस माल सापडू नये या इराद्यानीं विकत आहेत यास्तव ती कोणीही खरीदी किंवा गहाण वगैरे घेऊं नये घेतली असतां वरील सबबीमुळें ही विक्री किंवा गहाण कागदाचे ठरून रद्द होईल. कळावें तारिख २७ माहे डिसेंबर सन १८७३ इसवी.

(सही) पिस्तमजी पार्शी.

## फौजदारी कामांतलि भत्त्याविषयीं नियम.

मुलुख ममानी हैद्राबाद येथील फौजदारी कोर्टांत चालणारे मुकदम्यांत सरकारांतून साक्षीदारांचा व फिर्याद करणाराचा खर्च देण्याविषयीं फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींचे कायद्यांतील कलम ४२१ प्रमाणें गवरनर जनरल यांणीं खालील नियम पसार करून मंजूर [के]ले आहेत.—

[...] [फौजदारी कामां]तील मुकदम्यांत साक्षीदाराचा अगर [फिर्या]दी करणाराचा खर्च देण्याविषयीं फौजदारी कोर्टास अखत्यार आहे;

१. ज्या मुकदम्यांत फिर्यादीचें काम सरकारानें अगर कोणत्याही न्यायाधिशानें, माजिस्त्रेटानें अगर दुसऱ्या कोणत्याही सरकारी अमलदारानें सुरूं केलें असेल अगर चालविलें असेल, अगर सरकारचे अगर कोणत्याही न्यायाधिशाचे, माजिस्त्रेटाचे, अगर दुसऱ्या कोणत्याही सरकारी अमलदाराचे हुकुमावरून किंवा मंजुरातीवरून सुरूं केलें असेल किंवा चालविलें असेल; अथवा ज्या मुकदम्यांत वरिष्ठ अमलदारास दिसेल कीं, सदर्हू मुकदमा शुरू केल्यापासून अगर चालविल्यापासून सरकारी कामाचें प्रत्यक्ष हित आहे;

२. फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयीं कायद्यास जोडलेले परिशिष्टाचे पाचवें कोष्टकांत जामीन घेण्यासारखे नाहींत असें ह्मटलेले जे मुकदमे आहेत त्या सर्वांत;

३. पोलिसाचे अधिकारांतील जे मुकदमे आहेत त्या सर्वांत; आणि

४. सदर्हू कायद्याचें कलम ३९१ अन्वये माजिस्त्रेटानें आपण होऊन साक्षीदारास हजर होणें भाग पाडलें असेल त्या सर्व मुकदम्यांत.

——

२. साक्ष देण्याकरितां फौजदारी कोर्टांतून ज्या युरोपियन अगर ईस्ट [...] यनास समन्स झालें असेल त्यास वास्तवीक वाटचालीचा जो खर्च झाला असेल तो द्यावा परंतु हा खर्च दर मैलास सहा आण्यांहून ज्यास्त दिला जाऊं नये. याशिवाय साक्षीदार यांणीं मागितल्यास दर रोजं अडीच रुपयांहून अधिक नाहीं इतका पोटगीभत्ताही त्यास द्यावा.

३. मध्यम प्रतीचे नेटिव ह्मणजे एतद्देशीय लोक जसे, पाटिल, पांढरपेशे*, व्यापारी, वकील व यादरज्याचे इतर लोक यांस व याशिवाय इतर लोक कीं ज्यांचा मुकदम्यांत बिलकुल संबंध नसता केवळ न्यायाकरितां त्यांची साक्ष घेणें जरूर दिसले (उदाहरण — जबान्यावरील [...] लिहितां वाचतां येत [...] [साक्ष]ीदार) त्यांस साक्ष दे[ण्याकरितां बोलावि]ले गेले असतां पोटगीभत्ता [...] [स]ाधारण नियम असा ठेवावा कीं प्रत्येकास दर रोज सहा आणे प्रमाणें पोटगीभत्ता द्यावा. व त्याशिवाय त्यांजला आगगाडीचा व इतर वाटचालीचा जो दुसरा वास्तवीक खर्च झाला असेल तोही योग्य असल्यास द्यावा असा सर्व साधारण नियम ठेवावा.

४. शेतकरी व हलके नोकर जे व[...] घर सोडून बाहेर गेले असतां [...]करितां विशेष खर्च करीत [...]ला दर रोजचा पोटगीभत्ता [...] प्रमाणें द्यावा व त्यांजला आ[गगाडीचा व इतर] वास्तवीक झालेला खर्चही योग्य असल्यास द्यावा.

५. (नियम ४ व ५ यांत न येणाऱ्या प्रसंगीं) ज्या कोर्टाला पोटगीभत्ता किंवा वाट चालण्याचा खर्च मागितला असेल त्याणें आपले विचारानें व त्या साक्षीच्या दरज्याच्या अनुरोधानें भत्ता अगर वाट चालण्याचा खर्च देत जावा.

६. ज्या कोर्टापुढें साक्ष होण्याची ते कोर्ट ज्या ठिकाणीं आहे त्याच गावांत साक्षीदार रहात असला तर कोर्टानें त्या साक्षीला दर रोज चार आण्यांहून ज्यास्त नाहीं या हिशोबानें कोर्टांत हजर झाल्यामुळें जे त्याचें नुकसान झालें असेल त्याबद्दल पैसा द्यावा.

डिपुटी कमिशनर हविस
जि० अकोले तारिख २४
माहे डिसेंबर सन १८७३
इसवी मुक्काम अकोलें.

True Translation
V. S. Bapat
Clerk of Court

* पांडे, कुळकर्णी, मोहरीर वगैरे.

## पत्रव्यवहार

[...]

## बाळाजी लक्ष्मण ओक हे खानदेशास सोडून जाणार.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

पिंपळनेर बालबोधिनी सभेकडून :— महाराज, वरील गृहस्थ खानदेशांत नसिराबाद तालुक्यांत भोकर ह्मणून गाव आहे तेथें पुष्कळ दिवसांपासून वडिलोपार्जित रहात आहेत.. हे कोकणांतील रहाणार परंतु व्यापाराच्या संबधानें भोकर या गावी येऊन राहिले आहेत. मला यांची पूर्वींची फारशी माहिती नाहीं परंतु हे खानदेशांत प्रख्यात असल्यामुळें थोडीशी यांच्या नोकरीची माहिती लागली आहे ती अशी— हे प्रथमारंभीं नसिराबाद मामलेदार कचेरींत १२ रुपयांचे कारकून सन १८५१ त होऊन पुढें लागलींच त्यांच्या हुशारीमुळें ते वाढत गेले. पुढें सन १८६९ च्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस हे मोरनार येथें २५ रुपयांवर महाल कचेरींत मुख्य कारकून असतां खानदेशचे सेकंड असिस्टंट कलेक्टर यांचे ४० रुपये दरमहाचे सिरस्तेदार झाले. नंतर खानदेशच्या फर्स्ट असिस्टंट कलेक्टराचे हे सन १८७० च्या आक्टोबरच्या १९ व्या तारखेस ५० रुपयांचे सिरस्तेदार होऊन पुढें याच सालीं जानेवारीच्या २६ व्या तारखेस पिंपळनेरास मुख्य कारकुनाच्या [...]

कोणास थोडासा अधिकार अथवा सपन्ना मिळाली ह्मणजे जरी ते पहिल्यानें गरीब असतात तरी ती गरिबी विसरून जाऊन आणि पूर्वींच्या मित्रांची ओळख सोडून जसे काय आपण असलेल्या स्थितींत सार्वभौमत्वच पावलों असें त्यांस वाटतें. सदासर्वदा गर्वानें ते ताठलेले असतात हीं उदाहरणें प्रत्यक्ष पहाणें झाल्यास रेल्वे स्टेशनावरील नोकराचीं पहावीं. सीतेच्या विवाहसमयीं कवीनें जसें राजांचीं पागोटीं, जोडे, गंध, इत्यादिकांचें वर्णन केलें आहे तीं साक्षात् रेल्वेवर दृष्टीस पडतात. तसाच एखादा हलक्या मनाचा पुरुष असून त्याचे हातीं थोडासा अधिकार अथवा सरकारची त्यावर बहाल मर्जी झाली कीं, दुसरा तो सरकारच बनावयास पहातो. अशा पुरुषाचे हातीं थोडासा न्यायाचा तशांत फौजदारी संबंधी अधिकार मिळाल्यास रयत किती सुखी असेल याचें अनुमान सहज करतां येईल.

आजपर्यंत जे जे खानदेशांत उत्तम कामगार झाले त्या पैकींच आमचे रा. बाळाजी लक्ष्मण उर्फ भाऊ साहेब ओक हे होत. सदरच्या जागेपासून १२ रुपयांपासून आज ६० पर्यंत जरी वाढले तरी [...] अभिमानाचा स्वीकार केला नाहीं [...] [ग]रीबांकडे [ल]ोकांवर नजर ठेवणारे [...] [...] हे सदोदीत [...] [...] असें नाहीं परंतु [...] [...]प्रमाणें [...]

समाजांत त्यांच्या सारखेच. वृद्धसमाजांत वृद्धही. याप्रमाणें वर्तन करणारे असून शुद्धाचरणानें वर्तणारे असे आहेत. इंग्लिश राज्यांत त्यांचें राज्य झाल्यापासून जे लोक सुधारले ह्मणून ह्मणतात तसे अल्पवयी असून जरी हे आतांचे नोकर आहेत तरी हे नव्या रीतीप्रमाणें सुधारलेले नाहींत. यांच्यांतें मनुष्यांस जे सद्गुण असावे ते असल्यामुळें आनंद होतो.

भाऊ साहेब काय करावें! एखाद्याची तोंडावर स्तुती करणें फारच हलकेपणाचे काम आहे परंतु आज ह्या आपण निमित्त भरलेल्या समाजांत मीच मला "हलकी" ही संज्ञा घेऊन खरेखरें वर्णन करितों याची माफी कराल ही पूर्ण आशा वाळगतों. खरें वर्णन करण्यास काय बाध आहे? मी भाऊसाहेबांस फार वेळ पाहिलें नाहीं. वरणगांवीं मात्र एकदां पाहिलें आहे. तेव्हांच्या आणि आतांच्या वर्तनांत कांहींच फेर पडला नाहीं हें पाहून फारच आनंद होतो. आज ४ | ५ महिने तर मी पूर्ण अनुभव घेत आहे. तेव्हां यांचे सद्गुण असेच वृद्धींगत होवोत ही परमेशास प्रार्थना आहे. आज एक वर्ष झालें नाहीं तोंच पिंपळनेरस्थवासी जनांस आणि आपल्या खानदेशवासी मित्रजनांस आपण सोडून परजिल्ह्यांत मोठ्या हुद्यावर आणि वढतीच्या पगारावर जातां यामुळें आनंद होऊन पुन्हा आपण आह्मास सोडून जातां याबद्दल दुःख होतें. आनंद आणि दुःख यामुळें जी काय स्थिति झाली आहे ती सांगतां येत नाहीं.

हवेचा तालुका ह्मणून तर आपण आह्मास सोडून जात नाहींना! किस्येक मित्रे नौकर लोक सरकारानें त्यांची बदली पिंपळनेरास करण्याचे मनीं आणिलें [illegible] याचावर थारण बसते. परंतु आजवर त्यांस आपला सुसमागम असल्यानें हवेच्या तालुक्याचें कांहींच दुःख समजलें नाहीं. परंतु आज आपण चांगल्या हवेंत चिटणिसाच्या कामीं बढतीवर जातां यामुळे आह्मीही आमचे दुःखाचे उग्दार आटोपून आपल्यास योग्यतेनुरूप सरकारानें योग्य नेमणूक दिली याचा दुःखाच्या सहखपट आनंद मानितो. सन १८२४ सालीं फेब्रुआरी महिन्याच्या पहिल्या तारखेस आपली नेमणूक नसिराबादेहून येथें बढतीवर १४ रुपयांवर झाली. यामुळें आपण हा हवेचा तालुका पूर्वीही पाहून हल्लीं येथें दुसऱ्यानें अव्वल कारकुनाच्या जागीं येऊन येथूनच पूर्वीं प्रमाणें बढतीवर नासिकास जाता तर आतां अधिकाऱ्याच्या मर्जीनुरूप आणि इमानानें सरकारी कामास झटून पुन्हा "पहिला बिजा आणि तिजा" याप्रमाणें तिसऱ्यानें खानदेशांतील मित्रांच्या दुःखपरिहारार्थ पिंपळनेरासच मामलेदार होऊन या ह्मणजे झालें.

परमेश्वर सत्याचा स्वीकार करणार आहे तो आमच्या हेतुप्रमाणें भाऊसाहेब लोक यांस पुन्हा तिसऱ्यानें पिंपळनेरास मामलेदारीच्या जागेवर आणील यांत संशय नाहीं.

आणखी परमेश्वराजवळ प्रार्थना हीच [illegible] आजपर्यंत जशी [illegible] करून वाढविलें [illegible] [illegible] करावें.

[illegible]

भाऊसाहेब, २० | २२ वर्षांत जसा खानदेशवासी जनांवर लोभ ठेविला आणि आज ५ महिन्यांत विशेष ठेविला त्याप्रमाणें च पुढें उत्तरोत्तर वृद्धींगत कराल ह्याआशेनेंही शेवटील विनवणी करून फारही माया याविशांत पडणें कठीण ह्मणून पुरे करितों. तारीख २३ माहे नोवेंबर सन १८७३ इसवी.

एक सभासद.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. आपली व माझी ओळख नाहीं तरी आपल्या या कीर्तिविरून चार ओळी लिहिल्या आहेत, त्या येते अंकांत छापून प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

हल्लीं या वणी तालुक्यांत मौजे पिंपळखुटी येथें तारिख २४ माहे डिसेंबर सन १८७३ इसवी रोजीं एक स्त्री प्रसूत होऊन तिला एक मुलगा झाला तो असा कीं, त्याचें डोकें सरासरी पांच वर्षांचे मुलाच्या डोक्या एवढें असून त्याचे हातपाय फार बारिक होते व त्याचे नेत्र [illegible]दी कपाळाच्या वरतीं असून त्याला पुरुषाची किंवा स्त्रीची खूण कांहीं एक नव्हती अशी चमत्कारीक गोष्ट आह्मी दृष्टीनें पाहिली आहे जर ही गोष्ट आपले येते अंकांत कृपा करून प्रसिद्ध कराल तर फार मेहेरबानी होईल. त्याचप्रमाणें येथें एक कोंबडी व्याली तिला चार अंडी होऊन तीं कांहीं दिवसांनीं फुटलीं त्यामध्यें एके पिलास चार पाय होते हेंही आह्मी पाहिले होते. याकरितां ह्या दोन्ही गोष्टी छापून प्रसिद्ध कराल अशी आशा आहे. कळावें तारिख २८ माहे डिसेंबर सन १८७३ इसवी.

एक [illegible]

## नोटिसा.

नोटिस —नारायण वल्लद रामाजी जवंजाळ रहाणार सांगळुद तालुके अकोले यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी आह्मापासून कर्ज घेतलेले रुपये मुद्दल ५७१ व त्याचें व्याज रुपये २५१॥≡ येकून रुपये ८२२॥≡ येणें असून तुह्मी अद्याप पर्यंत आणून दिले नाहींत. व तुह्माकडे आम्ही दोन चार वेळ मागण्यास पाठविला असतां तुह्मी देऊ दिलाऊ करीत गेलां परंतु तुह्मी आमचे रुपयांची व्यवस्था केली नाहीं. करितां तुह्मास ही नोटिस दिली आहे. तर नोटिस पोंचल्यापासून पंधरा दिवसांचे आंत आमचे येथें मुद्दल, व्याज व ह्या नोटिशीचे खर्चासुध्दांही आणून द्यावे नाहीं तर तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून भरून घेतले जातील हे खूप समजावें, कळावे तारिख १ माहे जानेवारी सन १८७४ इसवी.

(सही) नारायण वल्लद गिरमाजी काकड वस्ती सांगळुद दस्तुर खुद.

---

नोटिस—शिदाजी वल्लद उकर्डा ढोले रहाणार घोतर्डी तालुके अकोले यास [illegible] सही करणार याजकडून नोटिस [illegible] कीं तुह्मी आह्मापासून [illegible] [illegible] मुद्दल रुपये २११ व त्याचें व्याज [illegible]

व रुपये १२३८— येकूण ३३४८— तीन शें चवतीस रुपये एक आणा येणें असून तुह्मी अद्यापपर्यंत आणून दिले नाहींत. व तुह्माकडे दोन चार वेळा मागण्यास पाठविले असतां तुह्मी देऊ दिलाऊ करीत गेला परंतु तुह्मी आमचे रुपयांची कांहींच व्यवस्था केली नाहीं. ह्मणून तुह्मास ही नोटिस दिली आहे तर ही नोटिस पोंचल्यापासून पंधरा दिवसांचे आंत आमचे घरीं मुद्दल, व्याज व या नोटिशीचे खर्चासुध्दां आणून द्यावे नाहीं तर तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून भरून घेतले जातील हें खूप समजावें. कळावे तारिख १ माहे जानेवारी सन १८७४ इसवी.

[सही] नारायण वल्लद गिरमाजी काकड वस्ती सांगळुद दस्तुर खुद.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती पौष वद्य २ शके १७९६.

## वाशिम एथील मि० अबदुल हक कर्नाळकर यांजवरील प्रसंग.

[illegible] कमिशनर मि० अबदुल हक साहेब कर्नाळकर पीरजादे यांस एका शिपायानें मारण्याचा प्रयत्न केला असें मोघम वर्तमान गेल्या अंकांत आम्ही प्रसिद्ध केलें होतें. त्याविषयीं आतां आह्मास सविस्तर हकीकत समजली आहे तिजवरून आम्ही आपले वाचकांस तात्पर्यार्थ कळवितो तो असाः—

गेल्या महिन्याचे २१ वे तारखेस ह्मणजे रविवारीं सकाळीं मि० अबदुल हक साहेब आपले तंबूतून गावांत लायब्ररीमध्यें सभा होती ह्मणून तिकडे गेले होते, व त्या वेळीं तालुक्ययांतील शिपायी त्याचे दिमतीस असलेला कालेखान नावाचा हिंदुस्थानी मुसलमान नित्याप्रमाणें त्यांच्या बरोबर होता. शिपायी मजकूर याणें अबदुल हक यांजला पूर्वे दिवशीं संध्याकाळीं जरूरीचे कामाकरितां ८ दिवसांची रजा मागितली होती; व त्यांणीं साल अखेर कामाची गडबड आहे ह्मणून तूर्त रजा देतां येत नाहीं असें त्यास सांगितलें होत. पुढें दुसरे दिवशीं ह्मणजे रविवारीं सकाळीं ११ वाजतां वर सांगितल्याप्रमाणें अबदुल हक हे लायब्ररींतून वाहनावाचून पायानें परत येत असतां वाळूजीचे तळ्याचे पलीकडेस गेल्यावर बरोबरचा शिपायी कालेखान हा थोडासा शब्द चढवून त्यास ह्मणाला कीं, "मेरे रजेकी क्या तजवीज है? रजा देते या नहीं?" तेव्हां अबदुल हक ह्मणाले कीं, रजा देण्यास सवड नाहीं असें कालच सांगितलें आहे त्याचें आता काय? असे शब्द ऐकतांच कालेखान कोषांतून चढून त्याचें हातांत एक सोठा मोठा होता तो त्यानें दोन्ही हात उगारून त्यांस उभा मारिला. अबदुल हक यांणीं मोठ्या सावधगिरीनें हात पुढें करून त्या सोट्याचा रट्टा आपले हातावर घेतला, नाहींपेक्षां कपाळावर मार बसता तर कपाळमोक्ष झाला असता. नंतर दुसरे हातानें अबदुल हक यांणी त्या सोट्याला हिसका दिला त्याबरोबर झोंक जाऊन तो कालेखान शिपाई मागें पडला तेव्हां आपले बच्यावाकरितां मदतीस जवळच लोक येईपर्यंत अबदुल हक यांणीं त्याचे छातीवर पाय देऊन त्यास पडला ठेविला होता, नंतर त्यास पोलिसाचे स्वाधीन केला व थर्ड क्लास माजिस्ट्रेट यांपुढें त्याची चौकशी होऊन अखेर निकालाकरितां क्या० फिटझरल्ड साहेब स्वारींतून परत येई तोंपर्यंत मुकदमा तकून राहिला आहे. व तोंपर्यंत आह्मास याहून अधिक कांहीं लिहितां येत नाहीं. मागें रा. रा. रामराव गोविंद एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांवर वाशिमासच एका शिपायानें गोळी भरून बंदुक झाडली होती व त्यापूर्वी वाशिमचेच बाळमुकुंद जियालाल जहागिरदार याचे घरांतील किस्येक मनुष्यांवर एका शिपायानें तलवारीचे वार केले होते व त्यापुढें हें तिसरें उदाहरण वाशिमास आहे. यावरून तेथें मोठा दहशतीसारखा प्रकार आहे असें आह्मास वाटतें, सरकारी कामदार आपले अधिकारावर एकाकी असतां शिपायी लोक जिवावर उदार होऊन असे प्रकार करतील तर कामदारांचा बचाव कसा [illegible] अधिकाऱ्यांनी विचार करून कामदाराच्या निर्धास्तपणाविषयीं कांहीं तजवीज करावी.

आणखी आह्मास असें समजलें आहे कीं, क्या० फिटझरल्ड साहेब यांचा मुक्काम पुसद येथे आहे व त्यांणीं सदर्हू शिपाई याजपासून दोन दोन शें रुपयांचे दोन जामीन घेऊन त्यास मोकळा करावा असा हुकूम पाठविला आहे व शिपायानें दोन जामीन गुदरले आहेत.

आह्मास या बाबतींत दोन तीन पत्रें वेगवेगळ्या प्रकारचीं आलीं आहेत त्यांतून भरवसा ठेवण्यासारखा प्रकार आह्मास जेवढा दिसला तेवढा घेऊन आम्ही सदरील मजकूर लिहिला आहे, आमचे एक नूतन थोर मित्र आह्मास हा मुकद्दमा फैसल झाला म्हणजे कच्ची हकीकत कळविणार आहेत. त्याप्रमाणें ती आल्यावर आह्मी आपले वाचकांस अगत्य कळवूं.

---

## मुबईची खानेसुमारी,

तारिख २१ फेब्रुवारी सन १८७२ इसवी रोजीं मुंबई शहराची खानेसुमारी झाली. तिजबद्दल डा. ब्रुलेट साहेबांनीं रिपोर्ट लिहिला आहे त्यावरून नेटिवओपिनीयन पत्रांत माहिती दिली आहे ती अशीः——

या खानेसुमारीच्या खर्चाकरितां म्युनिसिपाल कमिटीनें १२००० रुपये खर्च दिला. एका रात्रीं सर्व मोजणी केली. मोज

णीदार ६८९ होते व त्यांनां मदतीस ७९० दिले होते. एकंदर मनुष्य संख्या ६४४४०५ भरली. सन १८६४ साली ८१६५६२ मनुष्ये होतीं. त्या वेळीं शेर बाजार व कापूस यांची तेजी होती त्यामुळें अनेक तऱ्हेचे व्यापार, कंपन्या, व कामें निघाल्यामुळें बाहेरचे बहुत लोक येथें आले होते. ते मुंबई शहरावर दुर्दैवाचे चक्र फिरल्या मुळें आपआपले जागीं परत गेले. कलकत्याची वस्ती ४४७६०० व मद्रासची ३९७५५२ आहे यावरून साऱ्या हिंदुस्थानांत मुंबई शहरची वस्ती अधिक आहे; एवढेंच नाहीं, पण साऱ्या पृथ्वींत इंग्रज सरकारचे राज्यांत लंडन शहर खेरिज करून मुंबई एवढें मोठें लोकवस्तीचें दुसरें शहर नाहीं असें दिसतें.

मुंबईंत ब्राह्मण २९७१७, जैन १९१२१, भाटे ९४६६, इतर हिंदु ३४०८६८, लोकपास्ट ३११४७, मुसलमान १३८६४४, पार्शी ४४०९१, नेटिव ख्रिस्ती २९११९, व युरोपियन ७२९३, आहेत.

मुंबई शहरात हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणचे व हिंदुस्थाना बाहेरील लांबलांबच्या देशांतील लोक, त्यांचे पेहराव, व थोड्या बहूत रीतिभाती दृष्टीस पडतात, लंडन व पारिस हीं शहरें मुंबईच्या चौपट आहेत पण त्यांत देखील मुंबई सारखे अनेक पकारचे लोक नाहींत. हे शहर हिंदुस्थानच्या व्यापाराचें नाके असून एशिया खंडाच्या सरासरी मध्यभागीं असल्यामुळें व येथून आफ्रिका आणि युरोपखंड इतर ठिकाणच्यापेक्षां जवळ असल्यामुळें व्यापार निमित्तानें देशोदेशचे लोक मुंबईस येतात. प्रस्तुत किती ठिकाणचे लोक मुंबईत आहेत यांचे टिपण असें:—मुंबईबेटचे २००६१३ ठाण्या कडील ४५७७०, रत्नागिरीकिडील ९६८७९, कानडे २७२४, बेळगावचे ३१२९, भडोच १६९५, धारवाड ८४७ सोलापूर ५८६१, सातारा २२५९३. पुणें ५५२९३, नाशिक ८४६०, नगर ६८३०, अमदाबाद ३४२३, खानदेशी ४५२१, खेडा १०४१ सुरत ३४१६२, बडोदें ३५९५, गुजराथ ३०६४८, काठेवाड १३१७९, कच्छ ३३१३३, सिंध ४११४, कोल्हापूर २८८६. मालवण १४०६८, अफगाणिस्थान ९६३, अरबस्थान १४४०, आफ्रिका, अबिसिनिया, इजिप्त, झांजीबार १२७५, अमेरिका, ८७ बंगाल २४६८, बलुचिस्थान ५६, ब्रह्मदेश ६५, कोचिन ६०१, काश्मीर २२१ चीन ३२५, बिलायत ( युनाइटेड किंगडम ) ३७३५, युरोपांतील इतर देशचे १२१५, गोवा, दमण, दिव १८५५५, निजाम हैद्राबाद ९७२५, उत्तर हिंदुस्थान १५७७२, मलबार १९९४, म्हैसूर ४३४, मद्रास २४१६, माळवा २७७९, म्यानिला १०५, अयोध्या १६६३, पंजाब १९५१, इराण २६०३, रजपूतस्थान २६८२, सिंगापूर १४०, त्रावणकोर२९, तुर्कस्थान १२५, व इतर ठिकाणचे लोक १४९६१, आहेत.

मुंबईंत स्त्रिया एकंदर १९९७१६, व पुरुष एकंदर ३४४६८९ आहेत. यांत पुरुषा पेक्षां बायका सुमार दिड लक्ष कमी आहेत. व इतर ठिकाणीं स्त्रिया व पुरुष यांच्या मोजदादीचें मान साधारण सारखें असतें तेव्हां यावरून असें दिसते कीं, मुंबईस रोजगारा निमित्त बाहेरच बहुत पुरुष सडे आलेले असतात त्यामुळें हा इतका फरक आहे.

मुंबईंत पावसाळयांत लोक इतर ऋतूपेक्षां कमी असतात. कारण पावसाळा संपल्यावर धंद्याला तेजी येते तेव्हा बाहेरचे लोक मुंबईस येतात व उन्हाळयाचे अखेरीस परत जतात.

## वऱ्हाड

अडगांवचे ए. अ. क. रा. रा. श्रीकृष्ण नरहर यांची बदली इलिचपुरास व इलिचपुरचे ए. अ. क. रा. रा. पुरुषोत्तम नारायण यांची बदली आडगांवास झाली; व याचप्रमाणें कारंजाचे ए. अ. क. रा. रा. बापुजी रंगनाथ यांची बदली मलकापुरास व मलकापुरचे अ. क. मि० ताजूदीन साहेब यांची बदली कारंजास झाली.

—000—

मे० डायरेक्टर साहेब पुढील आठवड्यांत उमरावतीकडे जाणार आहेत.

—000—

रा. रा. वामनराव प्रभाकर येथील नार्मल स्कूलचे प्रिन्सिपाल यांनीं दोन महिन्याची रजा घेतली व ह्यांचे जागेवर मि० महमद इस्मायल त्याच स्कुलांतील हिंदुस्थानी मास्तर यांस तूर्त नेमिलें.

—000—

वाशिम—(मित्राकडून) तारीख १ जानेवारी सन १८७४— क्या० फिटझरल्ड साहेब येथील डेपुटी कमिशनर पुसद तालुक्यांत आहेत. ५वे तारखेस येथें येतील.

मि० आत्माराम भिकाजी एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांची प्रकृती सुधारत नाहीं. दिवसांतून एक वेळ फेफ्प्या सारखे त्यांस कांहीं मिनिटें फिट येते त्यांनीं आजारीपणाची रजा मागितली आहे व ती मिळेपर्यंत ते येथें घरीं बसूनच खजिन्या संबंधीं कागदपत्र पाहून त्यावर सह्या करण्याचे काम करित असतात.

मि० अबदुलहक्क यांस काळेखान शिपायी यानें मारण्याचा यत्न केला पण सुदैवापासून त्यांस कांहीं इजा झाली नाहीं ते सुखरूप आहेत व शिपायी यावर मुकद्दमा चालू आहे. त्यांच्या व मि० आत्माराम भिकाजी यांच्या बदल्याच्या गडबडींत दिवाणी मुकदमे सुमार १५० चाळढकलीवर पडून राहिले होते पण गेल्या आठदहा दिवसांत अबदुल हक्क यांनीं फार मेहनत घेऊन ८०।९० मुकदम्याचे फैसल केले असें समजतें.

येथील नाझर रा. बाळकृष्ण श्रीधर यांचे कित्येक कामकाजाचे संबंधानें एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांनीं डिपुटी कमिशनर साहेबांकडे त्यांविरुद्ध कांहीं रिपोर्ट केला आहे.

येथील श्री बालाजी देवस्थानाचे मालक त्रिवर्ग गृहस्थ आहेत त्यांजमध्यें हक्क संबंधानें दिवाणींत वाद लागलेला आहे व अव्वल कोर्टाचा फैसल ही झाला आहे त्याची हकीकत पुढील खेपेस लिहूं आलीकडे रा. राजेश्वरराव अंबादास यांनीं देवस्थानची व्यवस्था अगदीं बिघडून टाकून संस्थानास दहा बारा हजार रुपये कर्जही केले होते त्यावरून त्यांनकडून काम काढून त्यांस घरीं बसविलें आहे. व रा. बाळाजी नाईक दंडे यांस आलीकडे त्याचे कामावर नेमलेले आहे हें आपणास माहित असेलच.

शाळाखात्याचे डिपुटि इजुकेशनल इन्स्पेक्टर रा. रा. विनायक रामचंद्र भाटवडेकर बि. ए. यांची स्वारी तालुक्यांतील शाळा पहाण्यास गेली आहे.

## वर्तमानसार

### कीर्तन,

[ देश सुधारणा आणि स्वदेशीय वस्त्रें वापरण्याची अवश्यकता या विषयांवर.]

"करा करा हो ऐक्य लोकीं करा हो!
त्यजा भिन्न भावास लौकीक राहो!
मना पासुनी प्रार्थना सज्जना ही;
कराया तसें कोण कीं सज्ज नाहीं."

नवीन प्रकारचे कीर्तन करणारे एक सोलापुरास व एक मुंबईस असे दोन हरिदास बुवा अलिकडे प्रसिद्धीस आले आहेत. ईश्वर कृपेनें त्यांच्या जोडीला तिसरे एक बुवा आमच्या धुळ्यास उत्पन्न झाले ही गोष्ट फार आनंदाची समजली पाहिजे. ते कोणते ह्मणाल तर धुळें येथील ट्रेनिंग क्लासचे शिक्षक रा. रा. केशव सदाशिव रिसबूड हे होत यांच्या कीर्तनाचा उघड असा पहिला प्रसंग तारीख २३ रोजीं रात्रीं सहस्त्रबुद्धे यांच्या वाड्यांत झाला लहान मोठे विद्वान्, सभ्य, शास्त्री, भिक्षुक वगैरे जुनी नवी मंडळींची फारच गर्दी जमली होती. नवीन प्रकारचें कीर्तन पुणें मुंबई वगैरे ठिकाणीं झाल्याचें वर्तमान पानपत्रीं वाचून जो तो तसलीं कीर्तनें ऐकण्या विषयीं फारच उत्सुक होता. ती इच्छा आमचे रिसबूड यांनीं केली. बुवांच्या कीर्तनांतली सर्व कविता त्यांनींच केलेली होती. त्यांच्या कवितेत यमकानीं तर खूपच बहार करून दिली होती. स्वदेश अभिमान, स्वदेशाची पुर्वीची स्थिति व हल्लींची स्थिति, लोकांची बिलायती वस्त्रें वापरण्याची आसक्ती, त्या संबंधानें त्यांची निर्भर्त्सना, त्यांस उपदेश, सारासार विचार न पहातां मेंढरा सारखें एकच मार्गाचा अवलंब करणें, स्वदेश जनांवर सारखी प्रीति ठेवणें, मुख्यत्वें करून देशी वस्त्रें वापरण्याची आवश्यकता वगैरे गोष्टींचें यथातथ्य व मनांत ठसेल असें वर्णन केलें. कथा रंगांत आली ते वेळेस बुवांच्या अंगीं आवेशयुक्त बोलण्याची शैलीही चांगली दिसून आली, बुवांनीं सर्व लोकांस बरेंच हासवून सोडिलें आणि त्यांनीं सांगितलेली प्रत्येक गोष्ट, श्रोत्याच्या मनावर चांगली बिंबली. लोकांच्या मनांत असल्या गोष्टी बिंबून त्यांच्या हातून तसें वर्तन होण्यास अशी वारंवार कीर्तनें झालीं पाहिजेत. करितां त्यांस आमची अशी सूचना आहे, कीं, त्यांनीं देशस्थिति, रिवाज, चाली, उद्योग, व्यापार, एकोपा, धर्म, स्वातंत्र्य सुख, स्वदेशाभिमान, वगैरे गोष्टींवर नवीन नवीन कविता करून अशा कीर्तनच त्यांनीं वारंवार प्रसंग आणावेत. हे बुवा येथील ऐक्यवर्धिनी सभेच एक सभासद आहेत. तसेंच रा. रा. विठ्ठल वामन हेही आहेत. यांच्या अंगीं वक्तृत्व शक्ति फार चांगली आहे तेव्हां आमच्या धुळ्यांत हीं दोन रत्नेंच आहेत असें ह्मटलें पाहिजे. विठ्ठल वामन यांची व्याख्यानें मागें एक दोनदां ऐकण्यांत आलीं. परंतु तसा प्रसंग कां येत नाहीं नकळे. त्यांस मागे एकदां आह्मी सूचना दिली होती व आतां ही देतों कीं त्यांच्या वारंवार हे शहिताच्या अनेक विषयांवर व्याख्यानांनी व कीर्तनांनीं ईप्सित कार्य फार लवकर तडीस जाणार आहे. कारण यात दुसरें अधिक चांगले साधन कोणतेच नाहीं. वक्तृत्वाचा होणारा परिणाम आपण प्रहातच आहोंत आणि या विषयीं इतिहासांतही उदाहरणें पुष्कळ सापडतील.

अलीकडे कित्येकांची अभिरुची विदेचा पोकळ डौल घालून पदरचा पैसा वेचून परदेशच्या लोकांच्या पोषाकाकडे कशी लागत चालली आहे हे आमच्या हरिदास बुवानीं खालील कटावांत फार चांगले दाखविलें आहे.

### कटाव.

खर्चुनिया व्यर्थ धनातें पर पोषागी कां रमतां.

सांप्रतचा श्रीमंति डौलतो: साच बोलतों. बघतां आत्मा त्यास डोलतो वेढुनि या सगळाहि गळा, अशि बारबंदि अंगामधिं पघळा जाकेट वरी त्यावर त्याटीनीचा क[illegible] उपरी काव्या, एक [illegible] जाड [illegible] ती, [illegible] पाच चार कप्पाह तयाला ज्यान लांबेचा अटकाव, असा पटका एक शिरि फटकारुनि झोंक थोडका ठेवित पुढतीं मागिल भागीं अखुड शेंडिच्या झिज्या उडती, नीट नेटका करावया घटका घटका करिं सांवरिती झटका मारुनि लटका हाव भाव बहु दावुनि: दाखविती अभिमान जनातें धोतर जोडे नाउनि टुंगा लुंगा पंच्या गुंडाळुनित्या, वरुनि पाटलोन ढिली पायीं, चढविति अति शुभ्र पाय मोजे, रबरी गार्टर बोष्टिति मौजें वरुनि घट्टतो, रबरि बूट तो, वहुत उपायीं चढवुनि घाई, घाइ चालतां कर्र कर्र. वाजेच खालता: जरिहि वांगडी, तरी कांकडी, मानुन हातात एक कांठी वर्तुळाकृती, किखावाची बहुत हतवटी वामहस्तकीं, फार स्वस्त कीं, एक रुमाल कमाल हातभर त्यानें वारंवार पुसावें, पु: पुन्हां मग तें फडकें कप्यांत विसावें त्या नाहातर गुणीं देवमण अश्या कंठीं जैसा भुषण, सर्वहि या पोषागीं तैसें त्या पुरुषाला, कांठें कंठ भूषणच शोभवीं गोफाकृति एक लांब जाडी,जीस मुलामा कामा पुरता सोनेरी ऐशीच सांकळी, गळीं मोकळीं उपवीतिरितीं लोंबे कोटावरून खालीं; तळीं पदकरूप तें चुनाळीं, घड्याळ आडव्या कप्यांत बसे असे गडी कितिकएक वैनी, मनीं धन्य आपणा मानिती, हे लोक जसे गळ्यांत सैली पुंगी वाळुनि, ह्मणेहो नान कशा पंथी, असे शोभती, कितिक यापरी, श्रीमतिरिती वर्णूं तरिती, आतां विनंती राहो प्रीती, चित्तीं नव्हां कुद्धचया केसरिच्या बोला करितां ॥ १ ॥

कीर्तन — ( देश सुधारणा आणि स्वदेशीय वस्त्रे वापरण्याची अवश्यकता या विषयावर ) रा. रा. केशव सदाशिव रिसबूड यांनी केले. मंडळी पुष्कळ जमली होती. कीर्तन फार सर्वोत्कृष्ठ झाले. या विषयीं दुसरीकडे लिहिले आहेच.

रा. रा. श्रीधर विठ्ठल दाते मामलेदार नशिराबाद हे दोन वर्षांपासून पळून गेले होते, त्यांचा आजपर्यंत कोठें शोध नव्हता. त्याबद्दल सरकारानें आलाहिदा बक्षीस ठरून जाहिरनामा काढिला होता. हल्लीं असे समजण्यांत आले आहे कीं दाते मजकूर यांस मद्रासेंत पकडले आणि भडगावचे चीफ् कानस्टेबल त्यांस आणण्या करितां गेले असे ऐकतो. दाते यांणीं आपलें नांव बदलून सुब्राव आय्या अशा नावानें ते तेथें रहात होते. ज्ञा. बं.

चिचवडात ८ वे तारखेपासून जी शुष्क लढाई चालली होती तिचा चौविसावे तारखेस शेवट झाला, लढाई शुष्क झाली खरी, पण तिच्यांत सुमारें एक लाख रुपये खरोखर उडाले असतील. आतां इतके रुपये खर्चून लष्करी लोक काय शिकले तें साधारण लोकांस समजत नाहीं. तर आमचे वर्गणीदार जमादार, सुभेदार जे या लढाईत होते ते मेहेरबानी करून जर या लढाईत पहिले दिवसापासून शेवटपर्यंत काय काय झाले याचे वर्णन लिहून आह्माकडे पाठवितील तर ते आम्ही मोठे आनंदानें छापूं. साधारण लोकांस या गोष्टींची माहिती नसल्यामुळे ते असें समजतात कीं, अशा लढाईत जो पैसा खर्च होतो त्यापासून कांहिंएक फायदा न होतां तो फुकट जातो. आतां तो खरोखर फुकट जातो किंवा त्यापासून कांहीं नफा होतो ही गोष्ट लष्करांत जे लोक होते त्यांस बरोबर समजण्याचा संभव आहे. दुसरे लोकांस तसें समजण्याचा संभव नाहीं या करितां जर कोणी हुशार जमादार किंवा हवालदार किंवा दुसरा कोणी या लढाईची इत्थंभूत हकीगत लिहील तर तिजपासून पुष्कळ नफा होईल. साधारण नेटिव अमलदाराचे हातून ही गोष्ट होण्यासारखी नसल्यास पलटणीचे साहेबाचे मदतीनें लढाईचें वर्णन तयार करून तें वर्तमानपत्रांत छापवावें किंवा त्याचें निराळें बुक सरकारानें काढाविलें असतां त्यापासून सरकारचें नुकसान होणार नाहीं. बुकाच्या प्रति दर पलटणींत थोड्या बहुत खपतील व त्यापासून शिपाई लोकांस लढाईविषयीं ज्यास्त माहिती होईल.

गेले शुक्रवारीं सकाळीं रा. रा. काशिनाथ विष्णु भट वकील यांस देवाज्ञा झाली. यांचें मरणाचे कारण असें समजतें कीं भट हे आधले दिवशीं रात्रीं हिराचोंअवडा नाइकीण इचे घरीं निजले असून दुसरे दिवशीं पहाटेस मयत झाले. ही खबर त्यांचे घरचे माणसांस समजल्यावर आणी त्यांस गाडींत घालून घरीं आणिलें पुढें पोलिसानें त्या प्रेतास आसून इस्पितळांत परिक्षेकरितां पाठविलें. तथें परीक्षा होऊन डाक्तर साहेब यांनीं अभिप्राय असा दिला कीं, यांचे छातींतील शीर तुटून मरणास कारण झालें. यांचे मरणापासून बहुतेकांस दुःख वाटणार आहे.

कराचींत एके मुसलमानाचें लग्न वाजत गाजत चाललें होतें. त्या रस्त्यानें कर्नल बेविल बलोच पलटणीचे कमांडिंग हे घोड्यावर बसून जात होते. वाजंत्र्याचे आवाजानें त्यांचा घोडा बुजाला व ते घोड्यावरून पडणार होते असें दिसते. त्यांनीं मुसलमानावर सिटी माजिस्त्रेटाकडे फिर्याद केली. व त्या मुसलमानानें सांगितलें कीं. जेव्हां साहेबांनीं वाजंत्री बंद करण्यास सांगितलें तेव्हां आगलीच तीं मी बंद करविलीं. तरी माजिस्त्रेटानें या त्याचे सांगण्याकडे फारसें लक्ष न देतां त्यास गुन्हेगार ठरवून १० रुपये दंड केला.

*** साहेबांचा घोडा वाजंत्र्यास जर इतका भित्तो तर परेडीचे वेळेस तोफेचे आवाज होऊं लागले असतां साहेबांचा फारच त्रेधा उडून जात असेल व तसे वेळेस साहेब गोलंदाज लोकांवर फिर्याद करतील किंवा काय तें समजत नाहीं. ज्ञा. प्र.

लखनौपासून बनारसपर्यंतची आगगाडी जानेवारीच्या पहिल्या तारखेपासून सुरू होणार असे वां. ग्या. वरून कळतें.

राणीसाहेबांचे चिरंजीव प्रिन्स आर्थर आशांटी लढाईवर जाण्यास तयार आहेत व आपणास तिकडे पाठवावें अशी त्यांची विशेष उत्सुकता आहे असें वां. ग्या. वरून कळतें.

चमत्कारिक प्रकरण— आर्यमित्रकर्त्यांच्या ऐकण्यांत असें आलें आहे कीं, भावनगरचे जाइंट आडमिनिस्ट्रेटर मि. पर्सिवल हे तळजगांव येथें गेले व तेथें कळकत्याच्या एका बाबनें बांधलेली धर्मशाळा आहे तींत उतरण्याला गेले. केला आणि तेथील महाजन लोकांकडे व्यवस्था होती त्यांनीं किल्ली दिली नाहीं सबब ते कुलूप तोडून आंत राहिले. मालकानें पर्सिवल साहेबांवर २५००० रु. चा फिर्याद यानबद्दल केली आहे.

✓ हिंदुस्थानचें नुकसान—स्टेट सेक्रेटरी यांनीं जो दरमहा वराता करून विलायतेस खर्चाकरितां पैसा नेण्याचा क्रम चालविला आहे त्यामुळें भावाच्या फेरफारामुळें एप्रिल पासून डिसेंबर अखेर ८४,४१,३५० रु०चें नुकसान झालें. यांस अजमास केला होता त्यापेक्षां १५,४०,१९१ रु० अधिक नुकसान झालें असें कळतें. सन १८७३।७४च्या सर्व वर्षांत १,३५,००,०००, पौंड विलायतेस पाठवावयाचे त्यास एकंदर १४,३५,००,००० रु० लागतील अशा यांत प्रत्येक रुपयास दोन शिलिंग प्रमाणें भाव नसल्यामुळें ८५,००,०००रु०चें एकंदर नुकसान होईल असें अनुमान होतें; परंतु आजपर्यंत १,०९,६०,६६५ पौंड नेले त्यास ११,८०,४८,००० रु० लागले. यानें हें ८४,४१,३२० रु० चें नुकसान झालें. हिंदुस्थानची काय व कोठवर दुर्दशा करावयाची इंग्रज सरकाच्या मनांत आहे हें कांहीं समजत नाहीं.

येथील सेंट जेवियर्स कालेजमधील एक गौड ब्रह्मण विद्यार्थी सिविलसर्विसच्या परीक्षेकरितां विलायतेस जाणार आहे असें कळतें.

येथील इंग्रजी वर्तमानपत्रें बांबेग्याझेट व इंडियनस्टेटस्मन यांची वर्गणी त्यांच्या मालकांनीं वाढविली. ग्याझेटची वर्गणी ९२ रुपये होती ती ६२ रुपये झाली व स्टेट्समनची वर्गणी २४ रुपये होती ती ३६ रुपये झाली.

मुंबईंतील सुताच्या कापडाच्या गिरण्या — आह्मास असें समजतें कीं, या कारखान्याच्या मालकांमध्यें नेटिव व्यापाऱ्यांची "चेम्बर आफ कामर्स" सारखी एक सभा स्थापणें, देशी मालाचे नियमित कार्य प्रदर्शन करणें व हल्लीं २० नंबरापर्यंत सूत निघत असतें त्याशिवाय ४० अगर ५० नंबरपर्यंत तें काढणें या तीन गोष्टींबद्दल कांहीं विचार चालू आहे.

बडोदा रेल्वेचा डाकोरचा रस्ता येत्या मार्च महिन्यापासून बहुधा चालू होईल.

बंगाल सरकार या देशांतील मूळच्या रहिवासी लोकांच्या शिक्षणाकरितां ब्राह्मसमाज मंडळीस द्रव्यसाह्य देण्यास तयार झालें आहे.

जमखिंडी संस्थानांतील कांहीं गावांवर टोळांची धाड आली होती व त्यामुळें पिकास इजा झाली असें ह्मणतात.

बांबे ग्यासकंपनीस गेल्या जून अखेर सहा महिन्यांच्या हिशोबावरून सुमारें १०७९४० रुपये नफा झाला असें बांबे ग्या. वरून कळतें

बडोदा—जामेजमशेद पत्राच्या कर्त्यानें मि. दादाभाई नौरोजी यांस बडोद्याच्या दिवाणगिरीबद्दल १४,००० रु. दरमहा होणार ह्मणून जें लिहिलें होतें तें खोटें असून त्यास ५,००० रु. दरमहा मिळणार असें कळतें. आह्मी असेंही ऐकतों कीं, रा. खानविलकर यांस प्रतिनिधी नेमून मि. दादाभाई यांस दिवाण नेमावें असा बडोदे सरकारानें आपला इरादा सरकारास कळविला आहे. दादाभाईंच्या सर्व शर्ती गायकवाडांस मान्य झाल्या सबब आतां लौकरच तें काम पाहूं लागतील असें वाटतें.

मद्रास इलाख्यांत गोदावरीच्या कांठीं उत्तम प्रकारच्या कोळशाच्या खाणी चांगल्या सापडतील असा संभव आहे असें, यासंबंधीं मद्रासस मि. किंग या नावाच्या गृहस्थानें व्याख्यान दिलें व नमुन्या करितां तेथें कोळसा दाखविला त्याजवरून समजतें. इं. प्र.

## रक्तपित्तीनें पीडित लोकांकरितां रत्नागिरी येथें दवाखाना,

मेहेरबान ए. के. नेरन साहेब इस्क्वायर फर्स्ट असिस्टन कलेक्टर यांणीं रत्नागिरी जिल्ह्यांत रक्तपित्ती झालेल्या लोकांची स्थिति कशी आहे; याजबद्दल चौकशी सहा वर्षांपूर्वी केली. तेव्हां या भयंकर रोगानें पीडित झालेलीं मनुष्यें सुमारें १,६०० पेक्षां कमी नाहींत असें कळून आलें.

मंडळीनें आणि नातलगानींही बाहेर टाकिलेलीं व बहुतकरून गरीब लोकांपाशीं मागून खाणारीं अशींही महारोगग्रस्त मनुष्यें यांस थोड्या व वाईट अन्नावर उपजीविका चालविणें भाग पडतें. आणि औषधोपचार तर त्यांस मिळतच नाहीं.

आरंभीं १०० मनुष्यांस सुखानें, रहातां येऊन औषधोपचार करितां येईल, असा रक्तपित्तीचे मनुष्यांकरितां, रत्नागिरी शहराजवळ दवाखाना बांधावा व पुढें साह्य मिळेल तसा तो अधिक रोगी रहाण्याजोगा वाढवावा अशी योजना केली.

शंभर मनुष्यें रहाण्याजोगा दवाखाना बांधण्यास निदान २६,००० रुपये पाहिजेत असा अजमास आहे. या रकमेपैकीं १२,००० रुपये मुंबईंतील प्रसिद्ध आणि परोपकारी शेटसाहेब दिनशा माणकजी पेटीट इस्कायर, यांणीं औदार्यपणें दान याचें कबूल केलें आहे. फक्त रत्नागिरी शहरांत ४,००० रुपये जमले आहेत आणि फक्त इमारतीकरितांच १०,००० रुपये आणखी पाहिजेत.

दरमहा दर माणसास ४ रुपये खर्चास पाहिजेत. या प्रमाणें १०० रोग्यांस वर्षास ४,८०० रुपये लागतील. दवाखान्याचे नोकर लोकांचे पगारास दरसाल ६२४ रुपये पाहिजेत. एकूण ५४२४ रुपये दरसाल पाहिजेत. या खर्चाकडे, सरकारानें औषधें फुकट द्यावयाचें कबूल करून, लोकलफंड कमिटी दरसाल, तितकी रकम देईल तर, आपण दरसाल २,००० रुपये देऊं असें सरकारानें मंजूर केलें आहे. बाकी १,४२४ रुपये प्रतिवर्षीं जमविले पाहिजेत. आणि इतकी रकम विन हरकत उत्पन्न यावी ह्मणून ३७,००० रुपयांच्या सरकारी व्याजाच्या नोटी घ्याव्या असें योजिलें आहे.

इमला बांधण्यास जरूर असलेली रकम रुपये १०,००० या रकमेस मिळविली असतां इच्छित दवाखान्याचें काम सुरू करण्याकरितां, एकंदर ४७,००० रुपये पाहिजेत. ही रकम सर्व लोकांस विनंती करून जमवावी हाच कायतो मार्ग रुपये मिळण्यास आहे. हा रोग इतका भयंकर आहे कीं, याचें वर्णनच करितां येत नाहीं. यास्तव तो कमी होऊन अजीं नाहींसा होण्यासाठीं प्रत्येक मनुष्यानें सदय अंतःकरणानें या इच्छित यत्नास साह्य देण्यास झटावें, अशी गोठी आस्थापूर्वक आशा आहे.

वर्गणीनें पैसा जमविण्याकरितां व इतरही तत्संबंधी जें जें काम पडेल तें करण्यास रत्नागिरीस्थ लोकांनीं कमिटी नेमिली आहे. परोपकारी आणि अवश्यक अशा या धर्मकृत्यास जो पैसा पाठविणें असेल तो, या कमिटीचे सेक्रटरी मिस्तर धोंडो कृष्ण कानेटकर व मिस्तर जनार्दन हरि आठल्ये यांजकडे आणि ज्या वर्तमानपत्रांत हा मजकूर छापला जाईल त्या वर्तमानपत्राचे एडिटर यांजकडे पाठवावा तारीख १ माहे नोवेंबर सन १८७३ इ०

डी. के. कानेटकर.

जनार्दन हरि आठल्ये.

रत्नागिरी येथील लेपर हास्पिटल कमिटीचे सेक्रेटरी.

सदहू मजकूर परोपकार बुद्धीनें प्रत्येक वर्तमान पत्र कर्त्यांनीं आपापले वर्तमान पत्रांत (इंग्रजींत व मराठींत पत्राचे सोयी प्रमाणे) तीन वेळा घ्यावा अशी त्यांस विनंती आहे.

सदहू कमिटीचे.
सेक्रेटरी.

हें पत्र अकोला येथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

Registered No. 7—1873.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ | अकोला, रविवार ता० ११ माहे जानेवारी सन १८७४ इ० | अंक २

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साळअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

### जाहिरखबर.

उमेदवार कंपासिटरची आता जरूर नाहीं.

व. स. मालक

### जाहिरात.

सन १८७४ । ७५ सालाचा अकोले जिल्ह्याचा अबकारीचा लिलाव अकोल्यास मेहेरबान डिपुटी कमिशनर कचेरींत तारिख २८ माहे ज्यानेवारी सन १८७४ इसवी रोजीं ११ वाजतां सुरू होईल. ज्यास माहिती पाहिजे असल्यास लिलावाचे तारखेपूर्वी ८ दिवस डिपुटी कमिशनर साहेबाचे कचेरींत मिळेल. कळावें तारिख १६ डिसेंबर सन १८७३ इसवी मुकाम अकोट.

विष्णु सखाराम बापट
क्लार्क आफ धि कोर्ट.

J. T. Bushby, Major
Dy. Commitioner
Akola Dist.

### नोटिशीची दुरुस्ती.

कुसरीलाल मयत वारस पुत्र अज्ञान त्यांचे पालन करणार राधाबाई व मिसरीलाल दालचंद कलाल रहाणार अकोले यांस बमनजी उकडजी आणि कंपनी दुकान अकोले यांजकडून कळावें कीं, गेल्या आठवड्यांत आम्ही तुह्मास एक नोटिस रजिष्टर करून पाठविली व तारिख ४ जानेवारीचे वऱ्हाडसमाचारांतही छापविली तिचे खालीं नजरचुकीनें "पेस्तनजी" अशी सही पडली आहे. त्या ठिकाणीं "बमनजी उकडजी आणि कंपनी" असें तुह्मी वाचावें. कळावें तारिख ७ ज्यानेवारी सन १८७४ इसवी.

[सही] बमनजी उकडजी आणि कंपनी.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा० रा० व० स० कर्ते यांस.—

वि० वि० पुराणांतरीं आपण वाचतों कीं, भस्मासूर व त्याचे अनुयायी यांनीं शंकरास, पार्वतीकरितां फार छळिलें पण "चक्षुर्वैसत्यं" ह्मणजे पाहिल्या खेरीज सत्य कसें ह्मणावें? त्याचा (अवतार) हल्लीं दृष्टीगोचर होतो आहे ह्मणजे हल्लीं विश्वनाथाचे मागें भस्मासूर व त्याचे अनुयायी लागले आहेत. मागें भस्मासुर स्वतःकरितां पार्वती मिळविण्यास मागें लागला होता पण हल्लीं तसें नाहीं. पूर्वीं तिचें नाव पार्वती होतें आतां पक्षी आहे. व आतां आपले अनुयाया पैकीं इतोडी नामा जो राक्षस त्याची बायको जी पक्षी तिचा व याचा संबंध तोडून ही नवी घेऊन तिच्याशी पाट लाऊन घेण्याचा भस्मासुराचा विचार दिसतो. मंत्र्याच्या योगानें भस्मासूर फार बिघडतो. हा असूर एकंदरींत बरा पण कानाचा फार हलका असल्यानें बिघडला. पूर्वीं विष्णुस मोहनरूप धारण करावें लागलें होतें पण आतां लक्ष्मीस उपाय योजणें भाग पडून तिनें हडलशस्त्र प्रयोग सध्या केला आहे. व त्यामुळें सर्व स्थीरस्थावर आहे. असो पुन्हा भेटू. सरणात आपा.

मु० मातीपाण्याच्या
मिश्रणाची ती.
जि० भिल्लांचे गाव,
प्रांत लग्नाच्या मंडळीचा
जमाव.

३३ कोटींतील एक सुर.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. मी येथें चार दिवस पाहुणा आलो आहें, त्या वेळांत येथें जे कळविण्यासारखें लक्षांत आलें ते कळवित आहे. त्यास येते अंकांत नेहमीप्रमाणें स्थल देण्याची मेहेरबानी व्हावी.

मी पहात व फिरत सुमारें गावचे पिछाडीस आलों तों तेथें पाराजवळ केर टाकण्याचें अड्डे पाहिले तों तेथें इतकी घाण पाहिली कीं, सांगतां पुरवत नाहीं. व नाकास पदर लावल्यावांचून तेथून जानवत नाहीं. जवळच कोणी रहातो. तो कोण? ह्मणून चौकशी करतां कोणी लोणकरी रहातो ह्मणून कळलें. वाहवा! शाबास त्या रहाणाराची कीं अशी दुर्गंधी रोजचे रोज त्याच्यानें सोसवते. जाणाऱ्यास "म्युनिसिपलकमिटी" येथें आहे काय ह्मणून विचारतां, आहे पण सजीव असल्याची भ्रांती आहे असें उत्तर मिळालें. काय हो एडिटरराव, तालुक्यांत हा प्रकार तेव्हां इतर गावीं कशी स्थिती असेल हें सहज कळतें. चौकशीअंतीं कळलें कीं, तहशिलदार कधीं गाव पहाण्यास फिरत देखील नाहींत. कोणी साहेब येण्याची असली ह्मणजे मात्र तेवढा तोंडापुरता गोडा घोळाला व करावा गरीबास दंड ह्मणजे झालें. याचप्रमाणें पांच सात स्थलीं घाण दृष्टीस पडली. असो.आश्चर्य आहे. पुढे आलो तो पोलीस लोकांचे राहण्याचे छपर पाहिले व तेथेंही आंत जाऊन पहातां पिछाडीस सदरील प्रमाणेंच घाणीचा प्रकार होता तेव्हां तर दंग झालों कीं हें पोलीस लोकांचेच उरावर बसण्यास बाकी आणि स्वतःचे घरीं हा प्रकार, तेव्हा लोकांसारखें ब्रह्मज्ञान आपण कोरडा पाषाण ही ह्मण आठवली. पुढें १०६ पावलें आलों तों मधी कूड घालून दुभाग केले येक छापर पाहिलें. हें कोणाचें ह्मणून विचारतां लैसन वेंडराचें ह्मणून तेथें १ मुसलमान उभा होता त्यानें सांगितलें. वहावारे वहावा! दुकानावर पाट्या असाव्यात त्या नाहींत व वेळेसते लोकही तेथें हजर नाहींत मग नावालाच कशाला दुकानें बांधलीं? त्यावाच कोणी जुलूम केला होता? वेळेवर हलके दराचे कागद, व कर आण्याचे रसिद स्टांपही पुरेसे या लोकांजवळ मिळत नाहींत व हे लोक वेळेवर सापडत देखील नाहींत व तेणेंकरून गरीब गुरबिास मोठा त्रास सोसावा लागतो, पैकीं एक लैसन वेंडर तर फारच उरपट आहे. त्याचे कामानें वेळेस जर कोणी कागद मागावयास गेला तर अगोदर घरीं (दुकानाचें तर नावच नको) तर सपडणेंच कठिण कारण पहला बारा पिंपळाचा मुंजा व किस्येकांच्या नाकचा बाल. तशांत कोठून धुंडून काढला तर स्वतःनें कामाची घायी आणि त्यांत कोणीं घाई केली तर अगोदर छानदार चुरचुरीत रोकडे जबाब मिळतात पण गरीब बिचारे करतात काय? गरजवंत असतात त्यामुळे निमुटपणे तेही सोसतात असेंही त्या मुसलमानानें सांगितलें. मी आशा करतों कीं आपण हा मजकूर मे. डे. क. सा. चे कानावर घालून याचा बंदोबस्त करालच व गरिबाची दाद लावाल. असो. पुढे सरकलों तों शाळा व कचेरी समोरासमोर दिसली. शाळा छपरींच आहे व पुढें थोडासा बगीचा लावलेला आहे व नाव लिहून पाटी लावलेली आहे. बहेरील व्यवस्थेवरून आंतील स्थिती बरी असावी असें दिसलें पण समोर जें लाकडी कुंपण घातलें होते त्यांतील एका बाजूची लाकडें अर्धवट होतीं तेव्हां असें का ह्मणून पहाण्यावर पो० का० होता त्यास विचारलें तेव्हां तो ह्मणाला दोन्ही बाजूनीं सारखीच होतीं पण या बाजूचीं लोकांनीं नेलीं तेव्हां पाहण्यांतून कोणी नेलीं असें ह्मणतां तो बोलला दुसरे कोण, थंडी वाजती ह्मणून शेकास व वेळेस स्वयंपाकास नसली ह्मणजे हेच पोलीसचे व काळीचे जवान लाकडें नेतात. नाहींतर रात्रंदिवस पहारा असोन दुसऱ्याची नेण्याची मगदूर तरी आहे काय? असो ते तर असो. मास्तर लोक थोडी मेहेनत घेतात व वर्षास नवें जुनें करितात ह्मणून इतकें तरी आहे; नाहीं तर आमचे इकडे कचेरी समोर पहाना कशी स्थिती आहे ती! मागें रा. रा. रामराव गोविंद होते तेव्हां जी व्यवस्था होती त्याचा शतांश देखील हल्लीं नाहीं असें त्यानें पुन्हा उत्तर दिलें तेव्हां तर मला मोठें नवल वाटून फार हसूं आलें कीं, सतत पहारा असोन अशी स्थिती तेव्हां पहारा आहे नाहीं सारखाच व इतर ठिकाणीं काय असेल तें असो. वहावारे तहशिलदारी आणि वाहवांर बंदोबस्त कीं खुद्द कचेरिपुढचा बगिचा नाहींसा झाला, लाकडें सर्व चोरापोरी गेलीं तेव्हां अंमलदाराचो काम करण्याची शैली उत्तम आहे कीं नाहीं? कायहो पत्रकर्ते महाराज, कोणी अंमलदार येणार असले ह्मणजे तेव्हढें तोंडापुरतें पुढें पुढें करावें ह्मणजे झालें का? व अशानें होते का सुधारणा व राहतो का बंदोबस्त. असो पुढे आंत (कचेरींत) गेलो तो आंत कोणीं नाहीं. फक्त पेषकार व २।३ कारकून होते तेव्हां तर आश्चर्याची कमालच झाली ते कसे ह्मणाल तर अहो १२ वाजून गेले तरी अद्याप तहशिलदारानें ठिकाण नाहीं. तेव्हा कचेरी करण्याची रीत किती घेण्यासारखी आहेना!! स्वतःच वेळेवर जर न आले तर हाताखालचे लोक कशास येतात. थोडी चौकशी करतां बारामासचीच ही रीत आहे असें समजलें. सुटते केव्हां ह्मणून विचारतां बहुतकरून ८ । ९ वाजतात व साल अखेरीस जमाबंदीचे दिवसांत तर कधीं कधीं १२ व १ ही रात्री वाजतो तहशिलदारांना काय येतातही उशीरा व जाताही लवकर पण नोकरांचे आहे पाप. नशीब त्यांचे !! बः राव तुमचे अकोल्यांत तरी, अशी उत्तम स्थिति आहे का! मे० डे० क० साहेबापर्यंत हें कसें जात नाहीं व तेही याचा बंदोबस्त कसा करीत नाहींत कोण जाणें!! तस्मात या इंग्रजींत जितका उजेड तितका अंधेर. नाईल तेथें बत्ती, नाहीं तर जाई ना सुई असें ह्मणतात तें खरें आहे. पुढें पेठेंत गेलो व तेथील सरकारी बगिच्याही पाहिला. सरकारी बगिच्याचे पैसे शुध्द मातींत व्यर्थ घालणें आहेत. पेठेंत किंचित मन रमलें. देवी पहिली तिचा फक्त मुखवटाच दोन माणसाचे बाजे एवढा आहे. व तोंड आ वासलेलें आहे. इला पहातांच विचित्रपुरींतील सदंबा व कदंबाचें वर्णनाचें स्मरण झालें. नंतर नवीन शाळागृह व कचेरी पाहिली कचेरी २७००० व शाळा ७००० ची असें तेथील मिस्तरीनें सांगितलें. कचेरीचा फर्मा बरा आहे पण शाळेचा अगदि नापसंत आहे. व दोन्ही मकाणें गावापासून अगदि दूर एके कोनांत व मसणवाट्यांत गावचे ईशान्येस बांधली आहेत. कचेरीचें असो पण शाळा त्या स्थळीं अगदी गैरउपयोगी आहे. कारण ल्हान मुलांस इसकया लांब व मुख्यत्वे पावसाळ्यांत अतिशय त्रास आहे. पण इंग्रजीं रीति वरील ह्मणीनें एकदा कळविलीच आहे.

नंतर रात्रौ येथें एक हरिदास आलेले आहेत त्यांची कथा येथील लक्ष्मणराव कारकून यांचे येथें झाली व मलाही बोलाव णें आल्यानें मीही गेलो होतो. पण को

णीकडे गाळो असे झाले. कां ह्मणाल तर प्रथम दरवाज्यांतून आंत शिरतांच पुढें चौकांत जी घाण होती व जी दुर्गंधी चालली होती त्या योगानें मला तर तेथें बसवेना बाबा. अहो रोजचें तर असो पण चार मंडळी आपले येथें यावयाची तेव्हां तर स्वच्छता ठेवावी कीं नाहीं. चार घागरी पाणी घालून टाकलें असतें धुऊन ह्मणजे झालें पण करतो कोण. गंमत तर ऐका राव, इकडे कथा तर चालली होती पण ज्यानीं करविली त्या रात्रीचा पत्ता तरी होता! ते बसले होते घरांत पूजा करित व घंटी हलवीत. चार लोक आपले येथें बलावले त्यांची व्यवस्था ठेवण्यास जर आपण नाहीं तर हें बरें दिसतें कां? आले, नाहीं हें बघणें, ज्याचा ज्याप्रमाणें मान त्याप्रमाणे त्यास सत्कारानें घेणें हें जर होत नाहीं तर कथा करण्याची कोणी जबरी केली होती काय? पहा, तेथें साधारण लोकांची तर काय पण येथील हेड मास्तर आलेल्याची देखील कोणी नीट व्यवस्था ठेविली नाहीं—पगाराचे मानानें, विद्वत्तेच्या मानानें व गुणानें केवळ पहिल्या प्रतीचे आहेत. अजात शत्रुच केवळ, ज्या गृहस्थाचे मनीं मानलीं द्वैतभावच नाहीं; पण असे रत्न आले कीं गेले याची दाद देखील नाहीं. घरचे मालकाचा तर घरांत घंटी वगैरे हलविण्याचा प्रकार चालला होता. व हे वरती एकदा कळवलेंच आहे. अस्तु. पुढें आम्हीच काय ते शहाणें असे मी मी ह्मणवणारे दुढ्ढाचार्य बसले होते त्यांणीं तर कांहीं लक्ष द्यावें. मास्तर आलेले माहित नाहीं ह्मणावें तर त्यांनां आणण्यास गेलेल्या मशालीचा उजेड पडला त्यावरून त्या गरिष्ट लोकांचे अकलेचा प्रकाश पडूं नये कां? पण तसें झालें नाहीं. तारतम्य नाहीं तर त्याला का माणुसकी ह्मणावी. नुसती सिव्हिल कामाची माहिती झाली ह्मणजे झालें कां व तेवढ्यानेंच दोन बोटें गगन उरत याला काय ह्मणावें? असो. पुढील मजा ऐका.

पुढें अगदीं गर्दी असल्यानें मास्तर आले ते बसले दरवाजांत तेव्हां तेथील लोकांनीं गलबला केल्यावर सदरील दुढ्ढाचार्यांस वाटली थोडीशी लाज व घेतले आग्रह करून वर. पुढील (त्यांतें एक दोन इंग्लिश जाणणारेही होते) मंडळींतून एकानें तरी वीतभर ढुंगण उचलावयाचें होतें पण एवढें होतें कोणास? अकलेचा उजेड एकदा कळवलाच आहे. तेही असो, येथील फ० असिस्टंट मास्तरही पुढेंच ×× सारखी मान हलवित बसले होते त्यांणीं उठून खरें ह्मटलें तर जागा देणें हें त्यांचें कर्तव्यकर्म होतें पण "संगती संगदोषेण" या ह्मणीप्रमाणें त्यांचे हें कृत्य झालें असें मला वाटतें. घरच्यानें भरे ह्मटलें ह्मणजे दारचे वारे ह्मणतात हें त्यांणीं कसें ध्यानांत ठेविलें नाहीं? सदरीं पोलिसाकरितां जी ह्मण लिहिली तिला हे अनुसरले हें त्यांणीं फार वाईट केलें. असो एकंदरींत या ठिकाणासारखी सर्व गोष्टीची कोठेंच गम्मत पाहिली नाहीं. सारांश "अंधळें दळतें व कुत्रें पीठ खातें." ही ह्मण अक्षरशः येथें लागू आहे.

आतां कथेकऱ्याबद्दल थोडीशी हकीकत कळवून पुरे करितो. त्यांच्या अंगार खुणावरून हे मोगलाईंतले असावे असें ते व्हांच लक्षांत येतें. पण कथवास जे गुण असावेत ते त्यांचे अंगीं नाहींत ह्मणजे कथेकऱ्यास मुख्यत्वेंकरून वक्तृत्व चांगलें व भाषा शुध्द असणें जरूर आहे. यांचीं भाषा किती शुद्ध आहे ते व लिंगांचा उपयोग पुढील उदाहरणांवरून कळेल. 'त्यांचा समाधि लागला,' 'पाणाला चुणा लागण्याचा अवकाष' इत्यादि. आधीं दुपारीं ऐकलें होतें कीं, बुवा चांगले गातात पण भलतेच ठिकाणीं उतरतात व चढावितात, मृदंग्या तर फार घाई करतो, मागच्याचा आवाज फार कोता इत्यादि प्रकार आहेत व अर्धाला अर्थ खातात मग भूक लागते कीं काय न कळे. सर्व कारकून मंडळीनें ठेऊन घेतले आहेत असें ऐकलें. मला वाटतें इतके पैसे येखाद्या कीर्तीच्या सार्वजनिक कामाकडे लावते तर फार उत्तम झालें असतें. अस्तु बाकी मजकूर पुढें कळवीन. आणखी दोन दिवस मुक्काम आहे. हल्लीं पत्रविस्तार फार झाला ह्मणून पुरे करतो. पण छापाहो नाहीं तर द्याल फेकून कोपऱ्यांत आणि कराल विरस ह्मणजे झालें. छे: खात्री आहे कीं असे आपण करणार नाहीं छापालच लोभ करावा ही विनंती. मुक्काम चिखली. तारिख ३० माहे डिसेम्बर सन १८७३ इसवी.

पाहुणा आलेला
एक.

## वऱ्हाडसमाचार

मिती पौष वद्य ९ शाके १७९५.

आह्मांस असें एक वाईट वर्तमान समजलें आहे कीं, रा. रा. आत्माराम भिकाजी एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांची सन १८५० चा आक्ट ३६ वा बरहुकूम कमिटीपुढें चौकशी होणार. मेजर बुशानी साहेब, व क्या० बुलक साहेब मेंबर आणि मेजर बेल साहेब प्रेसिडेंट या प्रमाणें कमिटी नेमली आहे. चौकशी ५ वे तारखेस अकोल्यास सुरू होणार होती परंतु आत्माराम भिकाजी यांची प्रकृती चांगली दुरुस्त नसल्यामुळें त्यांस वाशिमाहून येण्यास जो अवकाश दिला होता तो पुरा नव्हता सबब १५ वे तारखे पर्यंत त्यांनीं अवकाश मागितला आहे असें ऐकतो.

असें ह्मणतात कीं वाशिमास हें डिस्ट्रिक्ट रजिस्टर असतां सब रजिस्टारचे दप्तराची पाहणी केल्याचे बाबदींत यांनीं रजिस्ट्रार जनरलकडे खोटा रिपोर्ट केला ह्मणजे पाहणी मुळींच केली नाहीं आणि पाहणी करून अमुक अमुक कागद पत्र व बुकें पाहिलीं असें रिपोर्टांत लिहिलें त्यावरून त्याचे प्रत्यंतराकरितां क्या० फिटझरल्ड साहेब यांनीं वाशिमचे डि० रजिस्टर व सब रजिस्टर याचे कारकून दोघेही उमरावतीस रजिस्टर जनरल यांकडे सदहू गोष्टीचा पुरावा पाहण्या करितां पाठविले त्यांनीं त्यांच्या जबान्या घेऊन व आत्माराम भिकाजी यांस पुन्हा खुलासा विचारून आपली खात्री करून घेतली व नंतर रेसिडेंट साहेबास ती गोष्ट कळविली व त्यावरून त्यांनीं कमिटी नेमून आत्माराम भिकाजी यांची चौकशी करावी असें ठराविलें. या कमिटीचे दृष्टीस जसें येईल तशी आत्मारास भिकाजी यांची निर्दोषता किंवा पुढील कायदेशीर चौकशी होणार आहे. आत्माराम भिकाजी यांचें ह्मणणें या विषयीं असें ऐकण्यांत येतें कीं, आपणास इतर काम पुष्कळ होतें व साल अखेरीचे दिवशीं रजिष्टर खात्याचा कारकून यानें आपणास कळविलें कीं सब रजिष्टरचे कामाची या सालांत कांहीं पहाणी झाली नाहीं व पहाणी बद्दल रिपोर्ट करावा लागत असतो तेव्हां ते ह्मणाले कीं तुह्मी सबरजिष्टरचे आफिसांत जाउन पहाणी करून त्यांत रिपोर्टाजोगें जे आढळेल त्याचें टिपण करून घेऊन यावे ह्मणजे तें आह्मी रुजू पाहून रिपोर्ट तयार करू. त्या प्रमाणें कारकुनानें जाऊन बुकें पाहिलीं व टिपण करून आणून दाखविलें. तेव्हां त्याचे मोकाबल्या करितां आत्माराम भिकाजी यानीं सब रजिष्टरची बुकें आपलें आफिसांत आणवून पाहिलीं व टिपणांतील कांहीं गोष्टी रुजू पाहून रिपोर्ट लिहिला.

दुसरे पक्षीं असें ह्मणणें आहे कीं आत्माराम भिकाजी यांनीं बुकें त्या वेळीं मुळींच नेलीं नाहींत व पाहणी किंवा रुजुवात मुळींच केली नाहीं. कारकुनाचे टिपणाचा भरवसा धरून त्यांनीं रिपोर्ट केला. आतां चौकशींत काय निष्पन्न होते पहावें. व चौकशी एवढ्या एकाच प्रकरणाला धरून होते किंवा इतर गोष्टीही याच चौकशींत पाहिल्या जातात तें पहावें. या मोठ्या कामदारावर हा एक मोठाच प्रसंग आलेला आहे.

आह्मी इच्छितों कीं त्यांची हकीकत खरी असो व त्या त्यांच्या खरेपणाकरितां ईश्वर त्यांस सहाय करो.

---

एका पत्रांत असें लिहिलें आहे कीं, सरकारानें पाच रुपयांच्या नोटी केल्या पासून लोकांची मोठी सोय झाली. बहुत लोक आतां किरकोळ सारकोळ कामांस टपालांतून या नोटी पाठवितात. पण पांच रुपयांच्या कामालाही रजिस्टर करण्याचा च्यार आण्याचा खर्च पडतो हा फार आहे. तर सरकारानें लखोटे रजिस्टर करण्याची फी च्यारआणे आहे ती दोन आणे करावी ह्मणजे गरीब गुरीबांची उत्तम सोय होईल. व रजिस्टरेंही पुष्कळ होऊन सरकारचें नुकसान होणार नाहीं.

आह्मालाही वाटतें कीं, सरकारानें ही सूचना अवश्य मान्य करावी. दहा हजार, पाच हजार रुपयांच्या रकमा पाठविण्याला च्यार आण्याचें रजिस्टर व पाच रुपयांचे रकमेलाही च्यार आण्याचें रजिस्टर करावें लागतें हा खर्च अधिक आहे. पण अमुक रकमेच्या लखोट्याला अमुक रजिष्टर फी असावी असें ठरविलें तर त्यापासून कांहीं चांगलें होणार नाहीं. कारण लखोट्यांत अमुक ऐवज आहे असें टपालवाल्यास कळणें सुरक्षित नाहीं तेव्हां सरकारानें सररास दोन आण्याचा दर रजिष्टर पत्रास करावा, किंवा निदान मैलाचे दूरत्वावर तरी अधिक उण्या दराचें मान ठेवावें ह्मणजे १०० मैलाचे आंत लखोटा रजिष्टर होऊन जाणें असेल तर दोन आणे व त्याहून अधिक दूरत्वास च्यार आणे असा प्रकार केला तरी कांहीं सवड होयील कारण फार दूर रक्कम पाठविणारा पांचदहा रुपयांहून अधिक रकम पाठवील असा संभव आहे. तरी गरीब गुरीब कारकून लोक आपले पगारांतून महिन्यास थोडी बचत राखून कोकणांत वगैरे घरीं वृध्द मातापितरास मदत करू इछिणारे यांस अशा प्रकारानें गैर सोय आहेच. सबब रजिष्टरास दोन आणेच सर्वत्र फी ठेविली तर फार चांगलें होईल.

---

## मानपत्र.

कारंजाहून रा० रा० बापुजी रंगनाथ ए० अ० क० यांची मलकापुरास बदली झाली. त्या करितां ग्रामस्थानीं सभा भरवून त्यास मानपत्र दिलें. असें आपचे बातमीदारानें लिहून त्याची नक्कल आह्मांस पाठविली आहे. ती वाचकां करितां आह्मी प्रसिद्ध करितो.

महाराज—आज आपणांस आह्मीं या खालीं सह्या करणार कारंजस्थ लोक अति पूज्य बुध्दीनें सत्कारपूर्वक हें मानपत्र देत आहोत. परंतु येथून आपले जाण्यापासून आह्मां सर्वांस जें वियोगजन्य दुःख झालें आहे त्याचें वर्णन आमच्यानें करवत नाहीं.

आपण सन १८७० चे फेब्रुवारी महिन्यांत एथें आला व तेव्हांपासून आजपर्यंत आह्मांस आपले हरएक वर्तनांत जो अनुभव आला आहे त्याजवरून आह्मीं खातरीनें ह्मणतो कीं आपण ज्या ज्या स्थळीं गेला असाल तेथील लोकांचा तावत् कालपर्यंत भाग्योदय झाला असेल, व आज आपण आह्मास असें दुःखसागरांत बुडवून टाकिलें आहे, तद्वतच त्यांसही आपले वियोगानें लोटिलें असेल.

आपला कित्ता घेण्या जोगीं उत्तम चाल, काम करण्याची अपूर्व शैली, धूर्तता, निःपक्षपात न्याय, गंभिरता, गरीबांकडे लक्ष, निराभिमान, स्नेह व लोकप्रीति संपादन करण्याची इच्छा वगैरे गुण आपणामध्यें पूर्णपणें वास करीत आहेत व ते आपणांस मोठें भूषणावह आहेत.

आपण या स्थळीं आल्यापासून या कारंज शहरानें तर आपली पूर्वींची त्वचा टाकून दिली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. एथें ज्या ज्या ठिकाणीं आपले आगमनाचे पूर्वीं रात्रीं प्राणहानी होण्याच्या भीति असत व अति दुर्गंधिमुळें नाकास पदर लावून गेले असतांही ती सहन होत नसे तीं तीं स्थळे आपण आबाद करून त्यास अतिरम्य दशाला आणिलात. सडका अत्युत्तम तयार करविल्यात, नवीन

दररोजचा छोटेखानी बाजार बसविला, कित्येक व्यापाऱ्यांस उत्तेजन देऊन त्यांजकडून व सरकारी खर्चानें धर्मशाळा बांधविल्यात व पुस्तकालय स्थापन केलेत. आठवड्याचे बाजाराचें स्थळ उत्तम बांधविलेत कितीएक देव शेकडो वर्षे थंडी, ऊन्ह, पाऊस खात उघड्या जागेयांत बसले होते त्यांस आपण कायमचे आच्छादन करवून दिलेत. आपण उद्योग करून ऋषि तलावाचाही जीर्णोद्धार केलात. ज्या नवीन बसविलल्या पेठेस मे० हार्डीन साहेब उमरावतीचे डे० क० यांणीं खुष होऊन आपलें नाव दिलें ती सुंदर पेठ आपणच बांधविलीत. वर्गणी फंडांतून दवाखान्याकरितां औषधे ठेवण्यास व देण्यास जागा बांधून देवविलीत व त्यात हरएक प्रकारें सुधारणा केलीत. मुलांस खेळण्याकरितां आपण वर्णनीय जागा आपले खर्चानें बांधून दिलीत. उन्हाळ्यात मुलांकरितां पाणी पिण्याची सोय करून दिली होतीत. ब्राह्मण जातींतील अनेक प्रकारचे बिकट ज्ञातिसंबंधीं कलह आपण मध्यें पडून अनेक वेळ तोडिलेत. व सर्व जातींच्या लोकांस आपण सम व दयार्द्र दृष्टीने पाळिलेत.

ह्या आपल्या सर्व स्तुत्य व परोपकाराच्या गोष्टी कोणी तरी विसरेल काय? आह्मांस वाटते कीं, अगदी विचारशून्य व कृतघ्न पुरुषाच्या मनावर देखील ह्या आपला ठसा उमटविल्या वाचून राहणार नाहींत, मग इतरांची काय कथा? असो या सदर्हू गोष्टी पैकीं ज्या ज्या दृष्टीस पडतील त्यां त्यां वरून आपली पदोपदीं आठवण येईलच परंतु या सर्व गोष्टी बरोबर आपले प्रिय नावाची आठवण आबाल वृद्धांस वारंवार यावी व आपलें नांव या ठिकाणीं पुष्कळ काळ राहावें असें एखादे लहानसे स्मारक कृत्य करण्याचे मनात आणून आह्मीं येथील सरकारी इंग्लिश मराठी शाळा गृहाचे इमारतीवर उंच ठिकाणीं सार्वजनिक उपयोगा करितां आपले नावानें घंटा टांगण्याचा विचार मनात आणिला असून त्यास आपण अनुमोदन द्याल अशी पूर्ण आशा बाळगीत आहो. आतां आपले जागीं जे कोणी येतील त्यांनीं आपणा प्रमाणेंच आमचें प्रतिपालन करावें व आपण कोठेंही असलात तरी तेथे आपली दिवसानुदिवस जास्ती बढती करून आपणास व आपले कुटुंबांतील सर्व लोकांस अति सुखांत ठेवावें असे सकल जगाचा नियंता जो सर्व शक्तिमान ईश्वर यानपाशीं मागणे मागतों.

## वऱ्हाड

वाशिमचे एकस्ट्रा असिस्टंट कामिशनर मि० अबदुल हक कर्नाळकर यांस मारण्याचा यत्न करणारा शिपायी काळेखान याची क्या० फिटझरल्ड साहेब यांपुढें चौकशी झाली व कलम ३३२ प्रमाणे त्यावर गुन्हा शाबीद झाला सबब त्याला २० दिवसांची सक्त मजुरी कैदेची शिक्षा झाली असें कळतें.

—००० —

वाशिम जिल्ह्याकडे शेतांच्या पोटभागिनी पनिश्टरावें काम आजवर सुरू झालें नव्हतें. त्याकरितां आतां नेमणूक झाली आहे. वाशिम तहशीलदाराचे हाताखालीं रा. विठल जनार्दन डिपुटी कमिशनर आफिस पैकीं २० रुपयाचे कारकून यांस ४० रुपये पगार करून नेमले आहे व ते गृहस्थ कामाची माहितीं करून घेण्याकरितां अकोल्यास आले आहेत असे कळतें.

—०००—

ट्रेनिंग कालेजा वरील प्रिन्सिपाल रा. रा. वामन प्रभाकर परांजपे दोन महिन्यांची रजा घेऊन पुण्यास गेले. यांचे जागेवर मि० नूरखान यांस नेमिलें. डा. सिक्लेर साहेब यांनीं ही नेमणूक फार योग्य केली. प्रथमच प्रिन्सिपालची १२० रुपयांची जागा झाली त्या वेळीं तिजवर नूरखान यांचा हक्क होता पण मि०कपाडी साहेब यांनीं त्यांस ती जागा न देता उमरावतीस पाठविलें होते पण पुन्हा प्रसंग येतोच त्यांचे माहीतगारांनीं त्यांस पुन्हा येथें आणिलें हें पाहून आह्मांस संतोष वाटतो. नूरखान यांचे उमरावतीचे १०० रुपयांचे जागेवर मि. महमद इस्मायल ट्रेनिंग कालेजांतील हिंदुस्थानी मास्तर यांस नेमिलें. व हे उभयताही गृहस्थ आपआपले जागेवर रुजू झाले.

—०००—

मेजर बेल साहेब कमिशनर यांची स्वारी वाशिमाकडे गेली. मेजर बुशबी साहेब डिपुटी कमिशनर बाळापुराकडून खामगाबाकडे गेले आहेत. व डा० सिक्लेर साहेब उमरावतीकडे गेले आहेत.

—०००—

रा. रा. आत्माराम भिकाजी एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांची चौकशी होणार याजबद्दल दुसरे पृष्ठावर मजकूर लिहिला आहे तो वाचकांचे पाहण्यांत येईल. कोणी आह्मांस असें सांगितलें कीं ही चौकशी फेब्रुवारी महिन्यापर्यंत सुरू होत नाहीं.

—०००—

पुण्याहून बाबाजी सोनार यानावाचा कोणी गृहस्थ वऱ्हाडांत आलेला आहे व थोडे दिवसांपूर्वी तो आकोल्यास होता त्याने कित्येक रोग्यास औषधे दिलीं त्यावरून आह्मांस समजलें आहे कीं त्याला वैद्यकीचें ज्ञान नाहीं. व त्याउलट रोगी लवकर मरण्याचे किंवा त्याला अतिशय पीडा देण्याचे काम तो चांगलें जाणतो असें दिसते. असला भयंकर मनुष्य कोणीही क्षणभर जवळ करूनये. येकाद्यास येकादे प्रसंगीं त्यापासून गुण आला असेल व त्यावरून त्यानें आपली वैद्यकीची पोतडी सजविली असेल पण त्यापासून अनेकांस पीडा होईल असा आह्मास धाक वाटतो सबब आह्मी आमचे वाचकांस प्रिय ही गोष्ट मुद्दाम कळविली आहे. त्याजवळ कांहीं सरटिफिकिटे आहेत पण त्याशी व येथील तत्संबंधी अनुभवाशी कांहीं मेळ नाहीं.

—०००—

पंचगव्हाणचा मारवाडी चतुर्भुज वल्लद रघुनाथ दास यानें आपले एका कुळाकडे कांहीं घेणे होतें त्याबद्दल त्या कुळाच खातें रुजु करून पावतीचे टिकीट लावून सही करविली होती व तो लेख त्या कुळास लिहिता येत नसल्यामुळे भरतराव शेषराव देशपांडे याचे हातचा लिहिला होता. दिवाणी मुकद्दम्यांत सदरहू वही क्या० बुलक साहेब असिस्टंट कमिशनर याचे पुढें आली त्या वेळीं कुळानें तो लेख नाकबुल केला तेव्हा साहेब मवसुफ यांनीं बारकाव्याने पाहून त्यांतील लबाडी बाहेर काढिली. ती अशी होती कीं रुजु वातीचा लेख सन १८७० सालातला ह्मणून लिहिला होता व त्याजवर पावतीचे टिकीट जें लावले होते त्यावर वऱ्हाड असा छाप होता. पावतीच्या टिकिटावर वऱ्हाडांत हा छाप सन १८७२ चे आक्टोबर महिन्यांत झाला त्या पूर्वींच्या टिकिटास नव्हता याजवरून त्यांनीं त्याजवर मुकदमा करून डे. क. साहेब मेजर बुजबी याकडे पाठविला त्यांनीं ही विलक्षण लबाडी लोकांस करण्यास दहशत राहावी ह्मणून प्रत्येकांस सात सात वर्षें सक्त मजुरी कैदेच्या शिक्षा दिल्या. हा बारकावा क्या० बुलक साहेब यांनीं मोठ्या मार्मीकपणानें काढला याबद्दल आह्मी त्यांची तारीफ करितो.

—०००—

चांदुरी नजीक नाशिक येथील हरदास बुवा येथें आले आहेत. त्यांचे बरोबर रा. सिताराम बुवा ह्मणून आहेत. ते सतार फार उत्तम वाजवितात. येथे त्यांचे तीन च्यार प्रसंग झाले त्यांत ह्यांनीं आपल्या उत्तम कौशल्यानें मंडळीस फार संतोषित केलें. अशी विद्या असून विनय व निर्व्यसनता हे गुण त्यांजमध्ये असल्याने लोकांत ह्याची मोठी चहा होते. ही गोष्ट इतर गुणी लोकांनीं लक्षांत ठेवण्या सारखी आहे.

—०००—

अकोल्यास दिवसां बारा वाजतां तोफ होत असे ती कालपासून बंद झाली. कारण समजलें नाहीं.

—०००—

अकोल्याचे दक्षिणेस कापशी येथे रोहिले लोक उतरले होते त्यांनीं चोरी केली असा रिपोर्ट आल्यावरून येथून तहशिलदार व पोलीस गेले होते त्यांनीं त्यांचे झाडे घेतलें पण त्यास चोरीचा माल कांहीं मिळाला नाहीं ह्मणून त्यांस सोडून दिलें व बरोबर शिपायी देऊन त्यांस अकोले जिल्ह्याचे हद्दीपार करून दिले. पुढे आतां ते वाशिमाकडे काय गडबड करितात पहावे. आह्मी या लोकां विषयीं ते येथे आल्या वेळी लिहिलेंच होतें आवर आतां हा दुसरा प्रसंग आहे.

—०००—

सालमजकुरीं म्याट्रिक्युलेशनेच परीक्षेत वऱ्हाडचे ४ मुलगे पास झाले त्यापैकी चिंतामण गणेश पांडे खेरीज करून बाकी तिघास कालेजांत शिकण्याच्या वीस वीस रुपयांच्या एकझिबिशन्स मिळाल्या.

—०००—

कामि० साहेबापुढें गेले सोमवारीं सेशन मुकदमा चालला होता त्यात आरोपि एक मांग होता त्याने आपली बायको शिंदळकी करिते या रागावर त्रासून तन्ही दोन महिन्यांची आपली मुलगी आपले अंगाशी घेऊन विहिरींत जीव देण्याचे इराद्यानें उडी टाकली; परंतु एक दगड सापडला त्याचे आश्रयानें तो जिवंत राहिला व मुलगी बुडून गेली सबब त्यानें जाणून बुजून मुलीचा जीव घेतला असा आरोप त्यावर येऊन त्यास जन्मपर्यंत काळे पाण्याची शिक्षा झाली. माजिस्त्रेटापुढें फिर्यादी गुन्ह्यास कबूल होता व सेशन जजापुढें त्यानें वेड्याचें सोंग घेतल्यासारखें केलें होतें. तसाच तुरुंगात आत्मघाताचाही यत्न त्याने केला होतो.

## वर्तमानसार

जनरल मॉबिस साहेब विलायतेस रजेवर गेले आहेत ते आपली रजा आणखी येक महिना वाढविणार आहेत.

येका बुवाला पूर्वींच्या गायकवाडांनीं येक गाव ३००० रुपयांचें ईनाम दिले होते. त्यांत त्यानें विहिरी वगैरे करउन तो गाव बाराहजार रुपयांचे उत्पन्नाचा केला असें पाहून गायकवाडांनीं त्यावर जप्ती ठेविली व त्याला सांगितलें कीं ३००० हून अधिक रकम घेण्याचा तुह्मांस हक्क नाहीं. त्या बिच्याऱ्या बुवानें १५००० रुपये या कामीं खर्च केले होते.

मुंबईचे माजी गव्हरनर सर बार्टल फ्रियर यांस विलायतेस "फ्रीडम आफ धी सिटी आफ लंडन" ही पदवी मिळाली.

धारवाडास शिल्प काम शिकविण्याची शाळा सुरू झाली आहे व तींतील विद्यार्थ्यास च्यार च्यार रुपये पगार देतात.

कोल्हापुरचे छत्र पती महाराज हे नाताळाच्या सुटींत पोलीटिकल एजंट यांसह सांगली, मिरज, कुरुंदवाड, नरसोबाची वाडि वगैरे ठिकाणीं गेले होते व तिकडील सरदारांनीं त्यांचें उत्तम आगत स्वागत केलें. हे महाराज अगदी अल्प वयी आहेत असें असता त्यांस अशी हौस आहे हें पाहून संतोष वाटतो.

कारवाडाकडे रेल्वे करण्याचा विचार होता तो विलायत सरकारानें मंजुर केला नाहीं.

राणी साहेबांचे चिरंजीव ड्युक आफ एडींबरो हे राशिया देशाची राजधानी सेंट पीटर्स बुर्ग येथे जाऊन पोचले. त्यांचा तेथील राजकन्येशी विवाह होणार आहे.

रा. शिवराम भास्कर काणे रत्नागिरीचे असिस्टंट डिपुटि इजुकेशनल इन्स्पेक्टर मरण पावले.

बडोदा कमिशनचे काम खलास झाले असे कित्येक पत्रांत लिहिले आहे. व दुसरे कित्येक पत्रात असे लिहीले आहे कीं, बडोद्याहून सदर्हू कमिशन उठून नवसारीस कांहीं चौकशी करितां गेलें आहे. व रा० रा० हरीबा दादा सरसुभे त्यांचे सरबराया करितां नवसारीस गेले आहेत.

राव बहादुर बेचरदास अंबादास यांणी अमदाबादचे प्रार्थनासमाजला ४००० रुपये बक्षीस दि.

होळकर सरकार पुण्याकडून लवकरच मुंबईस जाणार आहेत. व पुण्यास त्यांकरितां आजरोजीं सभा होणार होती.

आफ्रिकेंत सहारा या नांवाचें एक मोठें रेतीचें मैदान आहे व त्यावर पूर्वी समुद्र असावा असे विद्वान लोकांचे अनुमान आहे. एके फ्रेंचमनाने अशी युक्ति काढली आहे कीं, या मैदानावर पुनः समुद्र आणून सोडावा; कारण त्याने शोधून काढले

आहे कीं, मैदान भूमध्य समुद्राचे सपाटी पेक्षां २७ मिटर खालीं आहे. तेव्हां भूमध्य समुद्रांतून एक कालवा आणून या मैदानांत सोडला असतां हे सर्व पाण्याने भरून जाऊन हा पुनः समुद्र होईल.

बडोद्यास कमिशन बसलें होतें त्याचा रिपोर्ट कलकत्ता सरकाराकडे गेला आहे. त्यांत ठराव जो होईल त्या मानावर दिवाण अगर राज्य चालविण्यास कारभारी याची योजना होणार ह्मणून बातमी आहे.

ज्ञा. प्र.

माजी गव्हरनर जनरल लार्ड मेयो यांच्या स्मरणार्थ कांहीं स्मारककृत्य करावे या हेतूनें कलकत्यांत जी मंडळी स्थापन झाली होती तिनें जो पैसा जमा झाला त्यापैकीं मेयो साहेबाचा (घोड्यावर बसलेला असा) पुतळा करण्यास जितका पैसा लागेल तो लाऊन बाकी राहिलेले सुमारें ५०,००० रु. कलकत्ता येथील नेटिव हास्पीतलाकरितां इमारत बांधण्याकरितां द्यावे असें ठरविलें आहे. या इस्पितलास मेयो नेटिव हास्पितल असें नांव देऊन त्यांत मेयो साहेबाचा मुखवटा ठेवणार.

मद्रास इलाख्यात एकंदर ६,७८० शाळा आहेत त्यांत १९,७०,७८२ विद्यार्थी आहेत.

जमाखिंडीकर यांणीं माजी विनायकराव जगन्नाथ शंकरशेट यांच्या स्मरणार्थ स्मारककृत्य करण्याबद्दल जो पैसा जमा होत आहे त्यास हजार रुपये दिले. सु. प.

कलकत्याच्या युनिवर्सिटीच्या म्याट्रिक्युलेशन परीक्षेस २,५४५ उमेदवार गेले होते त्याजपैकीं ८४३ मात्र पास झाले असें समजतें.

होळकर सरकारानीं जेजुरीस दोन हजार ब्राह्मण लोकांचें ब्राह्मणभोजन करून एकेक रुपया दक्षिणा दिली असें कळतें.

अमदाबाद प्रार्थना समाजाच्या मंदिराकरितां वर्गणीचे एकंदर सात हजारांचे आंकडे पडले.

अंमळनेर तालुक्यांतील कांहीं गावांवर मोठा गारांचा पाऊस पडला व त्यांत आंब्या एवढ्या गारा पडल्या व शेतें तीन चार दिवस गारांनीं पांढरी दिसत होतीं असें ह्मणतात.

बंगाला— गेल्या महिन्याच्या अखेरीस उत्तर, बहार व खालच्या बंगालचा कांहीं भाग यांत चांगला पाऊस पडला त्यामुळें हिंवाळ्याच्या पिकास फार उपयोग झाला असावा.

मुंबई— तारिख ६ डिसेंबरास प्रोफेसर केरो लक्ष्मण छत्रे हे वे. रा. रामभटजी मराठे यांची यंत्रें पहाण्यास गेले होते. त्यांस यंत्रांविषयीं अभिप्राय विचारतां तेथील भरसभेंत ते असें बोलल्याचे कळतें कीं रामभटजी सारखा कल्पक गृहस्थ दहा हजारांत देखील एक उत्पन्न होणें मुष्कील आहे.

इं. प्र.

## वऱ्हाडचें वर्णन.

वाशिम— मोंगलाईपासून वाशिम परगणा मेहकर सरकाराखालीं होता व पुढें इंग्लिश अंमल झाल्यावरही मेहकर जिल्ह्याखालीं तो एक तालुका होता. नंतर सन १८६८ सालीं वणी जिल्ह्यांतून पुसद तालुका इकडे जोडून वाशिम हा स्वतंत्र जिल्हा केला. यांचे क्षेत्रफळ १८३२ चौरस मैल आहे. व लोक संख्या पावणेतीन लक्ष आहे. या खालीं वाशिम व पुसद असे दोनच तालुके आहेत व जिल्ह्याची एकंदर जमाबंदी ३०२४१९ रुपये आहे.

वाशिम हा गाव अकोल्यापासून दक्षिणेस २५ कोसांवर आहे. सुमारें १२ कोसांवर पातुराचे पुढें मेडशीचा घाट चढून जावा लागतो. चढण थोडी आहे व सडक चांगली आहे त्या मुळें वाहनांवरून उतरावें लागत नाहीं. घाटावरील मुलखास ह्मणजे वाशिमाकडील प्रांतास वऱ्हाड ह्मणण्याचा जुना परिपाठ नाहीं. तिकडील लोक घाटाखालील भागास मात्र वऱ्हाड ह्मणतात. व वाशिमाकडे अजूनही तसें बोलण्याचा पाठ आहे. तात्पर्य सांगण्याचे हें कीं, हवा, पाणी, देखावा, लोकरहाटी इत्यादि कांवरून स्वाभाविकच हे दोन वेगवेगळे देश दिसतात.

वाशिमाचे दक्षिण हद्दीवर च्यार कोसांवर निजाम सरकारचा मुलुख आहे. व हिंगोली, नांदेड, नरशी वगैरे त्यापैकीं मोठाले गाव लगत्यास आहेत. हिंगोलीस इंग्रज सरकारचे सैन्याचा मोठा तळ आहे. व वाशिमाहून तेथपर्यंत सडक आहे. वाशिमाकडे सर्व जिल्ह्याभर डोंगर आहेत. व त्यामुळें रस्ते वाईट आहेत. हवा पुण्यासारखी आहे. बहुधा खानदेश व वाशिम एकाच अक्षांशावर आहेत. परंतु खानदेशांत सपाटी फार त्यामुळें उष्णता अधिक आहे व इकडे डोंगर आणि झाडी फार यामुळें थंडावा अधिक आहे.

वाशिम हा गाव बराच मोठा आहे पण त्यास पूर्वींचा तजेला नाहीं व मोठी गडबड नाहीं त्या मुळें सर्वत्र सामसूम दिसते. तरी ब्राह्मण वस्ती मोठी आहे. व त्याचे रहाणें निर्मळ आहे व त्यांच्या स्त्रिया अकोला, उमरावती वगैरे जिल्ह्यांतील वऱ्हाडी स्त्रियांप्रमाणें ओंगळ दिसत नाहींत. वाशिमास अमराई पुष्कळ आहे, दोन तीन तळीं आहेत, पाणी पाचक चांगलें आहे. व हवा मोठी सुखकारक आहे. म्युनिसिपाल कमिटी आहे व तेथें सडकांचे वगैरे बेतबात बरे आहेत. वाशिमास सरकारी कचेरी फार सुंदर बांधली आहे. तिला अजमासें ६०००० रुपये खर्च लागला असावा.

वाशिम जिल्ह्यांतील कित्येक खुणांवरून व पुराणांवरून असें दिसते कीं, जुन्या काळीं ही मोठी पवित्र भूमी होती. व बहुत ऋषी वगैरे त्या जगत्यास रहात होते.

पद्मपुराणामध्ये वत्सगुल्ममहात्म्य ह्मणून एक प्रकरण आहे तें सर्व वाशिमाविषयीं आहे. संस्कृत ग्रंथ बराच मोठा आहे. त्याचे अध्याय चाळिसांहून अधिक असून श्लोक संख्याही दहा बारा हजार आहे. त्यावरून असे दिसतें कीं वत्सगुल्मशद्बाचा अपभ्रंश होऊन वाशिम हें नांव झालें. हें वत्सऋषीचें तपोवन होय. असे ह्मणतात कीं, या ऋषीनें बहुतकालमर्याद तपश्चर्या केली ती इतकी कीं त्याचे अंगावर गुल्म ह्मणजे वारूळें वाढलीं. तेव्हां तेहतीसकोटि देव शिवास शरण गेले. मग शिव येऊन त्यांनीं वत्सऋषीची स्थिती पाहिली तो त्यांस करुणाश्रु आले. त्याची विहीर झाली. व तेथुन दोन कोसांवर तें उदक फुटून काटे या नावाच्या गावाजवळ त्याची नदी वाहू लागली व तिला काटेकरुणा असें नांव आहे. तसेच वत्सऋषीच्या आश्रमाचे जागीं हल्लीं करुणेश्वर नामें शिवाचे देवालय आहे. पद्मतीर्थ ह्मणून ज्या तळ्यास हल्लीं ह्मणतात. व जें बांधून सुमारें ४०० वर्षें झाल्याचें सांगतात, तेथील पाण्यानें कर्नाटकचा राजा वासुकी याचें कुष्ट गेलें. तेव्हां जवळच वशिष्ठऋषीचा आश्रम होता. तेथें जाऊन राजानें त्यास विचारितां त्यानें वत्सगुल्म पंचक्रोशीचें हें महात्म होय असे सांगितलें अशी पद्मपुराणांत कथा आहे.

मि० लायल साहेब कमिशनर व वऱ्हाड ग्याझीटियरचे कर्ते लिहितात कीं या पद्म तीर्थाचे पाण्यांत असा कांहीं विशेष गुण असल्याचें आह्मांस आढळत नाहीं. तथापि तीर्थ ह्मणून पर्वणीच्या दिवशीं बहुत लोक तेथें स्नानास जातात. हिंदु लोकांत असें मानिलें आहे कीं या तळ्यामध्यें कांहीं जिन्नस टाकिला असतां त्याचा दगड बनतो.

वाशिमचा अलिकडील काळचा इतिहास ह्मणण्या सारखा कांहीं ठाऊक नाहीं. एथील देशमुखाचे घराणें जुन्या काळचें नामांकित आहे. सतराचे शतकामध्ये या देशमुखाकडे मोगल सरकाराकडून जमिनी व इतर हक्क पुष्कळ होते. व दक्षिण वऱ्हाडांत याची मानमान्यता फार होती.

कांहीं काळ वाशीम प्रांतीं निजामसरकार व भोसले सरकार यांचा साठ चाळिशीचा अंमल होता. नंतर तेथें निवळ निजाम सरकारचा अंमल झाला. व त्या वेळीं या जागेस बरेच महत्व आलें. कांहीं फौजेसहीत येथें एक नायब रहात असे. नाणें पाडण्याची टंकसाळा येथें होती. हल्लीं इंग्लिश सरकारचे अमलांत हे जिल्ह्याचे सदरस्टेशन झालें आहे व याखालीं वाशिम व पुसद असे दोन तालुके आहेत वाशिमची खानेसुमारी ८९३१ आहे

वाशिमास बालाजीचें देवालय फार उत्तम आहे त्याचें वर्णन व इतिहास पुढील अंकांत सांगू.

## कायद्याविषयीं माहिती.

वऱ्हाडामध्यें जे कायदे चालू आहेत व त्यांचे संबंधानें जे सरक्युलर हुकूम व ठराव वगैरे झाले आहेत त्यांच्या, माहिती विषयीं मे० लायल साहेब माजी कमिशनर यांनीं ला म्यान्युअल नावाचे एक पुस्तक छापले आहे त्याच्या आधारानें राजकीय व्यवहार संबंधी कांहीं कांहीं माहिती आह्मी आपले पत्रांत लिहीत जावी एतद्विषयीं बहुत गृहस्थांकडून आह्मांस सूचना आल्या होत्या त्याजविषयीं विचार करून लोकांचे उपयोगासाठीं तशा प्रकारची कांहीं कांहीं माहिती आह्मी आपले पत्रांतून देण्याचा विचार आजपासून केला आहे. व अशी माहिती इतर कोणाकडून आल्यास ही आह्मी ती आपले पत्रांत अवश्य घेत जाऊ.

### अडमिनिस्ट्रेटर जनरल.

अडमिनिस्ट्रेटर जनरल विषयीं दोन कायदे आहेत. एक सन १८६७ चा २४ वा व दुसरा सन १८६९ चा १९ वा. पहिल्यामध्ये अडमिनिस्ट्रेटर जनरलचे अधिकार व त्यांणीं काम कसें चालवावें हें सांगितलें आहे. व दुसऱ्या ह्मणजे सदरील २४ व्या कायद्यामध्यें सांगितलें आहे कीं, अमानी हैद्राबाद मुलुख मुंबईच्या अडमिनिस्ट्रेटर जनरलच्या सत्तेंत दिला आहे.

या कायद्याचा उद्देश मयत मनुष्यांचे मालमिळकतीची वहिवाट कोणते प्रकारें व्हावी याविषयीं आहे. त्यांतील तात्पर्य—

१. हिंदु, मुसलमान, बौध्द, अथवा दुसरे लोक ज्यांस सन १८६५ चा १० वा आक्ट मुद्दाम लागू केला नाहीं त्यांच्या मरणानंतर त्यांच्या मालमिळकतीचे वहिवाटीविषयीं—जिल्हा जडजाचे ताब्यातील मुलखांत अशा प्रकारचा कोणी मरण पावला तर त्यांणीं ती मालमिळकत आपले ताब्यांत घ्यावी. किंवा तिजवर एक देखरेख करणारा नेमावा व अडमिनिस्ट्रेटर जनरल यांकडे रिपोर्ट करावा. जर मयताचें मृत्युपत्र नसेल आणि त्याची मालमिळकत १००० रुपयांहून अधिक किमतीची असेल तर वारशाविषयींचा कायदा सन १८६५ चा १० यांतील २९वे बाबेप्रमाणें ज्याला वहिवाटीचा हक्क आहे त्यानें, किंवा कोणी वारस नसेल तर अडमिनिस्ट्रेटर जनरल यांणीं हायकोर्टास तसा अधिकार मिळण्याविषयीं लिहावे.

२. मालमिळकतीची किंमत एक हजाराहून कमी असेल तर अडमिनिस्ट्रेटर जनरल मालमिळकत आपलेकडे असल्या विषयीं सार्टिफिकेट देतील.

३ जर मृत्युपत्र निघेल तर तें ज्याचे नावानें असेल त्यानें जिल्हा कोर्टांत अथवा हायकोर्टांत खरें ठरवून घेतलें पाहिजे. प्रोबेट ( खरेपणाचा दाखला ) मिळे पर्यंत ती मालमिळकत जिल्हा जडजाचे ताब्यांत राहील.

४ जिल्हा जडज मृत्युपत्राचे प्रोबेट अथवा वहिवाटीचा अधिकार आपले हद्दींत राहणाऱ्या मनुष्यास देतील. मग त्या जिल्ह्यातील त्या मयताच्या सर्व मालमिळकतीवर त्या प्रोबेटचा किंवा अधिकार पत्राचा अंमल चालेल. हायकोर्टाचा अधिकार प्रत्येक जिल्हा कोर्टाशी मिळून आहे.

हिंदु, मुसलमान, बौध्द, व सन १८६५ चे १० वे आक्टानें मुद्दाम वगळलेले मयताचे माल मिळकतीचे वहिवाटी विषयींचे नियम.

१ कोणी मनुष्य वारस जवळ नसतां मरण पावेल तर पोलिसानें त्याची सर्व मालमिळकत डे० कमिशनराकडे पाठवावी.

२ एक वर्षाचे आंत कोणी त्या मालमिळकतीवर वारसा न सांगेल तर जिल्हा जडजानीं सरकारास त्या विषयीं रिपोर्ट करावा.

३ सन १८६० चा आक्ट २७ प्रमाणें जिल्हा कोर्टास मयताच्या माल मिळकतीच्या संबंधांतील लोकांचा हक्क पाहण्यास अधिकार आहे. ते लोक हिंदुस्थानांतील वारशाचा आक्ट ज्यास लागू नाहीं असे मात्र असले पाहिजेत.

हें पत्र अकोला येथें खंडेराव बाळाजी फडके यांचे व. स. छा. छा. प्र. केलें.

Registered No. 7—1873.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० १८ माहे जानेवारी सन १८७४ इ० अंक ३.

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| | रु० |
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहशिल. | |
| वर्षाचे अगा | |
| अखेर | |

नो

मराठी, दर
सीच नोटि
इंग्लिश लि
,, दुसरे खे

उमेदव
नाहीं.

सन
जिल्ह्याचा
मेहेरबान
ख २८
वी रोजीं
माहिती प
लेपूर्वी ८
हेबाचे क
१९ डिसे
अकोट.
बिष्णु सा
झार्क आ

### नोटिस.

नोटिस.—दयालुबाई मर्द दयालचंद खत्री राहणार पेठ उमरावती यांस भोळाराम वल्लद पुरणचंद खत्री राहणार खंडाळे तालुके बाळापूर याजकडून देण्यांत येते कीं तू आमची भावजइ आहेस व तुमच्या आमच्या समाईकांत वडिलार्जित घर जुने वसईजवळ आहे. कामाकाजानिमित्त आम वहिवाट इकडे असल्यामुळें तू त्याची वहिवाट करतेस परंतु हल्लीं असे ऐकण्यांत आलें कीं तूं तें सगळें घर कोणाला धर्म करणार आहेस तसें असल्यास या नोटिसीने तुजला मुद्दाम कळवितों कीं सदरहू घरांत आमचा दोन हिशाचा व तुझा एक हिशाचा हक्क आहे सबब आमच्या मालकीचे घर तूं देऊन टाकण्यास मुकत्यार नाहीस तुला पाहिजे असल्यास तूं आपले भागाचा खुशाल धर्म कर इतक्याउपर तूं आमचे दोन हिसें कोणाला धर्म केले तर तुजवर दिवाणींत दावा करूं व खर्च आणि नुकसान सर्व भरून घेऊ कळावे तारिख १४ माहे जानेवारी सन १८७४ इसवी.

(सही) भोळाराम पूरणचंद खत्री

दस्तुर खुद.

इंदूरचे होळकर सरकार पुण्यास गेले आहेत. त्याजकरितां त्या शहरच्या लोकांनीं फडतऱ्यांचे वाड्यांत सभा करून त्यांत मोठ्या इतमामानिशीं बोलाविलें व
 एक मानपत्र दिलें. तें त्यांनीं
रून त्यावर यथोचित उत्तर दिलें.
 प्रकार ज्ञानप्रकाशाचे आधारें
आपले वाचकांस कळवितो.

## न्महाराज बाबासाहे
## तुकोजीराव होळकर
## बहादर सरकार
## इंदूर

### महाराजांचे शेवेशीं.

ताधारक पुणे शहरांतील सर्व लोक
 विज्ञापना विशेष. आपली स्वारी
दिवसांनीं या शहरांत आली येणें
आह्मास फार आनंद झाला आहे.
र्षांपूर्वीं आपली सडी स्वारी येथें
गेली. त्या वेळेस आपल्या भेटी
भ येथील लोकांस झाला नवता,
नंतर राज्य कारभाराच्या भारामुळें
देशांत आपलें आगमन झाले नाहीं.
 कुलदैवत या प्रांतीं आहे त्या यो-
सहपरिवार इकडे हल्लीं येणें झालें
 ह्मणून परम नम्रतेनें व आदरानें
 स्वागत करण्याचा येथील रहिवाशी
स फार उल्हास वाटत आहे. ई
कृपेनें आपल्यास पुत्र संतती होऊन
ली स्वारी पुत्रासहवर्तमान हल्लीं या
त देवदर्शनास आली. व आप
 शरीरप्रकृतीस परमेश्वरानें आरोग्य
 हे पाहून आह्मास फार संतोष झाला
.
मानी राज्यांत पुण्याचे लोकांशीं आपले घराण्याचा जो संबंध तो पेशव्यांचें राज्य लयास गेल्यामुळें नाहींसा झाला. तथापि आपल्या आगमनामुळें तो संबंध नाहींसा झाला वाटत नसून आपली स्वारी आल्यामुळें आपल्या पूर्वींच्या ऐश्वर्याची स्मृति होत आहे. मूळ शिवाजी महाराजांनीं जो वृक्ष लाविला व ज्यांस पेशव्यांचे घराण्यांतील पुरुषांनीं सिंचन करून वाढविला तो वृक्ष हल्लीं नठून गेला आहे तत्रापी त्याच्या पारंब्या दूरस्थ प्रदेशीं रुजून लक्षावधी प्रजेस सावली देत आहेत. ह्या विचारानें आपल्या पूर्वींचा आश्रय आह्मास तुटला नहीं असाच भास होतो.

आपल्या थोर घराण्यांतील मूळ पुरुष श्री० मल्हारराव होळकर यांचा शूरपणा, व त्यापुढील कारकिर्दींत श्रीमन्मातोश्री अहिल्या बाईसाहेब यांचें वात्सल्य व औदार्य, व तुकोजीराव होळकर यांची एकनिष्ठ शिपाईगिरी, इत्यादि गुणांची ख्याती व लौकिक मराठी राज्याचा इतिहास जाणणाऱ्या पुरुषांस श्रुत आहे. अशा थोर कुळांतील आपण ब्रिटिश सरकाराशीं दोस्ती राखून त्याप्रमाणें आपल्या कुळास भूषण देण्याजोगें नेहमीं आपल्या राज्याचें काम स्वत: मेहेनत घेऊन दक्षतेनें पाहतां, व आपल्या पुत्रांकडून उत्तम प्रकारचा विद्याभ्यास करवितां असा लौकिक आहे. प्रस्तुत आपल्या राज्यांत शहाणे व हुशार असे कारभारी व दुसरे अधिकारी नेमून सुधारणेचा क्रम चालू केला आहे येणेंकरून आह्मास फार समाधान वाटत आहे. हा क्रम उत्तरोत्तर असाच चालू रहावा व या विस्तीर्ण देशांतील सर्व एतद्देशीय संस्थानांत अशीच दिवसानुदिवस आबादीची व सुधारणुकेची वृद्धि होत असावी अशी आमची ईश्वराजवळ प्रार्थना आहे.

आपल्या राज्यांत उत्तरोतर आबादी व्हावी आणि ईश्वरानें आपली व आपल्या पुत्रांची तंदुरस्ती ठेऊन आपणा सर्वांस दीर्घायू करावें, व आपलें राज्य चिरकाळ चालावें अशी रात्रंदिवस आह्मी ईश्वराची प्रार्थना करीत आहों.

हें पत्र पुण्यांतील सर्व लोकांनीं आपल्यास विनयपूर्वक सत्कारार्थ लिहिलें आहे. कृपा करून आपण स्वीकार करावा अशी आह्मा सर्वांची विनंती आहे. मित्ती पौष वद्य ८ रोज रविवार शके १७९९ श्रीमुखनाम संवत्छरे ता० ११ जानेवारी सन १८७४ इसवी शुभ होय हे विज्ञापना.

मानपत्र वाचल्यावर तें भरजरीच्या थैलींत घालून महाराजापुढें ठेविलें. त्याचा महाराजांनीं स्वीकार केल्यावर त्यांच्या आज्ञेवरून चीफ जस्टिस रा० रा० धोंडो शापराव गद्रे यांणीं त्याजवरील उत्तर वाचलें तें येणें प्रमाणें.

### उत्तर.

ह्या प्रसिद्ध व पुरातन मराठ्यांचे राजधानींतील तुह्मीं एतद्देशीय लोकांनीं दिलेल्या मानपत्राचा आह्मी मोठ्या उत्साहानें स्वीकार करतो. आमचे घराण्याचा ह्या शहराशीं पूर्वापार निकट संबंध आहे हे इतिहासावरून तुमचें ध्यानांत आहेच.

सांप्रत बहुत दिवसांनीं आमचें आगमन या प्रांतांत झाल्यामुळें चोंहोकडील सुधारणा आह्मास विशेष दिसत आहे. ह्या सुज्ञ व दयाळू ब्रिटिश सरकारचे राज्यांत लोकांचे सुखवृद्धीचे अनेक उपाय चालू आहेत. विद्या शिकविणें हें सरकारचे मुख्य कर्तव्य समजलें जाऊन विद्येचीही बरीच वृद्धी झाली आहे. उपयुक्त विषयांची माहिती असणारे लोक बरेच आढळतात. लोकांचे मन विद्या संपादण्याकडे ज्यास्त वळलें आहे. नवीन शोध लावावे, सर्वत्र उपयुक्त विचार करून तज्जन्य ज्ञान उपयोगांत आणावें अशा तऱ्हेची उत्कंठा सगळीकडे उत्पन्न होत चालली आहे. आणि आमची पक्की खात्री आहे कीं, देशकल्याण व लौकिक हीं दोन्हीही यापासून संपादन होतील.

हस्तकौशल्याचे उद्योग चालू करून स्वदेशांतील व्यापाराचे पुनरुज्जीवन करण्यास तुम्हांपैकीं कित्येक झटत आहेत. हें पाहून आह्मास बहुत समाधान वाटतें. सांप्रत आरंभ झाला तरी पुढें या कामांत यश मिळेल अशी आमची आशा आहे.

प्रस्तुत हिंदुस्थानांत जे सुधारणुकेचे उद्योग चालू आहेत. त्याच्या लाभांचा वाटा स्वराज्याकडेसही थोडाबहुत येत आहे. स्वराज्यांत पुरातन रिवाज न मोडण्याविषयीं विशेष उत्सुकता असते तरी, परंतु त्यास बाध न येतां अलिकडील सुधारणुकेचीं जीं जीं कलमें घेण्यासारखीं आहेत त्यांचा जरूर स्वीकार केला पाहिजे. आतां आमचे मनाचे ठायीं पक्का निर्णय होऊन कायद्यानुसार आपले राज्यांत सुधारणा करण्याचा आम्ही क्रम सुरू केला आहे त्यास अनुसरून ज्या आम्ही तजविजी केल्या त्याकडे तुमचें लक्ष्य पुरून त्या तुह्मास पसंत आहेत हें ऐकून आह्मास फार संतोष झाला.

तुमची उत्तरोत्तर वढती व्हावी ही आमची इच्छा आहे. हिंदुस्थानांत ह्या महाराष्ट्र देशांतील लोकांचें नांव लहान आहे असें नाहीं. तुह्मांत कालमानाप्रमाणें प्रसिद्धि येण्यास जे मार्ग आहेत त्या मार्गांनीं प्रसिध्द होण्याची शक्ति आहे याकरितां देशांत शांतता असतां जे उद्योग चालतात त्या सर्वांत श्रेष्ठत्व तुह्मास मिळावें हा आमची आशा आहे.

तुह्मी आमच्याविषयीं व आमचे घराण्याविषयीं ज्या गोष्टी लिहिल्या त्याबद्दल मनःपूर्वक तुमचे आभार मानितों व तुह्मी अत्यादरें आमचें जें स्वागत केलें त्यापासून आह्मांस बहुत संतोष झाला. तुमचे सर्वांचे निरंतर कल्याण असावें ही आमची इच्छा आहे.

त्या नंतर पांच मिनिटें नाच झाला. त्या संधींत महाराजांनीं असें सुचविलें कीं, आज सर्वांनीं आदर पूर्वक सत्कार केला. येणेंकरून आह्मास संतोष झाला आहे व ह्या प्रसंगाची आठवण आह्मास निरंतर राहील इत्यादि बोलणें झाल्यावर विडे, हार, गजरे, अत्तर गुलाब वगैरे स्वारी बरोबरच्या स्वार वगैरे सुद्धां दिलें. शेवटीं सर्व मंडळीचे तर्फें रा. रा. गंगाधर विश्वनाथ गोखले यांणीं विनंती केली कीं, आज येथें येऊन महाराजांनीं आमच्या आदराचा स्वीकार केला येणेंकरून आह्मावर मोठे उपकार झाले आहेत. याप्रमाणें समारंभ झाल्यावर स्वारी उठून सर्वांचे मुजरे घेत गेली. त्यास पोंचविण्याकरितां पूर्वीप्रमाणेंच मंडळी गेली होती. ज्ञा. प्र.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. आपणास कांहीं अधिकोत्तर कळविणें जरूर वाटल्या वरून लोकांचे दु:ख

आणि सुख प्रगट करण्यास आपले पत्र द्वारां मार्ग सुलभ असून कर्तव्यकर्म आहे कीं, लोकांनीं कमी जास्ती प्रकार दर्शित केलेला ऐकावा व प्रगट करावा त्यापासून सरकारास व सरकारी काम करणारे लोकांस ती गोष्ट प्रसिद्ध होऊन कांहीं अंशीं खरा प्रकार निदर्शनास येतो.

आलीकडेस फारिष्ट खातें मेळघाटांत सुरू होऊन बरेच दिवस झाले व दिवसेंदिवस सुधारणा विशेष होत चालली या योगानें गरीब जे नेहमी पहाडांत राहणारे व शुध्द जंगलच्या वस्तूंवर पोट भरणारे लोक गोंड, भील, कोरकू, हालनि, अहीर, पधान निपलज इत्यादि जातीचे सातपुड्या पहाडाचे खोऱ्या दऱ्यांत राहून जंगली पदार्थ आणून किंवा इमारती लाकडें वगैरे आणून पोट भरतात त्यांत कांहीं गाडे, कडासा व बांबु वगैरे बाजाराच्या गावीं आणून विकतात व त्या विकत घेणारापासून सरकार नियमाप्रमाणें महसुल घेतात अशी येक रीत चालू केली आहे; परंतु निवळ गरीब स्त्रिया व निवळ वृध्द अज्ञान मुलें इत्यादि डोक्यावर ओझें आणणारे हलके पदार्थ ह्मणजे दिवसभर पाहाडांत व्याघ्राचे भयांत भयंकर अरण्यांत जाऊंन काय एक मनुष्यास ओझें उचलेल इतके कांहीं पदार्थ मिळवावे तेही मोठ्या प्रयासानें अंगुष्टापासून मस्तकापर्यंत घाम आणून व श्वासोश्वास दाटून पैदा करितात व त्यावर आपला निर्वाह करितात. त्या वस्तूंस बाजारच्या गावीं किंवा मोठ्या गावीं दहा पांच कोस जाऊन येण्या जोगे श्रमास सरकारानीं शिरबोजास महसूल मुक्रर केला आहे तो येणेंप्रमाणें—शिंदीच्या पानोळ्या, सागाचे पानांचा विडा, चार, बोरें, आवळे, टेंब्र, बिबें, हिरडे, रिठें, हिंगणबेटें, सादडयाच्या साली, बाभळीच्या साली, कांहीं वस्तूंच्या मुळ्या, इत्यादिक पदार्थांवर सरकारानीं शिरबोजास कर बसविला आहे व तो जरी एक आणा दोन आणे आहे तरी त्या विचाऱ्या लोकांस हा जुलमा सारखा वाटून तेही देण्यास सिद्ध असून सरकारानें बाजार गाव मुकर केले त्या ठिकाणींच माल न्यावा इतर ठिकाणीं नेल्यास दंड व माल हरास. अशा प्रकारें सुमार ५० मनुष्यांवर दोन महिन्यांत अडगाव कोर्टांत फौजदारी मुकदमे होऊन दंडाच्या व कैदच्या सजा त्या लोकांस मिळाल्या त्या लोकांची स्थिती पहाल तर अंगास वस्त्र नसून पुरतें अन्न खावयास पोटभर भेटत नाहीं. त्यांस कायदा व रीतभात सरकारची काय माहीत. अशा प्रकारच्या कचाटयांत गरीब बाबालवृद्ध, स्त्रिया पुरुष हायतोबा करून पोट कशानें भरावें ह्मणून रडत असतात. तसाच दुसरा मोठा जुलूम आहे कीं बाजारच्या गावाशिवाय दुसऱ्या गावीं जाऊन विकूं नये असे क्षुलक नाशिवंत पदार्थ कांहीं दिवस राहिले तर कांहीं उपयोग होण्या सारखा आहे काय? नाहीं. याचा योग्य विच्यार होऊन गरीबाची दाद लावितील च. मी त्यां लोकांस अर्ज सरकारास करण्याविषयीं ह्मटलें असतां "कोणता सरकार बोलखावा, अर्ज कशास ह्मणतात, आंत काय लिहिलें पाहिजे, कागद आणण्यास कोण्या शहरास जावें, टिकिट आणावयास हैद्राबादेस गेलें पाहिजे कीं काय? सोडिला बापा अर्ज" असें ह्मणून निघून गेले. अशा पशुवत् मनुष्यांची दाद लागणें महा कठीण ह्मणून आपल्यास श्रम दिले आहेत. उमेद आहे कीं, आपल्या पत्राच्या येत्या अंकीं जागा द्याल. खरेखर, त्या लोकांचा व्यवसाय अगदी बंद होऊन ते दिलगीर व उपवाशी बसले आहेत. दिवसभर मेहेनत केली असतां चार आण्याचा देखील माल सापडावयाचा नाहीं, त्यांणीं आणा किंवा दोन आणे कोठून द्यावे? गरिबांवरील अशा करापासून सरकारचा फायदा विशेष आहे असें ही नाहीं. एकंदर सालीना शंभर किंवा दोन शे रुपयांहून अधिक या क्षुल्लक वस्तूंवरचे कराबद्दल उत्पन्न होणार नाहीं. जेथें गाडी बैल, उंट, गाढव, हेले अशा प्रकारचे बोझ्यांस कर लाविला आहे, तेथें तो एक वेळचा कबूल होईल; परंतु शिरबोजास माफी असण्याविषयीं आपण भरपूर अभिप्राय द्याल अशी आशा आहे. व हा आपला हेतू सिद्धीस जाईपर्यंत उल्हासानें आपण झटतील तर गरीब लोक आपणास दुवा दिल्यावाचून उगे रहाणार नाहींत. कळावें. तारीख १२ जानेवारी सन १८७४ इसवी.

पर्वताचे दरींत वास करणारा
एक वऱ्हाडी.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

कारंजाहून—वि. वि. येथील नवीन असिस्टंट कमिशनर मि॰ ताजुद्दीन साहेब येथें येऊन आपले कामावर रुजू झाले. हे उत्तम स्वभावाचे असून मोठे सद्गृहस्थ आहेत. यांची काम करण्याची शैली ही बरी आहे परंतु मी त्यांस थोडीशी विनंती करितो कीं, त्यांनीं रा. बापुजी रंगनाथासारखा हाताखालील लोकांवर व आमचे सारखे च्यांडाळ चवकडींतील लोकांवर दाब ठेवावा; नाहींतर जो जो मऊ जमीन सांपडेल तो तो लोक बोटानें उकरण्यास कमी करणार नाहींत असें होऊं. नये याजकरितां माझे विनंतीकडेस लक्ष देतील अशी आशा करीत आहे.

काय एडिटरराव कामदार लोकांशी स्नेह करणें फार वाईट आहे. पहा बरें रा. रा. बापुसाहेब यांणीं थोडके कालांत येथील लोकांस मित्रत्वाचा कसा चटका लाऊन दिला. काय सांगावें जिकडे शहरांत पहावें तिकडे बापुसाहेबांचा लोकांस निजध्यास लागून गेला आहे. व कितियेक असें ह्मणतात कीं, असा सरदार पुन्हा या हतभागी कारंजे शहरास कोणी येईल असें वाटत नाहीं व आशाही करावयास नको. व ज्या दिवशीं लोकप्रिय मित्रबांधव यांची स्वारी गेली त्या दिवशीं लोक यांस पोंचवण्याकरितां इतके गेले होते कीं त्यांस जाण्यास मार्ग देखील मिळेना. सरते शेवटीं गावाबाहेर स्वारी गेल्यावर रा॰ रा॰ बापुसाहेब यांणीं जाण्याची आज्ञा मागितली. त्या समयीं लोकांचे नेत्रावाटे अश्रुपात होऊं लागले, परंतु करतात काय, निरुपाय आहे कीं, कामदार लोक एक वेळ गेले ह्मणजे पुन्हा त्यांची येण्याची आशा नको. याप्रमाणे सर्व लोकांस दुःख जहालें आहे.

पत्रकर्ते महाराज, माझे ऐकण्यांत असें आलें आहे कीं, येथील हेड मास्तर रा॰ पुरुषोत्तम गणेश केळकर यांची नेमणूक उमरावती येथील डे. कमिशनर यांचे क्लार्क आफ दि कोर्टचे जागेवर होणार अशी वदंता उठली आहे. तर ईश्वर करो आणि ती खरी ठरो. कारण या शिक्षकीखात्यांतून मुलकी खात्यांत जाणें ह्मणजे मुसळाला अंकुरच फुटणें आहे.

एडिटरराव, येथील एक दोन सडकावर फाल्गुनाचा महिना आला नाहीं तोंच गुरुमहाराजांची स्वारी कंबरा बांधून तयार आहे. जर इकडेस आमच्या म्युनिसिपलआका लक्ष देतील तर इच्छा तृप्त होईल. कळावें पत्रविस्ताराची माफी असावी ही विनंती हल्लीं मुक्काम कांबरगाव.

आपला वेडा पीर.

---

## वऱ्हाडसमाचार

मिती पौष वद्य ३० शके १७९५.

## स्वदेशी मेणबत्ती.

आमचे मित्र रा॰ रा॰ वासुदेव गणचंद्र मोहनी स्कूलमास्तर पिंपळनेर जिल्हा खानदेश यांनीं नवीन प्रकारच्या मेणबत्त्या तयार केल्या आहेत व त्यां पैकीं एक मेणबत्ती त्यांनीं आह्मांस पाहावयास पाठविली आहे.

ही मेणबत्ती आकृतीनें व जाडेपणानें साधारण इंग्रजी मेणबत्ती सारखीच आहे, रंग मात्र हिरवा आहे. सोंवळ्यांत घेण्यास निर्दोष आहे, पेट पहिल्यानें ही कमी घेते आणि ओघळत आल्यावर चांगली जळूं लागते. ह्मणून आह्माला वाटतें कीं हिच्यांत आणखी कांहीं सुधारणा झाली पाहिजे. ज्योतीनें बत्तीच्या एका बाजूचें कांहीं मेण घसरून खालीं लोटिल्या शिवाय हिची चांगली ज्योत निघत नाहीं. यावरून असें दिसतें कीं, ज्योतीच्या उष्णतेनें जितके वेळांत जितकें मेण वितळतें तितक्या वेळांत तें तितकें ज्योतीकडे आकर्षिलें जात नाहीं यामुळें तें पघळून खालीं येतें. व त्यांत सुधारणा न केली तर सुमार निमी मेणबत्ती व्यर्थ जाईल. तसेच या बत्तीचें मेण हातास जरा अधिक चिकट लागतें. व विजवितांनां जरा गंधी येतो व थोडा वेळ कोजळी शिल्लक राहते इतक्या गोष्टींची वासुदेवरावास सुचेल तर किंवा आमचे इतर कोणी परोपकारी मित्र याबद्दल त्यांस कांहीं सल्लामसलत देतील तर या मेणबत्त्या फार उत्तम होतील. जी मेणबत्ती आह्मांकडे आली ती साच्यांत ओतलेली नव्हती तरी इतकी सुबक होती कीं, सोबतच्या पत्रावरून व रंगावरून मात्र आह्मांस ती नवीशी दिसली. प्रथमच प्रयत्नांत ही इतकी चांगली केली याबद्दल वासुदेव रावांचे आह्मी तारिफ करितों. हिच्या विषयींचा इतिहास वासुदेवराव आतां लोकांपुढें ठेवतील तर बरें होईल व ही तयार होण्यास खर्च किती येतो तेंही कळलें पाहिजे कारण विलायती बत्ती अर्धे आण्याला मिळते आणि ही तिच्याहून कमी दरानें मिळाली नाहीं तर लोक घेण्यास फारसे झटणार नाहींत सबब तेंही खुलासा कळाला तर चांगलें होईल.

हे काम आमचे मित्र वासुदेवराव यांजकडून उत्तम प्रकारें होण्यासारख्या खात्रीचे त्यास वाटत असेल तर आम्ही त्यांस मालाच्या खपाविषयीं [illegible] करण्याविषयीं होईल तेवढी खटपट करूं. व दुसरेही त्याचे कित्येक मित्र याप्रमाणें करितील असा आह्मास भरवसा वाटतो. सबब त्यांणीं यश येण्याची हुरूप असल्यास अवश्यमेव या कामाच्या पाठीस लागावें अशी आह्मी त्यांस शिफारस करितो. तरी इंग्रज लोकांकडून मात्र कांहीं माहिती किंवा पुस्तक मिळण्याची आशा त्यांनीं करूं नये त्या विषयीं त्यास आह्मी एक गोष्ट सांगतो.

पुण्याचे रा. विष्णु मोरेश्वर थत्ते हे मागें कांहीं दिवस शाई करून विकित होते. तेव्हां त्यांणीं असें मनात आणिलें कीं, युरोपियन लोक शाई विकावयास पाठवितात तिच्या बरोबर लागलीच एक दौत पाठवितात. ह्मणजे एका कामांत त्यांच्या दोन मालांचा खप होतो. तर आपणही दौती कराव्या ह्मणून प्रयत्न चालविला. तेव्हां प्रथम कुंभाराकडून कांहीं एका विशेष आकाराचीं बोळकीं करवून तीं भाजून घेतलीं. व त्यांतून शाई भरून टेविली. दुसरे दिवशीं पहातात तों अक्षतृतीयेच्या उदककुंभाप्रमाणें सर्व दौती पाझरून मोकळ्या झाल्या. मग वाटलें कीं, युरोपियन दौतीप्रमाणें त्यांना रोगण पाहिजे मग त्यांनीं त्या दौती आतून लाखेच्या केल्या व त्यांतून शाई भरली. पुढें असें आढळलें कीं, शाईमधील द्रव्ये लाखेला खातात व पुन्हा शाई पाझरू लागते. नंतर चांगल्या चांगल्या रोगणाच्या तजविजीस लागले, पुढें त्यांस असें आढळलें, कीं चांगल्या रोगणाला मातीही चांगली पाहिजे. मग नहर महाबळेश्वरची माती, विजापुरची माती, कऱ्हाडची माती, अमुकएका टकडीची माती, गारा, त्यांचें पीठ इत्यादि परोपरीची माती मिळवून व त्यांस रोगण देऊन "पाटरी" ह्मणजे मातीचीं भांडीं करण्याचा कारखाना सुरू केला. पण शेवटीं युरोपियन लोकांनीं त्यांस या विद्येचे ग्रंथच मिळू दिले नाहींत मुंबईचे गवरनर साहेबांनीं आश्रय द्यावा ह्मणून प्रयत्न झाला होता पण मिळाला नाहीं. थत्ते यांचे मित्र विलायतेस गेले होते त्यांनीं त्यांकरितां पुस्तकाचा बहुत शोध केला पण कांहीं फळ झालें नाहीं व शेवटीं त्यांनीं तें काम अर्धे सोडून दिलें, कारण खर्च फार येऊन काम सुबकपणांत कमी होऊं लागलें. त्यांचीं कित्येक भांडीं आम्हीं स्वतां पाहिलीं आहेत व त्या वेळीं त्यांची तारिफ केल्यावाचून आमच्यानें राहवलें नाहीं. नंतर बिच्याऱ्या गरीब व पण परमोद्योगी मनुष्यास उदास होऊन शेवटीं तो धंदा सोडावा लागला.

कृपाळू परमेश्वरानें आह्मांतून कोणास अशा कृत्यांत अपयश न द्यावें व परोपरीचे उत्तम धंदे आह्मांस आमच्या देशांत निर्माण करण्यास व वाढविण्यास उत्साह आणि शक्ति द्यावी व तद्वारां आमचें वैभव आह्मांस आतां परत द्यावें ह्मणून आह्मी त्याची सोत्कंठ प्रार्थना करितो.

आतां मुंबईकडे इंग्रजी रीतीचे कागद तयार होऊ लागले आहेत, शायी होऊ लागली आहे, पेनसली होऊ लागल्या आहेत, आगीच्या काड्या होऊ लागल्या आहेत, पुण्याकडे साबणाच्या वड्या व मेणबत्त्या होऊ लागल्या आहेत असेच आणखी परोपरीचे जिन्नस इकडे निर्माण करण्यास ईश्वराचे आशीर्वादानें उत्साह मिळो.

## वऱ्हाड

या आठवड्यांत थंडी पडूं लागली आहे. त्यांत संक्रातीपासून तर फारच कडक पडते.

—000—

कमिशनर साहेबांची स्वारी वाशीम जिल्ह्याकडेस आहे. डे० कमिशनर साहेब काल प्रात:काळीं येथें आले.

—000—

नवीन वर्गावर्गी झाल्या प्रमाणें इलिचपुर, कारंजा, खामगांव आणि मलकापूर येथील न्यायाधिश आपआपल्या जागीं जाऊन रुजू झाले.

—000—

शहरच्या पोलिसपट्टीचा चालू सालचा ठराव करण्याकारितां स्पेशीयल कमिटी तीन गृहस्थांची नेमिली आहे. तिचें काम या आठवड्यांत टौनहालमध्यें चालणार आहे. इंजिनिअर खात्याकडून. टौनहाल पुरा झाल्यावर तो रिविन्यु खात्याकडून म्युनिसिपाल कमिटीचे ताब्यांत दिला व म्युनिसिपाल कमिटीनें हल्लीं त्याचें संरक्षणार्थ सहा रुपये दरमहाचा एक शिपाई ठेविला आहे. व मुनसिपल कमिटीचे आफीसही तेथेंच नेलें आहे.

—000—

रा. रा. आत्माराम भिकाजी एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांच्या संबंधानें गेल्या आठवड्यांत आह्मी जो मजकूर लिहिला होता त्याचें इंग्लिश भाषांतर कोणी टाइम्सकडे पाठविलें व तें १९वे तारखेच्या त्यापत्रांत छापिलें आहे.

—000—

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं येथील मिडलक्लास स्कुलावरील हेडमास्तर मि० सुंदर दामोर दवणकर यांनीं आपली शाळा चांगली सुधारली, मुलांची संख्या पुष्कळ वाढविली, व हायस्कूलाकडील परीक्षेंत उत्तम यश मिळविलें या गोष्टीवर त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची नजर जाऊन त्यांस ७५ रुपये पगार होता तो त्यांनीं १०० रुपये करून, येथेंच त्यांस ठेविलें व त्यांच्या स्कुलाची एक ग्रेड वाढविली. हें त्यांस मोठें भूषण झालें. आह्मी मागें एक दोन वेळां असें होण्याविषयीं शिफारस केली होती ती आमचे वाचकांस आठवत असेल.

—000—

आमच्या दस्तुर बाईमनजी साहेबांचे बंधु खान बहादुर दस्तुर नसरवानजी जामासजी दक्षिण देशांतील सर्व पार्शी लोकांचे गुरू ( शंकराचार्य ) व दस्तुर होशंगजी जामासजी यांच्या भेटी पुणे मुकामीं होळकर सरकारांनीं मोठ्या आदरानें घेतल्या. व त्यांस हजार हजार रुपयांचे पोशाग दिला असें आनंदाचें वर्तमान आह्मांस समजलें आहे.

—000—

वाशिमचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर मि० अबदुलहक कर्नाळकर यांविषयीं उपहासास्पद व खोटसाळ असा मजकूर टाइम्स आफ इंडियाच्या एका लिहिणारानें कळविल्यावरून त्या पत्राच्या १९ वे तारखेच्या अंकांत वाचकांस मौज वाटावी या इरादान तो लिहिला आहे. त्यांतील गोळाबेरजेनें भावार्थ असा:—

मि० अबदुल हक हे लार्ड मेयोच्या शिफारशीनें नेमले गेलेले एक अगदीं तरुन गृहस्थ वाशिमास एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर आहेत. ते एके दिवशीं घोड्यावरून जात असतां एका शिपायानें त्यांस सलाम केला नाहीं, त्यावरोबर घोड्याखालीं उतरून त्यांणीं त्या शिपायास चाबकाचा प्रसाद दिला. त्याबरोबर तो होता पंजाबी माणूस त्यानें मग धर गचांडी, दे लाथा, धर शेंडी, दे मुसकाटांत असें करून त्यांस बेदम करून टाकिलें. तेव्हां ते गयावया करून रडूं लागले व त्यांनीं पुष्कळ ओरडाओरड केली पण त्यानें तिकडे लक्ष्य दिलें नाहीं व सोडवण्याकरितांही कोणी जवळ आला नाहीं. शेवटीं एक पोलिसचा हेड कान्स्टेबल त्या ठिकाणीं आला तरी तोही आपणास मार बसेल या धाकानें त्या तंट्यांत शिरेना. या प्रमाणें त्या पंजाबी शिपायानें निर्दयपणानें अबदुल हक यांस खूप तुडविल्यावर त्या हेड कान्स्टेबलानें मध्यें पडून दोघांस दोहो बाजूंस केलें. व मग घायाळ झालेल्या अबदुलहकांस त्याचे घरीं पोचविलें व शिपायावर खटला केला नंतर त्यास तीन दिवसांची शिक्षा मिळाली.

ही हकीकत खरी नसावी व इजपासून मि० अबदुल हक यांस अपमान, बेअब्रू, शरम, व दु:ख वाटावें असा ही लिहिण्याचा झोक आहे असें दिसतें अस्तु. अबदुल हक साहेब याजविषयीं मर्जीनुरूप विचार करतील.

टाइम्स सारख्या नामांकित व श्रेष्ठ पत्रांत ए० असि० कमि० सारख्या थोर गृहस्थाविषयीं बातमीदारांनीं असें अद्वातद्वा लिहावें व तें खात्री लेजि पत्रकर्त्यांनीं प्रसिद्ध करावें हें चांगलें आहे असें आह्मांस वाटत नाहीं. परंतु त्यांस त्या मजकुराविषयीं खात्री असेल तर आमचें कांहीं ह्मणणें नाहीं, पण आह्मांस भरवशासारखी जी बातमी मिळाली तिच्या ही केवळ विरुद्ध आहे ह्मणून ही कल्पना आह्मांस झाली आहे. दुसरें त्या हकीकती वरून लोकांचें असें अनुमान होईल कीं अबदुल्ल हक हे केवळ विचारशून्य आहेत व त्यांस अब्रूची चाड नाहीं तर तसें न व्हावें इतक्या पुरता या गोष्टीचा विचार अबदुल हक साहेब मोठ्या शहाणपणानें करितील व तो लोकांसही कळवितील असें आह्मी इच्छितों.

—000—

अकोट तालुक्यातून आमचे एक मित्र लिहितात कीं, रा० रा० श्रीकृष्ण नरहर यांस अडगावास येऊन ७ वर्षे झालीं. व उत्तरोत्तर त्यांचे दक्षतेनें लोकास उत्तेजन येऊन कोर्ट भरभराटीवर आले होते. परंतु सांप्रतच्या मन्वंतरास अति उत्कर्ष न आवडल्यामुळें रंगदेवता उडविल्यानें पुष्कळ लोकांचें चित्त उद्विग्न आहे.व अलिकडेस न्यायाधिशाची देवता चंचल झाल्यामुळे बदली होण्याची वाट निशिदिनीं पाहून होते तो एकदम एकाएकी स्पेशल ट्रेन येऊन वारद झाली व या जागेहून मोठी योग्यतेची जागा व कामही अनुष्ठपांत, सर्व विषयाचे पचरोट, चांगलीं मनुष्यें नित्यशहा भेटणार, वैभव विशेष अशा उत्तम स्थळीं जाऊन प्राप्त झाले. उत्तम जे पुण्यश्लोक आहेत त्यांजला ईश्वर अशा रीतीनेंच ठेवित असतो व जे कुकर्मी अविच्यारी आहेत त्यांची गति त्यांच्या कर्माप्रमाणेच त्यांस प्राप्त होतें.

—000—

अडगावास एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर कोर्ट स्थापन झाल्यास सुमार ९ वर्षें झालीं त्यांत सन १८७३ या सालांत काम फारच झालें. फिर्यादी ४५००. दरखास्ती ४०००, व टाचाचे अर्ज ५०० होऊन निकालास लागले. या सालच्या फिर्यादींत मारवाडी वादी सुमार २५०० आहेत. कित्येक मारवाडी अडाणी कुणब्या पासून खुशीनें, दिलगिरीनें, जुलमानें साधेल तशी निशाणीची रेघ करून घेऊन मग त्यास सफई बुडवितात मग गरीब बिचारा कुणबी अपील करो, स्पेशल करो त्याची दाद लागत नाहीं त्यास धुडकावले जाऊन मारवाड्यांची जणू काय वडलांची ठेव तो त्यास प्राप्त होते—येथें १२ वकील आहेत त्यांस या साल आखेर सुमार ८००० रुपये फी बद्दल व २००० रुपये इनामाबद्दल मिळाले. वा०

## वर्तमानसार

मुंबईच्या ग्रांट मेडिकल कालेजाचा वार्षिक रिपोर्ट छापून प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून कळतें कीं, तें कालेज स्थापन झाल्याला २८ वर्षें झालीं. त्याचें काम चांगल्या रीतीनें चालत आहे. त्यांत विद्यार्थ्यांस शिकण्याकरितां दरमहा २५ रुपये पगाराच्या ४ जागा १५ रुपये पगाराच्या १० जागा, शिवाय १४ । ११ । १० ५ । ४ रुपये पगाराच्या कित्येक जागा आहेत.

बडोदा रेलवे कंपनीला या महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत ९१५६४ रुपयांचे उत्पन्न झालें. गुदस्त सालीं याच आठवड्यांत ८५१५२ रुपये झाले होते.

श्रीमंत मल्हारराव महाराज गायकवाड यांनीं पौष शुद्ध ८ मितीचा एक जाहिरनामा लावला आहे कीं त्यांचा कोणी कामदार जुलूम जबरदस्ती करीत असेल किंवा लाच खात असेल किंवा दुसरे रयतेस पीडा होण्याजोगें कांहीं कृत्य करीत असेल तर कोणीही त्याबद्दल सरकारांत अर्ज करावेत ह्मणजे त्याचा बंदोबस्त होईल.

जबलपुरचे व्यापाऱ्याला दोन लक्ष रुपयांचे तांदूळ आणि गहू बोवली येथील महाजन लोकांनीं मार्च महिन्यांत पुरऊन देण्याचा मक्ता घेतला आहे.

मुंबईचे गवरनर बाहेर फिरत आहेत ते २१ वे तारखेला परत मुंबईस जाणार.

मुंबईच्या या वर्षाच्या म्याट्रिक्युलेशनच्या परिक्षेंत एक पारशीविद्यार्थी पास झाला. त्याच्या झटून उद्योग करण्याची आह्मी तारिफ करितो. तो उद्योग हा कीं तो विद्यार्थी सतत १० वर्षे म्याट्रिक्युलेशनच्या परिक्षेस येत होता. कित्येक विद्यार्थी एक दोन वेळ नापास झाले ह्मणजे उदासीन व हताश होतात त्यांनी तसें न होण्यास या मुलाचें उदाहरण घेण्या सारखें आहे.

करसनदास मुलजी मरण पावले त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावानें प्रतीवर्षी मुंबई युनिव्हर्सिटीमध्यें नीति किंवा ऐक्य यांच्या संबंधानें उत्तम निबंध लिहून आणणारास १०० रुपये बक्षिस देत जावें असा ठराव झाला आहे व तो मुंबईच्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झाला आहे.

एक आगबोट विलायतेहून मुंबईस येत असतां मार्गांत तांबड्या समुद्रांत फुटली. त्यामुळें आगबोटींतील जितकें सामान बाहेर काढलें त्याचा लिलाव केला त्यांत एक टपालच्या स्टांपानें भरलेली पेठी विकली गेली. पेटींत सुमोरे ४ लक्ष पेक्षां अधिक रुपयांचे स्टांप होते. विकत घेणाऱ्या लोकांस प्रथम कागदांची किंमत समजली नाहीं. परंतु कागद कशाचे आहेत हें किमेकांस समजून, त्यांनीं, मिळतील तितके पुन: खरीद केले व हल्लीं हे स्टांप हिंदुस्थानांत चोरून येत आहेत.

जोधपुरच्या संस्थानांत ज्या ज्या ठिकाणीं दुष्काळ पडण्यासारखा आहे. तेथें लोकांच्या सहायार्थ अन्नछत्रें करण्याचा हुकूम तेथील महाराजांनीं दिला आहे.

दुष्काळामुळें जे लोक देशांतरीं जाण्यास तयार झाले आहेत त्यांच्या ७० पासून १०० मनुष्यांच्या टोळ्या करून आगगाडींत व ते लोक फार असले तर ब्रह्मदेशांत न्यावे, आणि वाटेनें त्यांस सरकारी कोठारांतून खाण्यास द्यावे, असा बंगाल सरकारानें बंदोबस्त केला आहे.

पंजाबांत जेहेलमनदीच्या पैलतिरीं मिठाची मोठी खाण आहे. तीपासून सुमोरे १२ मैलपर्यंत तारेची आगगाडी मीठ आणण्याकारितां सुरु झाली आहे.

देशी लांकडी पेनसिली— दाभाड्यांचे तळेगाव येथील कांहीं वकील वगैरे मंडळींनें लांकडी पेनसिली तयार करण्याचें काम बरेंच पूर्णतेस आणिलें आहे. अद्याप तयार झालेली पेनसिल आह्मी पाहिली नाहीं. ज्या लांकडाच्या तुकड्यांमध्यें शिशाचें पुरण भरून पेनसिल करितात तशा दोन तयार केलेल्या फांकी पाहिल्या. त्यांना खोबण ध्यावयाची होती. व मध्यें भरण्याकारितां शिशाची तयार केलेली बाटोळी कांडी सारखी शिशाची तयार पेनसिल पाहिली तिणें आह्मी नेहेमी लिहितों त्या पेनसिली प्रमाणें चांगले काळेभोर अक्षर निघतें तात्पर्य शिसें असावें तसें मऊ आहे. लौकरच पेनसिली तयार होऊन येतील असें करणार उमेदीनें सांगत होते.

आणि सुख प्रगट करण्यास आपले पत्र द्वारा मार्ग सुलभ असून कर्तव्यकर्म आहे कीं, लोकांनीं कमी जास्ती प्रकार दर्शित केलेला ऐकावा व प्रगट करावा त्यापासून सरकारास व सरकारी काम करणारे लोकांस ती गोष्ट प्रसिद्ध होऊन कांहीं अंशीं खरा प्रकार निदर्शनास येतो.

आलीकडेस फारेष्ट खातें मेळघाटांत सुरू होऊन बरेच दिवस झाले व दिवसेंदिवस सुधारणा विशेष होत चालली या योगानें गरीब जे नेहमी पहाडांत राहणारे व शुष्क जंगलच्या वस्तूंवर पोट भरणारे लोक गोंड, भील, कोरकू, हालनि, अहीर, पधान निपलज इत्यादि जातीचे सातपुड्या पहाडाचे खोऱ्या दऱ्यांत राहून जंगली पदार्थ आणून किंवा इमारती लाकडें वगैरे आणून पोट भरतात त्यांत कांहीं गाडे, कडासा व बाबु वगैरे बाजारच्यां गावीं आणून विकतात व त्या विकत घेणारापासून सरकार नियमाप्रमाणें महसुल घेतात अशी येक रीत चालू केली आहे; परंतु निबळ गरीब स्त्रिया व निबळ वृध्द अज्ञान मुलें इत्यादि डोक्यावर ओझें आणणारे हलके पदार्थ ह्मणजे दिवसभर पाहाडांत व्याघ्राचे भयांत भयंकर अरण्यांत जाऊंन काय एक मनुष्यास ओझे उचलेल इतके कांहीं पदार्थ मिळवावे तेही मोठ्या प्रयासानें अंगुष्टापासून मस्तकापर्यंत घाम आणून व श्वासोश्वास दाटून पैदा करितात व त्यावर आपला निर्वाह करितात. त्या वस्तूंस बाजारच्या गावीं किंवा मोठ्या गावीं दहा पांच कोस जाऊन येण्या जोगे श्रमास सरकारानीं शिरबोजास महसूल मुक्रर केला आहे तो येणेंप्रमाणें—शिंदीच्या पानोळ्या, सागाचे पानांचा विडा, चार, बोरें, आवळे, टेंब्र, बिबें, हिरडे, रिठें, हिंगणबेटें, सादडयाच्या साली, बाभळीच्या साली, कांहीं वस्तूंच्या मुळ्या, इत्यादिक पदार्थांवर सरकारानीं शिरबोजास कर बसविला आहे व तो जरी एक आणा दोन आणे आहे तरी त्या विचाऱ्या लोकांस हा जुलमा सारखा वाटून तेही देण्यास सिद्ध असून सरकारानें बाजार गाव मुकर केले त्या ठिकाणींच माल न्यावा इतर ठिकाणीं नेल्यास दंड व माल हरास. अशा प्रकारें सुमार ९० मनुष्यांवर दोन महिन्यांत अडगाव कोर्टांत फौजदारी मुकदमे होऊन दंडाच्या व कैदेच्या सजा त्या लोकांस मिळाल्या त्या लोकांची स्थिती पहाल तर अंगास वस्त्र नसून पुरतें अन्न खावयास पोटभर भेटत नाहीं त्यांस कायदा व रीतभात सरकारची काय माहीत. अशा प्रकारच्या कचाटयांत गरीब आबालवृद्ध, स्त्रिया पुरुष हायतोबा करून पोट कशानें भरावें ह्मणून रडत असतात. तसाच दुसरा मोठा जुलूम आहे कीं बाजारच्या गावाशिवाय दुसऱ्या गावीं जाऊन विकूं नये असे क्षुल्लक नाशिवंत पदार्थ कांहीं दिवस राहिले तर कांहीं उपयोग होण्या सारखा आहे काय? नाहीं. याचा योग्य विचार होऊन गरीबाची दाद लावितीलच. मी त्यां लोकांस अर्जें सरकारास करण्याविषयीं ह्मटलें असतां "कोणता सरकार बोलखावा, अर्ज कशास ह्मणतात, आंत काय लिहिलें पाहिजे, कागद आणण्यास कोणत्या शहरास जावें, टिकिट आणावयास हैद्राबादेस गेलें पाहिजे कीं काय? सोडिला बापा अर्ज" असे ह्मणून निघून गेले. अशा पशुवत् मनुष्यांची दाद लागणें महा कठीण ह्मणून आपल्यास श्रम दिले आहेत. उमेद आहे कीं, आपल्या पत्राच्या येत्या अंकीं जागा द्याल. खरे खर, त्या लोकांचा व्यवसाय अगदीं बंद होऊन ते दिलगीर व उपवाशी बसले आहेत. दिवसभर मेहेनत केली असतां चार आण्याचा देखील माल सापडावयाचा नाहीं, त्यांणीं आणा किंवा दोन आणे कोठून द्यावे? गरिबांवरील अशा करापासून सरकारचा फायदा विशेष आहे असें ही नाहीं. एकंदर तालीना शंभर किंवा दोन शे रुपयांहून अधिक या क्षुल्लक वस्तूंवरचे करावद्दल उत्पन्न होणार नाहीं. जेथें गाडी बैल, उंट, गाढव, हेले अशा प्रकारचे बोझ्यांस कर लाविला आहे, तेथें तो एक वेळचा कबूल होईल; परंतु शिरबोजास माफी असण्याविषयीं आपण भरपूर अभिप्राय द्याल अशी आशा आहे. व हा आपला हेतू सिद्धीस जाईपर्यंत उल्हासानें आपण झटतील तर गरीब लोक आपणास दुवा दिल्यावाचून उगे रहाणार नाहींत. कळावें. तारिख १२ जानेवारी सन १८७४ इसवी.

पर्वताचे दरींत वास करणारा
एक वऱ्हाडी.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

कारंजाहून—वि. वि. येथील नवीन असिस्टंट कमिशनर मि० ताजुद्दीन साहेब येथें येऊन आपले कामावर रुजू झाले. हे उत्तम स्वभावाचे असून मोठे सद्गृहस्थ आहेत. यांची काम करण्याची शैली ही बरी आहे परंतु मी त्यांस थोडीशी विनंती करितो कीं, त्यांनीं रा. बापुजी रंगनाथासारखा हाताखालील लोकांवर व आमचे सारखे च्यांडाळ चवकडींतील लोकांवर दाब ठेवावा; नाहींतर जो जो मऊ जमीन सापडेल तो तो लोक बोटानें उकरण्यास कमी करणार नाहींत असें होऊं. नये याजकरितां माझे विनंतीकडेस लक्ष देतील अशी आशा करीत आहे.

काय एडिटरराव कामदार लोकांशी स्नेह करणें फार वाईट आहे. पहा बरें रा. रा. बापुसाहेब यांणीं थोडके कालांत येथील लोकांस मित्रत्वाचा कसा चटका लाऊन दिला. काय सांगावें जिकडे शहरांत पहावें तिकडे बापुसाहेबांचा लोकांस निजध्यास लागून गेला आहे. व कितियेक असें ह्मणतात कीं, असा सरदार पुन्हा या हतभागी कारंजे शहरास कोणी येईल असें वाटत नाहीं व आशाही करावयास नको. व जे दिवशीं लोकप्रिय मित्रबांधव यांची स्वारी गेली त्या दिवशीं लोक यांस पोचवण्याकरितां इतके गेले होते कीं त्यांस जाण्यास मार्ग देखील मिळेना. सरते शेवटीं गावाबाहेर स्वारी गेल्यावर रा० रा० बापुसाहेब यांणीं जाण्याची आज्ञा मागितली. त्या समयीं लोकांचे नेत्रावाटे अश्रुपात होऊं लागले, परंतु करतात काय, निरुपाय आहे कीं, कामदार लोक एक वेळ गेले ह्मणजे पुन्हा त्यांची येण्याची आशा नको. याप्रमाणे सर्व लोकांस दुःख जहालें आहे.

पत्रकर्ते महाराज, माझे ऐकण्यांत असें आलें आहे कीं, येथील हेड मास्तर रा० पुरुषोत्तम गणेश केळकर यांची नेमणूक उमरावती येथील डे. कमिशनर यांचे क्लार्क आफ धि कोर्टचे जागेवर होणार अशी वदंता उठली आहे. तर ईश्वर करो आणि ती खरी ठरो. कारण या शिक्षकीखात्यांतून मुलकी खात्यांत जाणें ह्मणजे मुसळाला अंकुरच फुटणें आहे.

एडिटरराव, येथील एक दोन सडका वर फाल्गुनाचा महिना आला नाहीं तोंच गुलालमहाराजांची स्वारी कंबर बांधून तयार आहे. जर इकडेस आमच्या म्युनिसिपलआका लक्ष देतील तर इच्छा तृप्त होईल. कळावे पत्रविस्ताराची माफी असावी ही विनंती हल्लीं मुक्काम कांबरगाव.

आपला वेडा पीर.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती पौष वद्य ३० शके १७९९.

## स्वदेशी मेणबत्ती.

आमचे मित्र रा० रा० वासुदेव गगचंद्र मोहनी स्कूलमास्तर पिंपळनेर जिल्हा खानदेश यांनीं नवीन प्रकारच्या मेणबत्त्या तयार केल्या आहेत व त्यां पैकीं एक मेणबत्ती त्यांनीं आह्मांस पाहावयास पाठविली आहे.

ही मेणबत्ती आकृतीनें व जाडेपणानें साधारण इंग्रजी मेणबत्ती सारखीच आहे, रंग मात्र हिरवा आहे. सोवळ्यांत घेण्यास निर्दोष आहे, पेट पहिल्यानें ही कमी घेते आणि ओघळत आल्यावर चांगली जळूं लागते. ह्मणून आह्मांला वाटतें कीं हिच्यांत आणखी कांहीं सुधारणा झाली पाहिजे. ज्योतीनें वत्तीच्या एका बाजूचें कांहीं मेण घसरवून खालीं लोटिल्या शिवाय हिची चांगली ज्योत निघत नाहीं. यावरून असें दिसतें कीं, ज्योतीच्या उष्णतेनें जितके वेळांत जितकें मेण वितळतें तितक्या वेळांत तें तितकें ज्योतीकडे आकर्षिलें जात नाहीं यामुळें तें पघळून खालीं येतें. व त्यांत सुधारणा न केली तर सुमार निम्मी मेणबत्ती व्यर्थ जाईल. तसेंच या वत्तीचें मेण हातास जरा अधिक चिकट लागतें. व विझवितांनां जरा गंधी येतो व थोडा वेळ कोजळी शिलक राहते इतक्या गोष्टींची वासुदेवरावास सुचेल तर किंवा आमचे इतर कोणी परोपकारी मित्र याबद्दल त्यांस कांहीं सल्लामसलत देतील तर या मेणबत्त्या फार उत्तम होतील. जी मेणबत्ती आह्मांकडे आली ती साच्यांत ओतलेली नव्हती तरी इतकी सुबक होती कीं, सोबतच्या पत्रावरून व रंगावरून मात्र आह्मांस ती नवीशी दिसली. प्रथमच प्रयत्नांत ही इतकी चांगली केली याबद्दल वासुदेव रावांचे आह्मी तारिफ करितों. हिच्या विषयींचा इतिहास वासुदेवराव आतां लोकांपुढें ठेवतील तर बरें होईल व ही तयार होण्यास खर्च किती येतो तेंही कळलें पाहिजे कारण विलायती बत्ती अर्धे आण्याला मिळते आणि ही तिच्याहून कमी दरानें मिळाली नाहीं तर लोक घेण्यास फारसे झटणार नाहींत सबब तोही खुलासा कळाला तर चांगलें होईल.

हें काम आमचे मित्र वासुदेवराव यांज कडून उत्तम प्रकारें [illegible]ण्यासारख्या खात्रीचें त्यास वाटत असेल तर आम्ही त्यांस मालाच्या खपाविषयीं [illegible] करण्याविषयीं होईल तेवढी खटपट करूं. व दुसरेही त्याचे कित्येक मित्र याप्रमाणें करितील असा आह्मास भरवसा वाटतो. सबब त्यांणीं यश येण्याची हुरूप असल्यास अवश्यमेव या कामाच्या पाठीस लागावें अशी आह्मी त्यांस शिफारस करितो. तरी इंग्रज लोकांकडून मात्र कांहीं माहिती किंवां पुस्तक मिळण्याची आशा त्यांनीं करूं नये त्या विषयीं त्यास आह्मी एक गोष्ट सांगतो.

पुण्याचे रा. विष्णु मोरेश्वर थत्ते हे मागें कांहीं दिवस शाई करून विकित होते. तेव्हां त्यांणीं असे मनांत आणिलें कीं, युरोपियन लोक शाई विकावयास पाठवितात तिच्या बरोबर लागलीच एक दौत पाठवितात. ह्मणजे एका कामांत त्यांच्या दोन मालांचा खप होतो. तर आपणही दौती कराव्या ह्मणून प्रयत्न चालविला. तेव्हां प्रथम कुंभाराकडून कांहीं एका विशेष आकाराचीं बोळकीं करवून तीं भाजून घेतलीं. व त्यांतून शाई भरून ठेविली. दुसरे दिवशीं पहातात तों अक्षत्तृतीयेच्या उदककुंभाप्रमाणें सर्व दौती पाझरून मोकळ्या झाल्या. मग वाटलें कीं, युरोपियन दौतीप्रमाणें त्यांना रोगण पाहिजे मग त्यांनीं त्या दौती आतून लाखरोगणाच्या केल्या व त्यांतून शाई भरली. पुढें असे आढळलें कीं, शाईमधील द्रव्ये लाखेला खातात व पुन्हा शाई पाझरू लागते. नंतर चांगल्या चांगल्या रोगणाच्या तजविजीस लागले, पुढें त्यांस असे आढळलें, कीं चांगल्या रोगणाला मातीही चांगली पाहिजे. मग नहर महाबळेश्वरची माती, विजापुरची माती, कऱ्हाडची माती, अमुकएका टकडीची माती, गारा, त्यांचें पीठ इत्यादि परोपरीची माती मिळवून व त्यांस रोगण देऊन "पाटरी" ह्मणजे मातीचीं भांडीं करण्याचा कारखाना सुरू केला. पण शेवटीं युरोपियन लोकांनीं त्यास या विद्येचे ग्रंथच मिळूं दिले नाहींत मुंबईचे गवरनर साहेबांनीं आश्रय द्यावा ह्मणून प्रयत्न झाला होता पण मिळाला नाहीं. थत्ते यांचे मित्र विलायतेस गेले होते त्यांनीं त्यांकरितां पुस्तकाचा बहुत शोध केला पण कांहीं फळ झालें नाहीं व शेवटीं त्यांनीं तें काम अर्धें सोडून दिलें, कारण खर्च फार येऊन काम सुबकपणांत कमी होऊं लागलें. त्यांचीं कित्येक भांडीं आम्हीं स्वतां पाहिलीं आहेत व त्या वेळीं त्यांची तारीफ केल्यावाचून आमच्यानें राहवलें नाहीं. नंतर बिचाऱ्या गरीब व पण परमोद्योगी मनुष्यास उदास होऊन शेवटीं तो धंदा सोडावा लागला.

झाळू परमेश्वरानें आह्मांतून कोणास अशा कृत्यांत अपयश न द्यावें व परोपरीचे उत्तम धंदे आह्मांस आमच्या देशांत निर्माण करण्यास व वाढविण्यास उत्साह आणि शक्ति द्यावी व तद्वारा आमचें वैभव आह्मांस आतां परत द्यावें ह्मणून आह्मी त्याची सोत्कंठ प्रार्थना करितो.

आतां मुंबईकडे इंग्रजी रीतीचे कागद तयार होऊ लागले आहेत, शायी होऊ लागली आहे, पेनसली होऊ लागल्या आहेत, आगीच्या काड्या होऊ लागल्या आहेत, पुण्याकडे साबणाच्या वड्या व मेणबत्या होऊ लागल्या आहेत असेच आपली परोपरीचे जिन्नस इकडे निर्माण करण्यास ईश्वराचे आशीर्वादानें उत्साह मिळो.

## वऱ्हाड

या आठवड्यांत थंडी पडूं लागली आहे. त्यांत संक्रांतीपासून तर फारच कडक पडते.

—०००—

कमिशनर साहेबांची स्वारी वाशीम जिल्ह्याकडेस आहे. डे० कमिशनर साहेब काल प्रातःकाळीं येथें आले.

—०००—

नवीन वर्गाबर्गी झाल्या प्रमाणें इलिचपुर, कारंजा, खामगाव आणि मलकापूर येथील न्यायाधीश आपआपल्या जागीं जाऊन रुजू झाले.

—०००—

शहरच्या पोलिसपट्टीचा चालू सालचा ठराव करण्याकारितां स्पेशीयल कमिटी तीन गृहस्थांची नेमिली आहे. तिचें काम या आठवड्यांत टौनहालमध्यें चालणार आहे. इंजिनीअर खात्याकडून टौनहाल पुरा झाल्यावर तो रिविन्यु खात्याकडून म्युन्सिपाल कमिटीचे ताब्यांत दिला व म्युन्सिपाल कमिटीनें हल्लीं त्याचें संरक्षणार्थ सहा रुपये दरमहाचा एक शिपाई ठेविला आहे. व मुनसिपल कमिटीचे आफीसही तेथेंच नेलें आहे.

—०००—

रा. रा. आत्माराम भिकाजी एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांच्या संबंधानें गेल्या आठवड्यांत आह्मी जो मजकूर लिहिला होता त्याचें इंग्लिश भाषांतर कोणी टाइम्सकडे पाठविलें व तें १९वे तारखेच्या त्यापत्रांत छापिलें आहे.

—०००—

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं येथील मिडलक्लास स्कुलावरील हेडमास्तर मि० सुंदर दामोदर दवणकर यांनीं आपली शाळा चांगली सुधारली, मुलांची संख्या पुष्कळ वाढविली, व हायस्कूला कडील परीक्षेंत उत्तम यश मिळविलें या गोष्टीवर त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची नजर जाऊन त्यास ७५ रुपये पगार होता तो त्यांनीं १०० रुपये करून, येथेंच त्यांस ठेविलें व त्यांच्या स्कुलाची एक ग्रेड वाढविली. हें त्यांस मोठें भूषण झालें. आह्मी मागें एक दोन वेळां असें होण्या विषयीं शिफारस केली होती ती आमचे वाचकांस आठवत असेल.

—०००—

आमच्या दस्तुर वाईमनजी साहेबांचे बंधु खान साहेब दस्तुर नसरवानजी जामासजी दक्षिण देशांतील सर्व पार्शी लोकांचे गुरू ( शंकराचार्य ) व. दस्तुर होशंगजी जामासजी यांच्या भेटी पुणे मुकामीं होळकर सरकारांनीं मोठ्या आदरानें घेतल्या. व त्यांस हजार हजार रुपयांचे पोशाग दिला असें आनंदाचें वर्तमान आह्मांस समजलें आहे.

—०००—

वाशिमचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर मि० अबदुलहक कर्नाळकर यांविषयीं उपहासास्पद व खोटसाळ असा मजकूर टाइम्स आफ इंडियाच्या एका लिहिणारानें कळविल्यावरून त्या पत्राच्या १९ वे तारखेच्या अंकांत वाचकास मौज वाटावी या इरादान तो लिहिला आहे. त्यांतील गोळाबेरजेनें भावार्थ असा:—

मि० अबदुल हक हे लार्ड मेयोच्या शिफारशीनें नेमले गेलेले एक अगदीं तरुण गृहस्थ वाशिमास एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर आहेत. ते एके दिवशीं घोड्यावरून जात असतां एका शिपायानें त्यास सलाम केला नाहीं, त्यावरोबर घोड्याखालीं उतरून त्यांणीं त्या शिपायास चाबकाचा प्रसाद दिला. त्याबरोबर तो होता पंजाबी माणूस त्यान मग धर गर्चांडी, दे लाथा, धर शेंडी, दे मुसकाटांत असें करून त्यांस बेदम करून टाकिलें. तेव्हां ते गयावया करून रडूं लागले व त्यांनीं पुष्कळ ओरडाओरड केली पण त्यानें तिकडे लक्ष्य दिलें नाहीं व सोडवण्याकरितांही कोणी जवळ आला नाहीं. शेवटीं एक पोलिसचा हेड कान्स्टेबल त्या ठिकाणीं आला तरी तोही आपणास मार बसेल या धाकानें त्या तंट्यांत शिरेना. या प्रमाणें त्या पंजाबी शिपायानें निर्दयपणानें अबदुल हक यांस खूप तुडविल्यावर त्या हेड कान्स्टेबलानें मध्यें पडून दोघांस दोहो बाजूंस केलें. व मग घायाळ झालेल्या अबदुलहकांस त्याचे घरीं पोचविलें व शिपायावर खटला केला नंतर त्यास तीन दिवसांची शिक्षा मिळाली.

ही हकीकत खरी नसावी व इजपासून मि० अबदुल हक यांस अपमान, बेअब्रु, शरम, व दुःख वाटावें असा ही लिहिण्याचा झोक आहे असें दिसतें असतु. अबदुल हक साहेब याजविषयीं मर्जीनुरूप विचार करतील.

टाइम्स सारख्या नामांकित व श्रेष्ठ पत्रांत ए० असि० कमि० सारख्या थोर गृहस्थाविषयीं बातमीदारांनीं असें अद्वातद्वा लिहावें व तें खात्री लाविन पत्रकर्त्यांनीं प्रसिद्ध करावें हें चांगलें आहे असें आह्मांस वाटत नाहीं. परंतु त्यांस त्या मजकुराविषयीं खात्री असेल तर आमचें कांहीं ह्मणणें नाहीं, पण आह्मांस भरवशा सारखी जी बातमी मिळाली तिच्या ही केवळ विरुद्ध आहे ह्मणून ही कल्पना आह्मांस झाली आहे. दुसरें त्या हकीकती वरून लोकांचें असें अनुमान होईल कीं अबदुल हक हे केवळ विचारशून्य आहेत व त्यांस अब्रूची चाड नाहीं तर तसें न व्हावें इतक्या पुरता या गोष्टीचा विचार अबदुल हक साहेब मोठ्या शहाणपणानें करितील व तो लोकांसही कळवितील असें आह्मी इच्छितो.

—०००—

अकोट तालुक्यातून आमचे एक मित्र लिहितात कीं, रा० रा० श्रीकृष्ण नरहर यांस अडगावास येऊन ७ वर्षें झालीं. व उत्तरोत्तर त्यांचे दक्षतेनें लोकास उत्तेजन येऊन कोडत भरभराटीवर आले होतें. परंतु सांप्रतच्या मन्वंतरास अति उत्कर्ष न आवडल्यामुळें रंगदेवता उडविल्यानें पुष्कळ लोकांचें चित्त उद्विग्न आहे. व अलिकडेस न्यायाधिशाची देवता चंचल झाल्यामुळे बदली होण्याची वाट निशिदिनीं पाहून होते तो एकदम एकाएकी स्पेशल ट्रेन येऊन वारद झाली व या जागेहून मोठी योग्यतेची जागा व कागदी अनुष्टुपांत, सर्व विषयाचे पचरोट, चांगलीं मनुष्यें नित्यशाहा भेटणार, वैभव विशेष अशा उत्तम स्थळीं जाऊन प्राप्त झाले. उत्तम जे पुण्यश्लोक आहेत त्यांजला ईश्वर अशा रीतीनेंच ठेवित असतो व जे कुकर्मी अविचारी आहेत त्यांची गति त्यांच्या कर्माप्रमाणेच त्यांस प्राप्त होतें.

—०००—

अडगावास एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर कोर्ट स्थापन झाल्यास सुमार ९ वर्षें झालीं त्यांत सन १८७३ या सालांत काम फारच झालें. फिर्यादी ४५००. दरखास्ती ४०००, व टाचाचे अर्ज ५०० होऊन निकालास लागले. या सालच्या फिर्यादींत मारवाडी वादी सुमार २५०० आहेत. कित्येक मारवाडी अडाणी कुणब्या पासून खुशीनें, दिलगिरीनें, जुलमानें साधेल तशी निशाणीची रेघ करून घेऊन मग त्याच सफाई बुडवितात मग गरीब बिचारा कुणबी अपील करो, स्पेशल करो त्याची दाद लागत नाहीं त्यास धुडकावले जाऊन मारवाड्यांची जणू काय वडलांची ठेव ती त्यास प्राप्त होते—येथे १२ वकील आहेत त्यांस या साल आखेर सुमार ८००० रुपये फी बद्दल व २००० रुपये इनामाबद्दल मिळाले. वा०

## वर्तमानसार

मुंबईच्या ग्रांट मेडिकल कालेजाचा वार्षिक रिपोर्ट छापून प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून कळतें कीं, तें कालेज स्थापन झाल्याला २८ वर्षें झालीं. त्याचें काम चांगल्या रीतीनें चालत आहे. त्यांत विद्यार्थ्यांस शिकण्याकरितां दरमहा २५ रुपये पगाराच्या ४ जागा १५ रुपये पगाराच्या १० जागा, शिवाय १४।११।१०।५।४ रुपये पगाराच्या कित्येक जागा आहेत.

बडोदा रेलवे कंपनीला या महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत ९१५६४ रुपयांचे उत्पन्न झालें. गुदस्त सालीं याच आठवड्यांत ८९१५२ रुपये झाले होते.

श्रीमंत मल्हारराव महाराज गायकवाड यांनीं पौष शुद्ध ८ मितीचा एक जाहिरनामा लावला आहे कीं त्यांचा कोणी कामदार जुलूम जबरदस्ती करीत असेल किंवा लाच खात असेल किंवा दुसरे रयतेस पीडा होण्याजोगें कांहीं कृत्य करीत असेल तर कोणीही त्याबद्दल सरकारांत अर्ज करावेत ह्मणजे त्याचा बंदोबस्त होईल.

जबलपुरचे व्यापाऱ्याला दोन लक्ष रुपयांचे तांदूळ आणि गहू बोवळी येथील महाजन लोकांनीं मार्च महिन्यांत पुरऊन देण्याचा मक्ता घेतला आहे.

मुंबईचे गवरनर बाहेर फिरत आहेत ते २१ वे तारखेला परत मुंबईस जाणार.

मुंबईच्या या वर्षाच्या म्याट्रिक्युलेशनच्या परिक्षेंत एक पारशी विद्यार्थी पास झाला. त्याच्या झटून उद्योग करण्याची आह्मी तारीफ करितो. तो उद्योग हा कीं तो विद्यार्थी सतत १० वर्षें म्याट्रिक्युलेशनच्या परिक्षेस येत होता. कित्येक विद्यार्थी एक दोन वेळ नापास झाले ह्मणजे उदासीन व हताश होतात त्यांनी तसें न होण्यास या मुलाचें उदाहरण घेण्या सारखें आहे.

करसनदास मुळजी मरण पावले त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावानें प्रतिवर्षीं मुंबई युनिव्हर्सिटीमध्यें नीति किंवा ऐक्य यांच्या संबंधानें उत्तम निबंध लिहून आणणारास १०० रुपये बक्षिस देत जावें असा ठराव झाला आहे व तो मुंबईच्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झाला आहे.

एक आगबोट विलायतेहून मुंबईस येत असतां मार्गांत तांबड्या समुद्रांत फुटली. त्यामुळें आगबोटींतील जितके सामान बाहेर काढलें त्याचा लिलाव केला त्यांत एक टपालच्या स्टांपानें भरलेली पेटी विकली गेली. पेटींत सुमारें ४ लक्ष पेक्षां अधिक रुपयांचे स्टांप होते. विकत घेणाऱ्या लोकांस प्रथम कागदांची किंमत समजली नाहीं. परतु कागद कशाचे आहेत हें कित्येकांस समजून, त्यांनीं, मिळतील तितके पुनः खरीद केले व हल्लीं हे स्टांप हिंदुस्थानांत चोरून येत आहेत.

जोधपुरच्या संस्थानांत ज्या ज्या ठिकाणीं दुष्काळ पडण्यासारखा आहे. तेथें लोकांच्या सहायार्थ अन्नछत्रें करण्याचा हुकूम तेथील महाराजानीं दिला आहे.

दुष्काळामुळें जे लोक देशांतरीं जाण्यास तयार झाले आहेत त्यांच्या ७० पासून १०० मनुष्यांच्या टोळ्या करून आसमंतांत व ते लोक फार असले तर ब्रह्मदेशांत न्यावे, आणि वाटेनें त्यांस सरकारी कोठारांतून खाण्यास द्यावे, असा बंगाल सरकारानें बंदोबस्त केला आहे.

पंजाबांत जेहेलमनदीच्या पैलतिरीं मिठाची मोठी खाण आहे. तीपासून सुमारें १२ मैलपर्यंत तारेची आगगाडी मीठ आणण्याकारितां सुरू झाली आहे.

देशी लांकडी पेनसिली— दाभाड्यांचे तळेगाव येथील कांहीं वकील वगैरे मंडळीनें लांकडी पेनसिली तयार करण्याचें काम बरेंच पूर्णतेस आणिलें आहे. अद्याप तयार झालेली पेनसिल आह्मी पाहिली नाहीं. ज्या लांकडाच्या तुकड्यांमध्यें शिशाचें पुरण भरून पेनसिल करितात तसल्या दोन तयार केलेल्या फांकी पाहिल्या. त्यांना खोबण द्यावयाची होती. व मध्यें भरण्याकारितां शिशाची तयार केलेली बाटोळी कांडी सारखी शिशाची तयार पेनसिल पाहिली तिणें आह्मी नेहेमी लिहितों त्या पेनसिली प्रमाणें चांगले काळेभोर अक्षर निघतें तात्पर्य शिसें असावें तसें मऊ आहे. लौकरच पेनसिली तयार होऊन येतील असें करणार उमेदीनें सांगत होते.

आहे कीं, मैदान भूमध्य समुद्राचे सपाटी पेक्षां २७ मिटर खालीं आहे. तेव्हां भूमध्य समुद्रांतून एक कालवा आणून या मैदानांत सोडला असतां हे सर्व पाण्याने भरून जाऊन हा पुनः समुद्र होईल.

बडोद्यास कमिशन बसलें होतें त्याचा रिपोर्ट कलकत्ता सरकाराकडे गेला आहे. त्यांत ठराव जो होईल त्या मानावर दिवाण अगर राज्य चालविण्यास कारभारी याची योजना होणार ह्मणून बातमी आहे.

ज्ञा. प्र.

माजी गव्हरनर जनरल लार्ड मेयो यांच्या स्मरणार्थ कांहीं स्मारककृत्य करावें या हेतूनें कलकत्यांत जी मंडळीं स्थापन झाली होती तिनें जो पैसा जमा झाला त्यापैकीं मेयो साहेबाचा (घोड्यावर बसलेला असा) पुतळा करण्यास जितका पैसा लागेल तो लाऊन बाकी राहिलेले सुमारें ९०,००० रु. कलकत्ता येथील नेटिव हास्पीटलाकरितां इमारत बांधण्याकरितां द्यावे असें ठरविलें आहे. या इस्पितलास मेयो नेटिव हास्पितळ असें नांव देऊन त्यांत मेयो साहेबाचा मुखवटा ठेवणार.

मद्रास इलाख्यात एकंदर ६,७८० शाळा आहेत त्यात १९,७०,७८२ विद्यार्थी आहेत.

जमखिंडीकर यांणीं माजी विनायकराव जगन्नाथ शंकरशेट यांच्या स्मरणार्थ स्मारककृत्य करण्याबद्दल जो पैसा जमा होत आहे त्यास हजार रुपये दिले. सु. प.

कलकत्याच्या युनिवर्सिटीच्या म्याट्रिक्युलेशन परीक्षेस २,९४९ उमेदवार गेले होते त्याजपैकीं ८४३ मात्र पास झाले असें समजतें.

होळकर सरकारानीं जेजुरीस दोन हजार ब्राह्मण लोकांचें ब्राह्मणभोजन करून एकेक रुपया दक्षिणा दिली असें कळतें.

अमदाबाद प्रार्थना समाजाच्या मंदिराकरितां वर्गणीचे एकंदर सात हजारांचे आंकडे पडले.

अंमळनेर तालुक्यांतील कांहीं गावावर मोठा गारांचा पाऊस पडला व त्यांत आंब्या एवढ्या गारा पडल्या व शेतें तीन चार दिवस गारांनीं पांढरी दिसत होतीं असें ह्मणतात.

बंगाला— गेल्या महिन्याच्या अखेरीस उत्तर, बहार व खालच्या बंगालचा कांहीं भाग यांत चांगला पाऊस पडला त्याजमुळें हिंवाळ्याच्या पिकास फार उपयोग झाला असावा.

बसई— तारिख ६ डिसेंबरास प्रोफेसर केरो लक्ष्मण छत्रे हे वे. रा. रामभटजी मराठे यांची यंत्रें पहाण्यास गेले होते. त्यांस यंत्रांविषयीं अभिप्राय विचारतां तेथील भरसभेंत ते असें बोलल्याचे कळतें कीं रामभटजी सारखा कल्पक गृहस्थ दहा हजारांत देखील एक उत्पन्न होणें मुष्कील आहे. इं. प्र.

## वऱ्हाडचें वर्णन.

**वाशिम**— मोंगलाईपासून वाशिम परगणा मेहकर सरकाराखालीं होता व पुढें इंग्लिश अंमल झाल्यावरही मेहकर जिल्ह्याखालीं तो एक तालुका होता. नंतर सन १८६८ सालीं बणी जिल्ह्यांतून पुसद तालुका इकडे जोडून वाशिम हा स्वतंत्र जिल्हा केला. याचें क्षेत्रफळ १८३२ चौरस मैल आहे. व लोक संख्या पावणेतीन लक्ष आहे. या खालीं वाशिम व पुसद असे दोनच तालुके आहेत व जिल्ह्याची एकंदर जमाबंदी ३०२४१९ रुपये आहे.

वाशिम हा गाव अकोल्यापासून दक्षिणेस २९ कोसांवर आहे. सुमारे १२ कोसांवर पातुराचे पुढें मेडशीचा घाट चढून जावा लागतो. चढण थोडी आहे व सडक चांगली आहे त्या मुळें वाहनांवरून उतरावे लागत नाहीं. घाटावरील मुलखास ह्मणजे वाशिमाकडील प्रांतास वऱ्हाड ह्मणण्याचा जुना परिपाठ नाहीं. तिकडील लोक घाटाखालील भागास मात्र वऱ्हाड ह्मणतात. व वाशिमाकडे अजूनही तसें बोलण्याचा पाठ आहे. तात्पर्य सांगण्याचे हें कीं, हवा, पाणी, देखावा, लोकरहाटी इत्यादि कांवरून स्वाभाविकच हे दोन वेगवेगळे देश दिसतात.

वाशिमाचे दक्षिण हद्दीवर च्यार कोसांवर निजाम सरकारचा मुलूख आहे. व हिंगोली, नांदेड, नरशी वगैरे त्यापैकीं मोठाले गाव लगत्यास आहेत. हिंगोलीस इंग्रज सरकारचे सैन्याचा मोठा तळ आहे. व वाशिमाहून तेथपर्यंत सडक आहे. वाशिमाकडे सर्व जिल्ह्याभर डोंगर आहेत. व त्यामुळें रस्ते वाईट आहेत. हवा पुण्यासारखी आहे. बहुधा खानदेश व वाशिम एकाच अक्षांशावर आहेत. परंतु खानदेशांत सपाटी फार त्यामुळें उष्णता अधिक आहे व इकडे डोंगर आणि झाडी फार यामुळें थंडावा अधिक आहे.

वाशिम हा गाव बराच मोठा आहे पण त्यास पूर्वींचा तजेला नाहीं व मोठी गडबड नाहीं त्या मुळें सर्वत्र सामसूम दिसतें. तरी ब्राह्मण वस्ती मोठी आहे. व त्याचें रहाणें निर्मळ आहे व त्यांच्या स्त्रिया अकोला, उमरावती वगैरे जिल्ह्यांतील वऱ्हाडी स्त्रियांप्रमाणें ओंगळ दिसत नाहींत. वाशिमास अमराई पुष्कळ आहे, दोन तीन तळीं आहेत, पाणी पाचक चांगलें आहे. व हवा मोठी सुखकारक आहे. म्युनिसिपाल कमिटी आहे व तेथें सडकाचे वगैरे बेतबात बरे आहेत. वाशिमास सरकारी कचेरी फार सुंदर बांधली आहे. तिला अजमासें ६०००० रुपये खर्च लागला असावा.

वाशिम जिल्ह्यांतील कित्येक खुणाखाणांवरून व पुराणांवरून असें दिसते कीं, जुन्या काळीं ही मोठी पवित्र भूमी होती. व बहुत ऋषी वगैरे त्या लगत्यास रहात होते.

पद्मपुराणामध्ये वत्सगुल्ममहात्म ह्मणून एक प्रकरण आहे तें सर्व वाशिमाविषयीं आहे. संस्कृत ग्रंथ बराच मोठा आहे. त्याचे अध्याय चाळिसाहून अधिक असून श्लोक संख्याही दहा बारा हजार आहे. त्यावरून असे दिसतें कीं वत्सगुल्मशब्दाचा अपभ्रंश होऊन वाशिम हें नांव झालें. हें वत्स ऋषीचें तपोवन होय. असे ह्मणतात कीं, या ऋषीनें बहुतकालमर्याद तपश्चर्या केली ती इतकी कीं त्याचे अंगावर गुल्म ह्मणजे वारुळें वाढलीं. तेव्हां तेहतीसकोटि देव शिवास शरण गेले. मग शिव येऊन त्यांनीं वत्सऋषीची स्थिती पाहिली तो त्यांस करुणाश्रु आले. त्याची विहीर झाली. व तेथून दोन कोसांवर तें उदक फुटून कांटे या नावाच्या गावाजवळ त्याची नदी वाहू लागली व तिला काटेकरुणा असें नांव आहे. तसेच वत्सऋषिच्या आश्रमाचे जागीं हल्लीं करुणेश्वर नामें शिवाचे देवालय आहे. पद्मतीर्थ ह्मणून ज्या तळ्यास हल्लीं ह्मणतात, व जें बांधून सुमारे ४०० वर्षें झाल्याचें सांगतात, तेथील पाण्यानें कर्नाटकचा राजा वासुकी याचें कुष्ट गेलें. तेव्हां जवळच वशिष्ठऋषीचा आश्रम होता. तेथें जाऊन राजानें त्यास विच्यारितां त्यानें व लागुलम पंचक्रोशीचें हें महात्म होय असें सांगितलें अशी पद्मपुराणांत कथा आहे.

मि० लायल साहेब कमिशनर व वऱ्हाड ग्याझीटियरचे कर्ते लिहितात कीं या पद्म तीर्थाचे पाण्यात असा कांहीं विशेष गुण असल्याचें आह्मांस आढळत नाहीं. तथापि तीर्थ ह्मणून पर्वणीच्या दिवशीं बहुत लोक तेथें स्नानास जातात. हिंदु लोकांत असें मानिलें आहे कीं या तळ्यामध्यें कांहीं जिन्नस टाकिला असतां त्याचा दगड बनतो.

वाशिमचा अलिकडील काळचा इतिहास ह्मणण्या सारखा कांहीं ठाऊक नाहीं. एथील देशमुखाचे घराणें जुन्या काळचें नामांकित आहे. सतराचे शत कामध्ये या देशमुखाकडे मोगल सरकाराकडून जमिनी व इतर हक्क पुष्कळ होते. व दक्षिण वऱ्हाडांत याची मानमान्यता फार होती.

कांहीं काळ वाशीम प्रांतीं निजामसरकार व भोसले सरकार यांचा साठ चाळिशीचा अंमल होता. नंतर तेथें निवळ निजाम सरकारचा अंमल झाला. व त्या वेळीं या जागेस बरेच महत्व आलें. कांहीं फौजेसहीत येथें एक नायब रहात असे. नाणें पाडण्याची टंकसाळा येथें होती. हल्लीं इंग्लिश सरकारचे अमलांत हे जिल्ह्याचें सदरस्टेशन झालें आहे व याखालीं वाशिम व पुसद असे दोन तालुके आहेत वाशिमची खानेसुमारी ८९३१ आहे

वाशिमास बालाजीचें देवालय फार उत्तम आहे त्याचें वर्णन व इतिहास पुढील अंकांत सांगू.

## कायद्याविषयीं माहिती.

वऱ्हाडामध्यें जे कायदे चालू आहेत व त्यांचे संबंधानें जे सरक्युलर हुकूम व ठराव वगैरे झाले आहेत त्यांच्या, माहिती विषयीं मे० लायल साहेब माजी कमिशनर यांनीं ला म्यान्युअल नावाचे एक पुस्तक छापले आहे त्याच्या आधारानें राजकीय व्यवहार संबंधी कांहीं कांहीं माहिती आह्मी आपले पत्रांत लिहीत जावी एतद्विषयीं बहुत गृहस्थांकडून आह्मांस सूचना आल्या होत्या त्याजविषयीं विचार करून लोकाचे उपयोगासाठीं तशा प्रकारची कांहीं कांहीं माहिती आह्मी आपले पत्रांतून देण्याचा विचार आजपासून केला आहे. व अशी माहिती इतर कोणाकडून आल्यास ही आह्मी ती आपले पत्रांत अवश्य घेत जाऊ.

### अडमिनिस्ट्रेटर जनरल.

अडमिनिस्ट्रेटर जनरल विषयीं दोन कायदे आहेत. एक सन १८६७ चा २४ वा व दुसरा सन १८६९ चा १९ वा. पहिल्यामध्ये अडमिनिस्ट्रेटर जनरलचे अधिकार व त्यांणीं काम कसें चालवावें हे सांगितलें आहे. व दुसऱ्या ह्मणजे सदरील २४ व्या कायद्यामध्यें सांगितलें आहे कीं, अमानी हैद्राबाद खुलुख मुंबईच्या अडमिनिस्ट्रेटर जनरलच्या सत्तेत दिला आहे.

या कायद्याचा उद्देश मयत मनुष्यांचे मालमिळकतीची वहिवाट कोणते प्रकारें व्हावी याविषयीं आहे. त्यांतील तात्पर्य—

१. हिंदु, मुसलमान, बौध्द, अथवा दुसरे लोक ज्यांस सन १८६५ चा १० वा आक्ट मुद्दाम लागू केला नाहीं त्यांच्या मरणानंतर त्यांच्या मालमिळकतीचे वहिवाटीविषयीं—जिल्हा जडजांचे ताब्यातील मुलखांत अशा प्रकारचा कोणी मरण पावला तर त्यांणीं ती मालमिळकत आपले ताब्यांत घ्यावी. किंवा तिजवर एक देखरेख करणारा नेमावा व अडमिनिस्ट्रेटर जनरल यांकडे रिपोर्ट करावा. जर मयताचें मृत्युपत्र नसेल आणि त्याची मालमिळकत १००० रुपयांहून अधिक किंमतीची असेल तर वारशाविषयींचा कायदा सन १८६५ चा १० यांतील २९वे बाबेप्रमाणें ज्याला वहिवाटीचा हक्क आहे त्यानें, किंवा कोणी वारस नसेल तर अडमिनिस्ट्रेटर जनरल यांणीं हायकोर्टास तसा अधिकार मिळण्याविषयीं लिहावें.

२. मालमिळकतीची किंमत एक हजाराहून कमी असेल तर अडमिनिस्ट्रेटर जनरल मालमिळकत आपलेकडे असल्याविषयीं सार्टिफिकेट देतील.

३ जर मृत्युपत्र निघेल तर तें ज्याचे नावानें असेल त्यानें जिल्हा कोर्टांत अथवा हायकोर्टांत खरें ठरवून घेतलें पाहिजे. प्रोबेट ( खरेपणाचा दाखला ) मिळे पर्यंत ती मालमिळकत जिल्हा जडजाचे ताब्यांत राहील.

४ जिल्हा जडज मृत्युपत्राचे प्रोबेट अथवा वहिवाटीचा अधिकार आपले हद्दींत राहणाऱ्या मनुष्यास देतील. मग त्या जिल्ह्यातील त्या मयताच्या सर्व मालमिळकतीवर त्या प्रोबेटचा किंवा अधिकार पत्राचा अंमल चालेल. हायकोर्टाचा अधिकार प्रत्येक जिल्हा कोर्टाशी मिळून आहे.

हिंदु, मुसलमान, बौध्द, व सन १८६५ चे १० वे आक्टानें मुद्दाम वगळलेले मयताचे माल मिळकतीचे वहिवाटी विषयींचे नियम.

१ कोणी मनुष्य वारस जवळ नसतां मरण पावेल तर पोलिसानें त्याची सर्व माल मिळकत डे० कमिशनराकडे पाठवावी.

२ एक वर्षाचे आंत कोणी त्या माल मिळकतीवर वारसा न सांगेल तर जिल्हा जडजानीं सरकारास त्या विषयीं रिपोर्ट करावा.

३ सन १८६० चा आक्ट २७ प्रमाणें जिल्हा कोर्टास मयताच्या माल मिळकतीच्या संबंधांतील लोकांचा हक्क पाहण्यास अधिकार आहे. ते लोक हिंदुस्थानांतील वारशाचा आक्ट ज्यास लागू नाहीं असे मात्र असले पाहिजेत.

हें पत्र अकोला येथें खंडेराव बाळाजी फडके यांनी व. स. छा. छा. प्र. केलें.

Registered No. 7—1873.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० १८ माहे जानेवारी सन १८७४ इ० अंक ३.

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| | रु० |
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

उमेदवार कंपाझिटरची आता जरूर नाहीं.

व. स. मालक

## जाहिरात.

सन १८७४।७५ सालचा अकोले जिल्ह्याचा अबकारीचा लिलाव अकोल्यास मेहेरबान डिपुटी कमिशनर कचेरीस तारिख २८ माहे ज्यानेवारि सन १८७४ इसवी रोजीं ११ वाजतां सुरू होईल. ज्यास्त माहिती पाहिजे असल्यास लिलावाचे तारखेपूर्वीं ८ दिवस डिपुटी कमिशनर साहेबाचे कचेरींत मिळेल. कळावें तारिख १९ डिसेंबर सन १८७३ इसवी मुक्काम अकोट.

विष्णु सखाराम बापट
क्लार्क आफ धि कोर्ट.

J. T. Bushby, Major
Dy. Commitioner
Akola Dist.

## नोटिस.

नोटिस—दयालुबाई मर्द दयालचंद खत्री राहणार पेठ उमरावती यांस भोलाराम वल्लद पुरणचंद खत्री राहणार खंडाळे तालुके बाळापूर यांजकडून देण्यांत येते कीं तू आमची भावजई आहेस व तुमच्या आमच्या समाईकांत वडिलार्जित घर जुने वसईनजीक आहे. कामाकाजानिमित्त आम्ही बहिवाट इकडे असल्यामुळें तू त्याची बहिवाट करतेस परंतु हल्लीं असें ऐकण्यांत आलें कीं तूं तें सगळें घर कोणाला धर्म करणार आहेस तसें असल्यास या नोटिसीनें तुजला मुद्दाम कळवितों कीं सदरहू घरांत आमचा दोन हिश्शाचा व तुझा एक हिश्शाचा हक्क आहे सबब आमच्या मालकीचे घर तूं देऊन टाकण्यास मुकत्यार नाहीस तुला पाहिजे असल्यास तूं आपले भागाचा खुशाल धर्म कर इतक्याउपर तूं आमचे दोन हिस्से कोणाला धर्म केले तर तुजवर दिवाणींत दावा करूं व खर्च आणि नुकसान सर्व भरून घेऊं कळावें तारिख १४ माहे जानेवारी सन १८७४ ईसवी.

(सही) भोलाराम पूरणचंद खत्री
दस्तुर खुद्द.

इंदूरचे होळकर सरकार पुण्यास गेले आहेत. त्यांजकारितां त्या शहरच्या लोकांनीं फडतऱ्यांचे वाड्यांत सभा करून त्यांत मोठ्या इतमामानिशीं बोलाविलें व तेथें त्यांस एक मानपत्र दिलें. तें त्यांणीं ग्रहण करून त्यावर यथोचित उत्तर दिलें. ते दोन्ही प्रकार ज्ञानप्रकाशाचे आधारें आम्ही आपले वाचकांस कळवितो.

## श्रीमन्महाराज बाबासाहेब तुकोजीराव होळकर बहादर सरकार इंदूर

### महाराजांचे शेवेशीं.

आज्ञाधारक पुणे शहरांतील सर्व लोक कृतानेक विज्ञापना विशेष. आपली स्वारी बहुतां दिवसांनीं या शहरांत आली येणें करून आम्हास फार आनंद झाला आहे. वीस वर्षांपूर्वीं आपली सडी स्वारी येथें येऊन गेली. त्या वेळेस आपल्या भेटीचा लाभ येथील लोकांस झाला नवता, व मानंतर राज्य कारभाराच्या भारामुळें ह्या प्रदेशांत आपलें आगमन झालें नाहीं. आपलें कुलदैवत या प्रांतीं आहे त्या योगानें सहपरिवार इकडे हल्लीं येणें झालें आहे. म्हणून परम नम्रतेनें व आदरानें आपलें स्वागत करण्याचा येथील रहिवाशी लोकांस फार उल्हास वाटत आहे. ईश्वर कृपेनें आपल्यास पुत्र संतती होऊन आपली स्वारी पुत्रासहवर्तमान हल्लीं या प्रांतांत देवदर्शनास आली. व आपल्या शरीरप्रकृतीस परमेश्वरानें आरोग्य केलें हें पाहून आम्हास फार संतोष झाला आहे.

मागें राज्यांत पुण्याचे लोकांशीं आपले घराण्याचा जो संबंध तो पेशव्यांचें राज्य लयास गेल्यामुळें नाहींसा झाला. तथापि आपल्या आगमनामुळें तो संबंध नाहींसा झाला वाटत नसून आपली स्वारी आल्यामुळें आपल्या पूर्वींच्या ऐश्वर्याची स्मृति होत आहे. मूळ शिवाजी महाराजांनीं जो वृक्ष लाविला व ज्यांत पेशव्यांचे घराण्यांतील पुरुषांनीं सिंचन करून वाढविला तो वृक्ष हल्लीं नठून गेला आहे तथापि त्याच्या फांद्या दूरस्थ प्रदेशीं रुजून वृक्षाप्रमाणें प्रजेस सावली देत आहेत. ह्या विचारानें आपल्या पूर्वींचा आश्रय आम्हास तुटला नाहीं असाच भास होतो.

आपल्या थोर घराण्यांतील मूळ पुरुष श्री० मल्हारराव होळकर यांचा शूरपणा, व मापुढील कारकिर्दींत श्रीमन्मातोश्री अहिल्या बाईसाहेब यांचें वात्सल्य व औदार्य, व तुकोजीराव होळकर यांची एकनिष्ठ शिपाईगिरी, इत्यादि गुणांची ख्याति व कीर्तिक मराठी राज्याचा इतिहास जाणणाऱ्या पुरुषांस श्रुत आहे. अशा थोर कुळांतील आपण ब्रिटिश सरकाराशीं दोस्ती राखून त्याप्रमाणें आपल्या कुळास भूषण देण्याजोगें नेहमीं आपल्या राज्याचें काम स्वतः मेहेनत घेऊन दक्षतेनें पाहतां, व आपल्या पुत्रांकडून उत्तम प्रकारचा विद्याभ्यास करवितां असा लौकिक आहे. प्रस्तुत आपल्या राज्यांत शहाणे व हुशार असे कारभारी व दुसरे अधिकारी नेमून सुधारणेचा क्रम चालू केला आहे येणेंकरून आम्हास फार समाधान वाटत आहे. हा क्रम उत्तरोत्तर असाच चालू रहावा व या विस्तीर्ण देशांतील सर्व एतद्देशीय संस्थानांत अशीच दिवसानुदिवस आबादीची व सुधारणुकेची वृद्धि होत असावी अशी आमची ईश्वराजवळ प्रार्थना आहे.

आपल्या राज्यांत उत्तरोत्तर आबादी व्हावी आणि ईश्वरानें आपली व आपल्या पुत्रांची तंदुरस्ती ठेऊन आपणा सर्वांस दीर्घायु करावें, व आपलें राज्य चिरकाळ चालावें अशी रात्रंदिवस आम्ही ईश्वराची प्रार्थना करीत आहों.

हें पत्र पुण्यांतील सर्व लोकांनीं आपल्यास विनयपूर्वक सत्कारार्थ लिहिलें आहे. कृपा करून आपण स्वीकार करावा अशी आम्हा सर्वांची विनंती आहे. मिती पौष वद्य ८ रोज रविवार शके १७९५ श्रीमुखनाम संवत्सरे ता० ११ जानेवारी सन १८७४ शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

मानपत्र वाचल्यावर तें भरजरीच्या थैलींत घालून महाराजापुढें ठेविलें. त्याचा महाराजांनीं स्वीकार केल्यावर त्यांच्या आज्ञेवरून चीफ जस्टिस रा० रा० धोंडो शामराव गरुड यांणीं त्याजवरील उत्तर वाचलें तें येणें प्रमाणें.

### उत्तर.

ह्या प्रसिद्ध व पुरातन मराठ्यांचे राजधानींतील तुम्हीं एतद्देशीय लोकांनीं दिलेल्या मानपत्राचा आम्ही मोठ्या उत्साहानें स्वीकार करतो. आमचे घराण्याचा ह्या शहराशीं पूर्वापार निकट संबंध आहे हें इतिहासावरून तुमचे ध्यानांत आहेच.

सांप्रत बहुत दिवसांनीं आमचें आगमन या प्रांतांत झाल्यामुळें चोहोंकडील सुधारणा आम्हास विशेष दिसत आहे. ह्या सुज्ञ व दयाळू ब्रिटिश सरकारचे राज्यांत लोकांचे सुखवृद्धीचे अनेक उपाय चालू आहेत. विद्या शिकविणें हें सरकारचें मुख्य कर्तव्य समजलें जाऊन विद्येचीही बरीच वृद्धी झाली आहे. उपयुक्त विषयांची माहिती असणारे लोक बरेच आढळतात. लोकांचे मन विद्या संपादण्याकडे ज्यास्त वळलें आहे. नवीन शोध लावावे, सर्वत्र उपयुक्त विचार करून तज्जन्य ज्ञान उपयोगांत आणावें अशा तऱ्हेची उत्कंठा सगळीकडे उत्पन्न होत चालली आहे. आणि आमची पक्की खात्री आहे कीं, देशकल्याण व लौकिक हीं दोन्हीही यापासून संपादन होतील.

हस्तकौशल्याचे उद्योग चालू करून स्वदेशांतील व्यापाराचें पुनरुज्जीवन करण्यास तुम्हांपैकीं कित्येक झटत आहेत. हें पाहून आम्हास बहुत समाधान वाटतें. सांप्रत आरंभ झाला तरी पुढें या कामांत यश मिळेल अशी आमची आशा आहे.

प्रस्तुत हिंदुस्थानांत जे सुधारणुकेचे उद्योग चालू आहेत. त्याच्या लाभांचा वाटा स्वराज्याकडेसही थोडाबहुत येत आहे. स्वराज्यांत पुरातन रिवाज व मोड ण्याविषयीं विशेष उत्सुकता असते खरी, परंतु त्यास बाध न येतां अलिकडील सुधारणुकेचीं जीं जीं कलमें घेण्यासारखीं आहेत त्यांचा जरूर स्वीकार केला पाहिजे. आतां आमचे मनाचे ठायीं पक्का निर्णय होऊन वाकतनुसार आपले राज्यांत सुधारणा करण्याचा आम्ही क्रम सुरू केला आहे त्यास अनुसरून ज्या आम्ही तजविजी केल्या त्यांकडे तुमचें लक्ष्य पुरून त्या तुम्हास पसंत आहेत हें ऐकून आम्हास फार संतोष झाला.

तुमची उत्तरोत्तर वढती व्हावी ही आमची इच्छा आहे. हिंदुस्थानांत ह्या महाराष्ट्र देशांतील लोकांचें नांव लहान आहे असें नाहीं. तुम्हांत कालमानाप्रमाणें प्रसिद्धि येण्यास जे मार्ग आहेत त्या मार्गांनीं प्रसिद्ध होण्याची शक्ति आहे याकरितां देशांत शांतता असतां जे उद्योग चालतात त्या सर्वांत श्रेष्ठत्व तुम्हास मिळावें हा आमची आशा आहे.

तुम्ही आमच्याविषयीं व आमचे घराण्याविषयीं ज्या गोष्टी लिहिल्या त्याबद्दल मनःपूर्वक तुमचे आभार मानितों व तुम्ही अत्यादरें आमचें जें स्वागत केलें त्यापासून आम्हांस बहुत संतोष झाला. तुमचे सर्वांचें निरंतर कल्याण असावें ही आमची इच्छा आहे.

त्या नंतर पांच मिनिटें नाच झाला. त्या संधींत महाराजांनीं असें सुचविलें कीं, आज सर्वांनीं आदर पूर्वक सत्कार केला. येणेंकरून आम्हास संतोष झाला आहे व ह्या प्रसंगाची आठवण आम्हास निरंतर राहील इत्यादि बोलणें झाल्यावर विडे, हार, गजरे, अत्तर गुलाब वगैरे स्वारी बरोबर च्या स्वार वगैरे सुद्धा दिले. शेवटीं सर्व मंडळीचे तर्फे रा. रा. गंगाधर विश्वनाथ गोखले यांणीं विनंती केली कीं, आज येथें येऊन महाराजांनीं आमच्या आदराचा स्वीकार केला येणेंकरून आम्हावर मोठे उपकार झाले आहेत. याप्रमाणें समारंभ झाल्यावर स्वारी उठून सर्वांचे मुजरे घेत गेली. त्यांस पोंचविण्याकरितां पूर्वींप्रमाणेंच मंडळी गेली होती.

ज्ञा. प्र.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. आपणास कांहीं आधिकोत्तर कळविणे जरूर वाटल्या वरून लोकांचे दुःख

आग्रयापासून अजमीरपर्यंत स्टेट रेल्वेचा रस्ता पुढल्या मार्च महिन्यांत सुरू होईल.

तारीख १ जानेवारी सन १८७३ पासून तारीख २० नोंबर सन १८७३ पर्यंत हिंदुस्थानांतील रेल्वे कंपन्यांचें एकंदर उत्पन्न ६,४३.९९,७०६ रुपये झालें.

गेल्या पौर्णिमेपासून खानदेशांतील प्रसिद्ध माहिजीच्या यात्रेस सुरूवात झाली. यात्रेच्या समयीं दरसाल शेतकी संबंधी प्रदर्शन होत असतें तसें यंदाही व्हावयाचे आहे. एकंदर बक्षिसें सुमारे ५००० रुपयांची दिली जावयाचीं आहेत. पैकीं २,३०८ रुपयांची बक्षिसें गुरांकारितां व बाकीच्या रुपयांचीं धान्यें वगैरे इतर पदार्थांकरितां देणार.

ट्रामवे. मुंबईत होणाऱ्या ट्रामवेच्या कामास सुरूवात झाली. या रस्त्यास लागणारे सर्व सामान बिलायतेहून आणलें आहे परंतु गाड्या अमेरिकेंतून आणल्या असून पावसाळ्याकरितां निराळ्या व थंडी उन्हाळ्याकरितां निराळ्या अशा दोन प्रकारच्या गाड्या आहेत. प्रथम क्राफर्ड मार्केटापासून कोर्टापर्यंत रस्ता तयार होणार.

नें. ओ.

## कायद्यासंबंधी माहिती.

महाराणी सरकाराकडे अपिलें करण्याविषयीं—या बाबदींत सन १८६३ चा आक्ट २१ा झालेला आहे. व तो वऱ्हाडास लागू केला असल्याबद्दल सन १८६६ चे नंबर १४ चे ग्याझिटांत जाहिरनामा नंबर ७९८ तारिख ८ एप्रिल सन १८६९ इसवीचा प्रसिद्ध झाला आहे.

यांतमध्यें महाराणी साहेब इनूकौंसिल यांजकडे कोणत्या रीतीनें अपिलें पाठविलीं असतां तीं घेतलीं जातील; अशा अपिलास मुदत किती दिली आहे; कागदपत्र कसे पाठवावे लागतात; अपिलें टापासून खर्चाचा जामीन घ्यावा लागतो; व महाराणी साहेब इनूकौंसिल यांचा हुकुमनामा कोणत्या रीतीनें अमलांत आणिला जातो याविषयीं तपशिलवार सांगिलें आहे.

दिवाणी कायदे.

सन १८५९ चा ८ वा वऱ्हाडास ला तारिख १२ आक्टोबर सन १८६१ इसवी रोजीं लागू केला.

सन १८६१ तारिख १२ ज्यानेवारी सन १८६२ इसवी रोजीं वऱ्हाडास लागू केला.

यांच्या संबंधानें सरक्युलर हुकूम ठराव वगैरे.

अपिलाचे स्टांपा विषयीं सरक्युलर तारीख ९ आगष्ट सन १८६९ कित्येक अपील कोर्टामध्यें अशी वहिवाट आढळली की अव्वल दाव्यास जेवढ्या रकमेचा स्टांप कागद असतो तेवढ्याच किंमतीच्या स्टांपकागदावर त्या दाव्यावरील कमी रकमेचीही अपिलें लिहवितात; म्हणजे उदाहरण ५०० रुपयांचा कोणी अव्वल कोर्टांत दावा केला व त्यापैकीं त्या कोर्टानें ३०० रुपये देवविले पुढें न देविलेले दोनशे रुपये मिळावयाकरितां त्यानें अपील केलें आहे. अशाप्रसंगीं कित्येक मुकदम्यांत पुरे ५०० रुपयाला जो स्टांप पाहिजे त्याजवर तें अपील घेतात ही वहिवाट स्टांपाविषयींचा सन १८६७ चा आक्ट २६ या विरुद्ध आहे याजकरितां यापुढें अपिलामधील मागण्याची जी रकम असेल तिचे किंमती पुरता अपिलाचा स्टांपकागद घेत जावा.

[टीप—सदरहू २६ वा आक्ट हल्लीं रद्द होऊन त्या ऐवजीं सन १८७० चा ७ वा आक्ट झाला आहे. व त्यांतील कलम ७ रकम १ व सातवे कलमाचा शेवटचा भाग हा सदरहू स्टांपाविषयीं सदरीं लिहिल्या प्रमाणे प्रमाणभूत आहे.]

अपिलाचे मुदती विषयीं सरक्युलर. नंबर ४१८

अपील कोर्टांत देण्याची मुदत मे महिन्यांत कोर्टें बंद असतात त्यांत भरत असली तर मे महिन्याच्या ३१ वा तारखेस मुदत संपते तीच तारिख जून महिन्याची सदरहु मुदतीस लागू करावी उदाहरण, मे महिन्याचे ६ वे तारखेला अपिलाची मुदत खलास होते तर मे महिन्याच्या ३१ तारखा जमेत न धरितां जून महिन्याची ६ वी तारीख ही अपिलाची सरती मुदत आहे असें समजावें.

(टीप—मुदतीचा आक्ट सन १८७१ चा आक्ट ९ कलम ५ यांत असें ठरलें आहे कीं, मे महिन्यांत कोणत्या तारखेस मुदत खलास होणारी अपिलें जूनचे पहिले तारखेस कोर्टांत घ्यावीत.)

## वऱ्हाडचें वर्णन.

### वाशिमचा बालाजी.

वाशिमास अतिउत्तम व मोलवान असें बालाजीचें देवालय आहे. सान्य वऱ्हाडांत दुसरें असें कोठें देवालय नाहीं. नागपूरकर भोसले यांचे दिवाण भवानी काळो यांणीं हें देवालय व त्याच्या जवळचा तलाव बांधिला. हीं कामें पुरीं झाल्या सुमारें ९५ वर्षें झालीं. व २५ वर्षें कामें चालली होतीं. या देवालयास सहा लक्ष व तलावास अडीच लक्ष रुपये खर्च लागला असा दाखला मिळतो. तळ्याचा वास्तुपुरुष भवानीरावाचे द्वितिय चिरंजीव यशवंतराव यांणीं येऊन स्थापिला.

येथील देवाच्या मूर्ती विषयीं माहिती मिळते ती अशी:—फसली सन ११८० मध्यें महादेवाचें देवालय चंद्रेश्वर म्हणून आहे त्याच्या शेजारीं एका रजपूत जातीच्या स्त्रिया पुरण्याकारितां जागा खणीत होति तेव्हा तेथें जमिनींत गणपति, महादेव व बालाजी अशा तीन मूर्ती निघाल्या. त्या वेळेस मोगल सरकाराकडून नबाब बशांगतजंग बहादर हे वाशिमास तालुकदार होते व त्यांकडे २२ महाल जहागिर होते. पुढें या मूर्तींची खबर कारंजास कळल्यावर तेथील परशाराम पंत देशपांडे यांणीं आपल्या गावीं नेण्याकरितां त्या मागितल्या परंतु त्यांस मिळाल्या नाहींत. पुढें नागपूरकर रघुजी भोसल्याचे पुतणे चिमणाबापु भोसले काहीं कामानिमित्त वाशिमास आले. त्यांबरोबर भवानीराव विठ्ठल काळो हेही आले होते. त्यांणीं बंगाल्यांत सर होण्याविषयीं व आपणास दिवाणगीरी मिळण्याविषयीं बालाजीस नवस केला व त्याप्रमाणें त्यांचीं दोन्ही कामें घडून आलीं तेव्हां त्यांणीं वाशिमास कारकून पाठवून देवालयाचा व तळ्याचा नकाशा तयार करवून त्याप्रमाणें काम करण्याची सुरुवात केली. व गाभाऱ्याचें काम तयार झाल्याबरोबर म्हणजे सन ११९३ फसलीमध्यें त्यांत बालाजीची मूर्ती स्थापन केली.

यावेळेस वऱ्हाडांत पेशवे सरदेशमुख होते, भोसले मोकासदार होते व निजाम जहागिरदार होते. या बालाजीला १८ गाव जहागिर होते त्यांपैकीं १० हल्लीं देवाकडे चालत आहेत. बाकीचे सरकारांत गेले. देवाच्या जहागिरी गावांचीं नावें व रकम:—

| | | | रुपये. |
|---|---|---|---|
| १ आसरळ | तालुका | वाशिम | ५०० |
| २ बोराळे | ,, | ,, | २०० |
| ३ जांभरुण | ,, | ,, | ३०० |
| ४ एकांबे | ,, | ,, | ६० |
| ५ राजने | ,, | ,, | ६० |
| ६ नागझरी | ,, | ,, | १७५ |
| ७ सिंदी | ,, | दारव्हे | ३५० |
| ८ शेलगांव | जिल्हा | बुलढाणें | ६५० |
| ९ गणेशपुर | ,, | ,, | ३०० |
| १० अजापुर | ,, | औरंगाबाद | १५० |

याशिवाय डोनगाव येथें ८५० रुपयांची व कोडाळी येथें २६७ रुपयांची जमीन देवास इनाम आहे. तसेंच वाशिम कसब्याबाहेर देवालयानजिक जी जमीन होती ती देवाकडे घेऊन तेथें १५००० रुपये खर्च करून व२५ वर्षें खटपट करून गाव वसविला त्याचें नाव खैरताबादधर्मपुर ऊर्फ देवपेठ असें ठेविलें या देवपेठेचें उत्पन्न अलिकडे कालोलीपर्यंत सुमारें च्यार हजार ४००० रुपये सालीना होत होते. तें सर्व सरकारांत गेलें व सरकारांतून नक्त ६५० रुपये मात्र आतां देवास मिळतात. हे नुकसान वहिवाटदारांचे चुकीनें झालें असें म्हणतात. एका गावीं दोन अंमल नसण्याच्या हेतूनें इंग्लिशसरकारानीं पेठेचें उत्पन्न विच्यारिलें असतां वहिवाटदारानीं आपली कृत छपविण्याचे इराद्यानें कमी उत्पन्न सांगितलें व गोवदल्याचे वेळीं तेंच मंजूर झालें. असतु.

याप्रमाणें हें देवस्थान मोठें श्रीमान आहे. याला वार्षिक जहागीर व इनामें आहेत. त्यांखेरीज सुमार ३००० रुपये पावेतों नजर येते. आश्विन मासीं या बालाजीचा मोठा उत्साह होतो त्याला सुमारें २००० रुपये खर्च येतो. व देवस्थानाचे नित्यनैमित्तिक खर्चांकडे सुमार ५०० रुपये महिन्याची नेमणूक आहे. देवाजवळ तुपाचे दोन नंदादीप आहेत. सुमार १५ मनुष्यांचें अन्नछत्र आहे. शिवाय पुजारी, तीर्थे, पाणीवाले गुजराथी, हरदास, पुराणीक बैरागी हे पगारदार आहेत. नित्य पांच वेळां देवाची पूजा होते. नौबतखाना आहे त्यांकडे ५ मनुष्यें आहेत. घड्याची ४ आहेत. मिळून तो ३० रुपये महिन्याचा खर्च आहे. शिवाय देवीकडे १० शिपाई आहेत त्यांना ५० रुपयांची नेमणूक आहे. सदर कारकुन पगार रुपये ४०।१२।१२।८।८ ५ मिळून ८५ रुपये नेमणुकीचे आहेत. नबुतरखान्याकडे १५ रुपयांची नेमणूक आहे. शिवाय कांहीं मुसलमान लोकांच्या देवस्थानाकडे दरमहाच्या नेमणुका आहेत याप्रमाणें खर्चही विपुल आहे.

हटी कौंगठीचे राजांनीं देवाला सोन्याचा पितांबर सुमार १०० तोळ्यांचा नेसविला आहे. व देवाचे स्थापकांनींही देवाला सर्व प्रकारचे दागिने केलेले आहेत. देवाला नवस करावा व तो फळास आला म्हणजे एक रुपया देवाचे सभामंडपात फरशीवर ठोकावा अशी कोठें कोठें चाल आहे ती या ठिकाणीं पूर्णपणें अमलांत आलेली नजरेस येते या देवालयांत हे रुपये आम्हांस मोजतां आले नाहींत तरी ७०० हून कमी नसतील असा अजमास आहे.

या देवाची स्थापना करणारे भवानराव काळो यांचे पणतू यशवंतराव हे नागपुरास भोसले सरकारचा अंमल होता तोंपर्यंत दिवाण होते. व आतां इंग्लिशसरकारांतून पेनशन घेऊन आहेत. व त्यांच्या काहीं पुरुषांत हक्क संबंधानें काहीं वाद इकडे सरकार दरबारांत सुरू आहे.

या देवाची स्थापना झाल्यापासून त्याची वहिवाट एकाच घराण्याकडे सुमार ७२ वर्षें पर्यंत चालली. मूळ रामाजीपंत, त्यांचे चिरंजीव गोविंदपंत, त्यांचे अंबादासपंत व त्यांचे चिरंजीव राजेश्वरपंत. शेवटचे दोन पुरुष हयात आहेत. पैकीं अंबादासपंत यांनीं ३२ वर्षें देवाची एकनिष्ठपणें सेवा चाकरी केली व देवस्थान सुस्थितींत राखिलें म्हणून मालकांनीं त्यांस २० रुपये पेनशन करून दिले व त्यांचे चिरंजीव राजेश्वरपंत यांस ४० रुपयांची वहिवाटीची जागा दिली त्यांनीं ७ वर्षें काम केलें. नंतर त्यांकडून काम काढून नाना सकदेव यांस नेमिलें, व थोडकेंच दिवसांत त्यांनां काढून बापुजी मुरहर नाईक दंडे यांस नेमिलें. ते आजवर काम करीत आहेत.

मोठी दुःखाची गोष्ट ही आहे कीं इतकें उत्तम हे देवस्थान असतां आतां त्याची स्थिती चांगली नाहीं. राजेश्वरपंतानीं देवाचे १५० तोळे सोन्यांचे दागीने मोडिले तेवढेंच करून ते स्वस्थ राहिलें नाहींत त्यांनीं देवाला सुमार १२००० रुपये कर्ज करून ठेविलें आहे. व त्यांचे मागें बापजी नाईक यांनीं एकाच वर्षांत ५००० रुपये कर्ज करून ठेविलें आहे असें म्हणतात. अहाहा! देवाला एवढें अचाट उत्पन्न असतां त्यावर कर्जाचा बोजा जो ६० वर्षांत कधीं झाला नाहीं तो या दोन पुरुषांनीं थोड्या काळांत करून ठेविला. व देवाचे दागीनें ही एकानें लुबाडीले तेव्हां व्यवहारी [illegible]ची व (खरा असल्यास) लुटारूपणाचीही देवा जवळ त्यांनीं हजीटीच दिली असें म्हटलें पाहिजे. असतु. देवास आवडलें तेथें दुसऱ्यानें काय बोलावें! आतां आम्ही हा लेख पुरा करितों. व त्यापूर्वीं इतकेंच इच्छितो कीं देवाचा पैसा गैरकामीं खर्च करणारास पश्चात्ताप होवो व ते तो पैसा परत देऊन देवाजवळ अपराधाची क्षमा मागोत आणि असें करतील तर ईश्वर त्यांचें कल्याण करील.

हें पत्र अकोला येथें खंडेराव बाळाजी फडके यांचे व. स. छा. छा. प्र. केले

Registered No. 7—1873.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० २५ माहे जानेवारी सन १८७४ ० अंक ४

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| | रु० |
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| कुटकळ अंकास | ०४ |
| डाकहशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

### जाहिरखबर.

उमेदवार कंपाझिटरची आतां जरूर नाहीं.

प. स. मालक

## जाहिरात.

सन १८७४।७५ सालचा अकोले जिल्ह्याचा अबकारीचा लिलाव अकोल्यास मेहेरबान डिपुटी कमिशनर कचेरींत तारिख २८ माहे ज्यानेवारी सन १८७४ इसवी रोजीं ११ वाजतां सुरू होईल. ज्यास्त माहिती पाहिजे असल्यास लिलावाचे तारखेपूर्वीं ८ दिवस डिपुटी कमिशनर साहेबाचे कचेरींत मिळेल. कळावें तारिख १९ डिसेंबर सन १८७३ इसवी मुकाम अकोट.

विष्णु सखाराम बापट
क्लार्क आफ धि कोर्ट.

J. T. Bushby, Major
Dy. Commitioner
Akola Dist.

## नोटिस.

नोटिस सुरजमल वहिवाटदार दुकान चौथमल रामकरण मौजे मादणी तालुके मेहेकर जिल्हा बुलढाणे याजकडून रामजी वल्लद शिमाजी देवठाणे राहणार मौजे मजकूर यास देण्यात येते कीं तुमचेकडे दाणाजी वानखेडे राहणार अंचल याजकडील हवाल्याबद्दल रक्कम रुपये ३०० अषाढ वद्य ८ शके १७९४ पासून येणे राहिली आहे त्यास दीडवर्ष झालें असतां तुम्ही आजपर्यंत रक्कम दिली नाहीं तर या नोटिसीनें तुम्हांस कळविण्यांत येते कीं ही नोटिस तुम्हास पोंचल्यापासून १९ दिवसांत मुद्दल रुपये ३००! व व्याज दर शेकडा रुपये २ प्रमाणें १०८ येकूण रुपये ४०८ आम्हास देऊन आमची पावती घ्यावी व नोटिसीबद्दल खर्च द्यावा असें न केल्यास वाजवी रीतीनें तजवीज करून या नोटिसीचे खर्चासुध्धां तुमचे जवळून रकम घेतली जाईल. तारिख १९ माहे जानेवारी सन १८७४ इसवी.

(सही) सूरजमल वहिवाटदार चौथमल रामकरण मौजे मादणी दस्तुर खुद.

## जाहिरात.

### फौजदारी सर्व संग्रह.

सर्व लोकास कळविण्यांत येते कीं, सदरील बूक सन १८२७ ते ७० पर्यंत नारायण मोरेश्वर केळकर यांणीं विष्णु रामचंद्र रानडे यांच्या साह्यानें तयार करून त्याची किंमत रु० ११ ठेविली होती परंतु त्या बुकाची किंमत फार असल्यानें त्याचा विशेष खप न होतां रानडे यांजकडे शिलक राहिलीं होतीं, तीं सर्व आम्हीं खरेदी केलीं आणि त्यांत रद्द झालेले कायदे काढून टाकण्यासारखे होते ते कमी करून व पेजिंगाचे अडचणीमुळें जे काढून टाकितां येत नाहींत ते तसेच ठेऊन समजुतीकरितां पुस्तकाचे आरंभीं रद्द झालेल्या कायद्यांचें कोष्टक नमूद केलें आहे आणि सन १८७१ पासून १८७३ आखेर पर्यंत जे कायदे चालू आहेत ते या पुस्तकांत सामील केले आहेत व कित्येकांवर विशेष समजुतीच्या टिपाही दिल्या आहेत. आणि फौजदारी संबंधीं सर्व कायद्यांचा संग्रह एक जागीं असल्यामुळें सबार्डिनेट माजिस्त्रेटची परिक्षा देणारांस, वकील लोकांस व इतर सर्व लोकांस याचा उपयोग असल्यामुळें आणि या पुस्तकाची किंमत फार थोडी ठेविल्यानें सर्वांस चांगला उपयोग होईल याजकरितां फेब्रुआरी १८७४ अखेर आगाऊ प्रमाणें किंमत रु० ६ टपालखर्च १४ आणे या प्रमाणें ठेविली आहे खात्रीलायक सही देणारास रु० ८ शिवाय टपालखर्च पडेल. ह्या बुकास सर्वांनीं आश्रय दिल्यास पुढें फौजदारी व दिवाणी जे आक्ट होतील ते वेळचे वेळीं अगाऊ प्रमाणें होणारे वर्गणीदारांस अल्प किंमतींत देण्यांत येतील.

सदरील पुस्तकास वर्गणीदार लोकांनीं आपली वर्गणी पाठविणें, ती पुणें पेठ शनवार मेहुणपुरा येथें जगद्धितेच्छु छापखान्यांत आमचे नांवें पाठवावी. आणि ह्या पुस्तका संबंधीं पत्र पाठविणें ते पोस्टपेड, नाटपेड असूं नये. वर्गणीबद्दल पैसा पाठविणें तो पुण्याचे दर्शनी हुंडीनें, मनी आर्डरीनें किंवा अर्ध आण्याच्या टिकिटानीं पाठवावा. हें पुस्तक खिळेछापानें छापून मार्च सन १८७४ अखेर तयार करून वर्गणीदारांस देण्यांत येईल. कळावें. ता. ८ जानेवारी सन १८७४इ. पुणें—जगद्धितेच्छु आफिस.

रावजी श्रीधर गोंधळेकर,
जगद्धितेच्छु छापखान्याचे
मालक.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा० रा० वऱ्हाड समाचार कर्ते यांस

वि० वि० आलीकडे लहानापासून थोरापर्यंत सर्वांच्या मनामध्यें एकच कल्पना उद्भवली आहे. राजा आणि प्रजा यांमध्यें असा प्रकार असणें हें शुभचिन्ह आहे असें वाटत नाहीं. राजा कसाही असो परंतु त्याजमधील न्यूनें बाहेर काढण्यास सुरवात केली म्हणजे त्याजपासून मोठासा लाभ होणार असें नाहीं. मात्र उलटी स्पर्धा उत्पन्न होती. असें होण्याचें कारण काय आहे याजविषयीं पुढें लिहितो. त्यांस आपण आपल्या पत्रीं जागा द्यावी.

मूळ आरंभीं इंग्रज लोक व्यापार करण्याच्या हेतूनें हिंदुस्थानांत आले, नंतर कालांतरानें व काळ साह्य असल्यानें ते सर्व भरतखंडाचे स्वामित्व करूं लागले आहेत राज्य होऊन एक शासक झाले तोच राजा आणि प्रजा यांजमध्यें भिन्नत्व दिसूं लागलें. मराठीमध्यें एक म्हण आहे ती अशी कीं (संगती संगदोषेण.) याप्रमाणें एकमेकाचा निकट संबंध पडूं लागला म्हणजे एकाची खाण्याची, पिण्याची, पोशाखाची व आणखी दुसऱ्या तऱ्हा ज्या चांगल्या असोत अगर नसोत परंतु त्या घेतल्याच पाहिजेत असें कित्येक प्रसंगीं होतें. आपल्या हिंदु पैकीं पुष्कळ लोक बूट स्टाकींग ज्याकेटस, हाफजाकेटस, ट्राउझर्स, आणि कोट, इतक्या प्रकारचे ड्रेस करूं लागले आहेत त्याप्रमाणें युरोपियन लोकांनीं एक प्रकारची तरी हिंदुची चाल घेतली आहे काय? जर करितां युरोपियन दुसऱ्यांच्या चाली घेत नाहींत तर मग आपणच कां घ्याव्या? आतां त्यांजमध्यें आणि आपल्यामध्यें इतकाच फरक कीं ते राजे आहेत आणि आपण प्रजा आहोत, परंतु त्यांजपासून आपणास आमच्या सारखा पोषाग करा अगर आमच्या चालीरीति तुम्ही घ्या असा निशी कांहीं चेक मिळाला नाहीं. उलटें जर आपण जोडा [ मग आपल्या चालीचा असो अगर त्याच्या चालीचा असो. तो ] घालून कचेरींत गेलो तर कितीएक हट्टी स्वभावाचे अधिकारी फार रागावतात. असें आहे तर मग कां आपली चाल सोडून दुसऱ्याची घ्यावी?

हल्लीं व्यापारसंबंधी उभयतांचा गोंधळ चालला आहे तो येणेंप्रमाणें—हल्लीं लोकांची मनें व्यापाराकडे फार लागलीं आहेत. पुष्कळ कापूस दाबण्याचे, व सूत आणि कापड तयार करण्याचे कारखाने ठिकठिकाणीं सुरू झाले आहेत व होत आहेत. म्हणून विलायतेंतील व्यापारी लोकांनीं फार ओरड करणें सुरू केलें आहे. आपलें हित आणि दुसऱ्याचें अनहित, याप्रमाणें त्यांचें म्हणणें आहे. आपलें पोट भरलें मग घरांतील माणसें उपाशीं कां असेनात. याप्रमाणें विलायतचा व्यापार भरभराटींत चालावा. आणि हिंदुस्थानांतील बुडावा असें आहे. कितीही केलें तरी असें होण्यास अतिशय प्रयत्न केले पाहिजेत. नाहीं तर सर्व व्यापारी लोकांनीं आपापलीं दुकानें व इतरप्रकारचे कारखाने सोडून द्यावे आणि विलायतेचे कापडावर अवलंबून असावें मग काय पहावयाचें आहे. ज्याचे हातीं सत्ता तो पारधी असेंच होईल, परंतु असें करणें इंग्रज सरकारच्या हातून कदापि होणार नाहीं.

सन १७०८ मध्यें डिफो नावाच्या एका युरोपियनानें विलायतेंतील उइकली रिव्हिव्यु नामक वर्तमानपत्रांत हिंदुस्थानांतील मालाविषयीं एक निबंध लिहिला होता. तो किती विचाराचा आणि परोपकार बुद्धीचा होता हें त्यांतील मजकूर वाचाल म्हणजे समजेल. कापसाचा उपयोग विलायतेमध्यें खोल्यास गाद्या, पडदे, खुर्च्या इतक्या कामी होई म्हणून विलायतेंतील लोकांचा पैसा हिंदुस्थानांत जाऊन विलायतेंत दरिद्रावस्था येत चालली आहे. सबब याचा बंदोबस्त नीट रीतीनें व्हावा म्हणून विलायतेमध्यें एक कायदा केला कीं, जो हिंदुस्थानांतील कापड विकत घेईल त्यास ५ पौंड व जो विकील त्यास २० पौंड दंड केला जाईल. अशा प्रकारचा कायदा पास केला. याजवरून अर्थात हिंदुस्थानच्या कापडाचा खप कमी होऊन त्याचा मोबदला विलायतचें कापड फार येऊं लागलें आहे. आतां आपल्या हिंदुस्थानामध्यें सुमारें २० कोटिच्या वस्तींमध्यें एकही विद्वान पुढें होऊन ज्या प्रमाणें डिफो साहेबानें पत्र लिहिलें होतें त्याप्रमाणें पत्रें लिहून विलायतेचा कपडा व दुसरे सर्व प्रकारचे जिन्नस हिंदूंस हल्लीं वापरण्यांत आहेत ते त्यांनीं न घ्यावें असें केल्यास न होईल काय? याजकरितां आम्ही हीच आशा करितो कीं, या वऱ्हाड प्रांतीं कापूस व खनीज कोळसे विपुल आहेत. व कापूस दाबण्याचे कारखानेही आहेत, तसेच सूत काढण्याचे आणि विणण्याचे कारखाने घालावे, व त्यांत उत्पन्न होणारे कापड सर्व वऱ्हाडभर पाठवावे कळावे ही विनंती तारिख १३ माहे जानेवारी सन १८७४ इसवी.

एक
काळंबकर.

रा. रा. व. स. क. यांस

वि०वि० खत्र्याच्या दुकानांत पुन्हा पहिल्या प्रमाणें सांडस हतोडी आणि ऐरण यातिहींचा संजोग पुन्हा जमल्यानें लोखंड चांगलें घडूं जातें. मध्यंतरीं कांहीं दिवस विसकळीतपणा झाला होता. आतां तर घणचक्कर आहे. तसाच मध्यंतरीं दिवाणा ही पळाला होता तोही येऊन मिळाला आहे तेणें तर दुधांत साखरच पडली जणू, पण मध्यें जैनगत हा काटा आहे मग पहावें तो कितीक खुपतो. पोपट आला विक्रीस व घेऊन लवकर बोलू लागला तर बरें नाहीं तर "दाखलऊ पिंजरा,, हें वाक्य तर कोठे गेलें नाहींना, नाहींतर येखादा घणाचा टोला बसून हातोडीचा चुरा,

हा, सांडसीचे दोन भाग, व घणाचे तुकडे तुकडे होऊन न जावोत व खाल्याचें न निघो दिवाळें ह्मणजे झालें जादा काय लिहिणें करा बिसमिल्ला. विनोदवाले इकडे बघून प्रतोद पाजळतील का?

मु० पाणी मातीच्या
मिश्रणाची ती, नि०भिलां
चे गाव प्रति जमाच्या
मंडळीचा जमाव.

एक गिऱ्हाईक.

---

रा०रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस वि०वि० पत्रकर्ते माहाराज तुमचा व माझा परिचय तर नाहीं परंतु सर्व लोक सांगतात त्यावरून असें वाटतें कीं, आपणाकडे जर कोणी गरिब भेटीची इच्छा करून आला तर आपण त्याची भेट घेता जाणोन आपली व माझी प्रथमच भेट आहे- मी बहुतकरून मुशाफरी फार करीत असतो. व कोणत्याही गावचे सुधारणेविषयीं किंवा अव्यवस्थेविषयीं आपणाकडेस काहीं मजकूर लिहून कळवावा असें वाटतें. परंतु तुमची व माझी ओळख नसल्यामुळें आपली भेट व्हावी असें वाटत नवते. कारण मनसारखे आपणाकडे येणारे पुष्कळ आहेत पण वर लिहिलेला मजकूर ऐकल्या वरून भेटीकारितां आलो आहे.

मीं आज सुमारें एक महिना देऊळगाव राजा तालुके चिखली येथें आहे. नित्य श्री व्यंकटेशजींचें दर्शन करून गावांत देऊळगावशाई गप्पा ऐकत असतो. एडिटरराव हा गाव एवढा मोठा असोन निरुद्योगी मंडळी फार आहे. आणि संध्याकाळचे सहा वाजेपासून रात्रीचे अकरा वाजेपर्यंत श्रीजीचे पटांगणांत सुमार दोन तीनशें लोक चकाट्या पिटीत बसत असतात. व भोजनाखेरीज दुसऱ्या गोष्टी ऐकिवांत येत नाहींत याप्रमाणें गावच्या मंडळीचा नक्षा आहे.

येथील श्री बालाजीचें संस्थान फार उत्तम असून श्रीजीचे अंगावर जडित जो हारही बरेच आहे. देवळापुढें एक मोठें पटांगण असून दोन नगारखाने आहेत. एक नगारखाना जुना आहे व दुसरा नवीन नगारखाना राजे रामबक्ष बहादर भागानगरकर यांणीं आठ दहा वर्षें झालीं श्रीजीस नेमणूक करून दिला आहे याप्रमाणें लोक सांगतात. देवाचे दागिन्याचे संरक्षणार्थ पोलिसची एक ग्याट आहे. अतीत अभ्यागत यांस सदावर्त मिळत असते. या संस्थानास यात्रेत अश्विन मासीं उत्साहाचे वेळीं उत्पन्नही वर्षास सत्तर ऐंशी हजार रुपये कानगीचे येतें ह्मणून ऐकिलें आहे.

या गावीं 'दुनिया झुकती है मगर झुकानेवाला होना' या ह्मणीप्रमाणें येथें एक मारवाडीब्राह्मण आला आहे. त्याचे विऱ्हाड कसब्याचे गल्लींत काळ्या मारुती जवळ आहे. एकंदर गावच्या स्त्रिया व पुरुष मिळून पन्नास पाऊणशें लोक बुवाजीचे नादीं लागले आहेत. पत्रकर्ते महाराज त्यांचे जवळ एक गुण मोठा विशेष आहे तो असा कीं, ज्या स्त्रीला मुलगा होत नाहीं त्या स्त्रीला मुलगा करून देतो ह्मणून तपोनिधी बुवा सांगतात अर्थात त्या कारणावरून बायाही महाराजांपाशीं दहा वीस हजर असतात. बुवाचें वय अजमासे ३०।३५ वर्षांचे आहे. आणि या गावचे निरुद्योगी लोकांचा आखाडा तेथें जमत असतो. तसेच पूर्वीचे देवाचे कारभारी हरिसा रामासा हेही 'मारजवंतकू जक्कल नहीं' याप्रमाणें नादीं लागले आहेत. बुवाजनींही असा करार केला आहे कीं, पुन्हा काम माझे अनुष्ठानाचे सामर्थ्यानें तुह्माकडे होईल. मग आतां काय जे होईल तें आपणास लिहून कळवीन. विस्तार झाला सबब लेखणी बंद ठेवितो. ता०१२ माहे जानेवारी सन १८७४ इसवी.

आपला सेवक
व.

---

## सासऱ्याचें घरीं रहाण्याचा प्रकार.

रा० रा० व० स० कर्ते यांसः—

वि० वि० खालीं लिहिलेल्या चार ओळींस जागा मिळून येत्या अंकीं प्रसिद्ध कराल अशी आशा आहे. एडिटरराव प्रथम मी तुह्माला माझे रहाण्याचें ठिकाण सांगतों. मी पुण्याजवळ एक लहानसें खेडें आहे तेथें रहातो. माझे घरीं दोन भाऊ आहेत ते मजपेक्षां वडील असून अद्याप त्यांचीं लग्नें झालीं नाहींत कारण, माझा बाप फारच गरिब आहे. माझे लग्न माझे नशिबानें झालें. माझे वडील भावाचीं अद्याप पावतों लग्नें झालीं नाहींत. ह्मणून, मला फार लाज वाटते. परंतु काय करूं? बापाचे गरिबीमुळें कांहींच इलाज चालत नाहीं. असो. माझे बापानें मी घरीं असता मला असें सांगितलें कीं तुझा सासरा मोठा मातबर आहे यानकरितां तूं त्याचे घरीं इंग्लिश शिकण्याकरितां रहा ह्मणजे तुझा अभ्यास चांगला चालून तुला रोजचे रोज मिष्टान्नही खावयास मिळेल. माझा सासरा उमरावती येथें रेल्वे स्टेशनाजवळ रहातो मग मी बापानें सांगितल्याप्रमाणें सासऱ्याचे घरीं आलों तों त्यांचे घरीं मनुष्यें फार असल्या कारणानें सर्वजण ज्वारीच खातात व जेव्हां मी जेवावयास बसतो तेव्हां जी दररोजची ज्वारीची भाकर ती माझ कपाळची जात नाहीं. ती दररोज पुढें येतेच. असो. घरांत माझा कोणीच मान राखीत नाहीं, माझी सासूही मला अगदीं विचारित नाहीं पण बायकोनें काहीं तरी म्हणावें परंतु तीही तशीच ती मला पाहून कपाळास आठ्या घालते व मजवर बोटें मोडून ह्मणते कीं कोठें मेला माझ नशिबांत नवरा होता कोण जाणे! ती स्वभावानें मोठी चपळ असून अंगानें फारच पुष्ट आहे तिला नुक्ताच ऋतू प्राप्त झाला यामुळें तिच्या अंगात जोर आला आहे. तिला असें वाटतें कीं, माझ्यांत कांहींच अर्थ नाहीं असें समजून ती माझे देखत दुसऱ्या पुरुषाशीं बोलते, व नानाप्रकारचीं वाईट भाषणें करिते. एडिटरराव खरेच जर पुसाल तर मलाही तिचें फार भय वाटतें कीं, न जाणो ती मला मारील एखादी, ह्मणून मी तिच्याशीं बोलतसुद्धां नाहीं. तिचे शरीर व अवयव पाहून माझे मनांत जी धडक भरली ती अद्यापपावेतो गेली नाहीं याप्रमाणें मी अगदीं त्रासलो आहे एडिटरराव तुह्मी मला पूर्ण आश्रय देऊन या गरिब दासाचा सांभाळ कराल अशा इच्छेनें आपणाकडे धांव घेतली आहे कळावें पत्रविस्ताराची माफी असावी हे विनंती.

उमरावती गुरुवार ता० २२
जानेवारी सन १८७४ इ०

एक गरिबीनें त्रासलेला
जामात.

---

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुध्द ८ शके १७९९.

## कापुस आमचा, व कापड विलायतेचं!

सांप्रतची स्थिति मोठी चमत्कारीक झाली आहे. जोंधळे आमचे घरीं आहेत. व त्यांच्या लाह्या आह्मास करतां येत होत्या व अजूनही येतात परंतु आह्मास भडभुंजे लोकांच्या दुकानांनीं आळशी करून सोडिलें. तेणेंकरून खाण्याजोग्या लाह्या आह्मी तयार करित होतो किंवा नव्हतो याचीही आह्मास आतां भ्रांती पडली आहे. बरें तोही भडभुंजे सजातीय गावातल्या गावांत असता तरी काहीं बरें होतें पण तसें नाहीं. तो परजातीय असून शेंकडो कोसांपलीकडचा रहाणारा आहे. व त्याला सर्व ओढा त्याच्या देशाचा आहे. तेव्हां अशाच्या हातीं आपलें मुख्य धान्य जोंधळे केवळ भाजण्याच्या विलायती भट्टीकरितां द्यावें व त्यापासून जसा आपला मुद्दलांत तोटा करून घ्यावा तशी स्थिति सांप्रत आपल्या देशांतील कापसाची झाली आहे. लाखो खंडी कापुस हिंदुस्थानांत पिकतो व तो तीन हजार कोस विलायतेस जाऊन तेथल्या मागावर त्याचीं वस्त्रें तयार होऊन आह्माकरितां इकडे येतात. यात आपला अतिशय तोटा होतो हें, आमच्या लोकांच्या मनात अजूनही चांगल्या रीतीनें ठसत नाहीं. खामगावास व उमरावतीस जाऊन पहावें. कापुस शेतांत तयार होऊन बाजारांत येऊं लागला कीं युरोपियन व्यापाऱ्यांनीं [illegible]. लक्षावधि रुपये खर्चून त्यांनीं वाफेच्या यंत्राच्या गिरण्या वऱ्हाडांत केल्या आहेत. व त्यातून कातितात काय? सूत काढित असतील? नाहीं. वस्त्रें विणीत असतील? नाहीं. कापुस विलायतेस नेण्यास थोड्या जागेत पुष्कळ रहावा ह्मणून त्याचे दाबून लहान गठ्ठे करितात. ते आम्ही नित्यशः डोळ्यानें पहातो पण आह्मास त्या विषयीं कांहीं वाईट वाटत नाहीं. या आमच्या षंढ मनाला काय करावें? मुलगी माहेरून सासरी जातांना तिचा असा गळा दाबला तर माहेरच्यांना बरें वाटेल काय? कधीं वाटणार नाहीं, पण आमच्या देशवासल्यांच्या पोटीं उत्पन्न झालेला हा आमचा कापूस हे युरोपियन व्यापारी असा दाबून व बांधून मुसकटयानें घेऊन जातात. बरें हा जो कापूस युरोपियन लोक आपले देशांत नेतात तो आह्मास पुरून उरतो तो घेऊन जातात, किंवा आह्माला त्यांचीं वस्त्रें तयार करितां येत नाहींत तीं ते परोपकार बुद्धीनें आह्मास शिकवावीं ह्मणून घेऊन जातात काय? छी! विष्णवेनमः अशे राम दास स्वामी ते कोठचे? ते पोटार्थी व्यापारी आपल्या पोळीवर तूप ओढण्याकरितां व हिंदुस्थान भिकारी करून आपला देश संपत्तिमान करावा एतदर्थ खपत असतात. याचा आपण कधीं विचार केला आहे काय? नाहीं. एक दिवसही नाहीं. आपणास थोडेसे रुपये देऊन आपला कापुस यांनीं खरेदी केला ह्मणजे पुढें त्याची स्थिती पहा! युरोपियन व्यापारी हजारो लोक जे इकडे खपतात त्यांचे मोठमोठाले पगार त्यावर चालतात, गिरण्याचे हजारो रुपयांचे खर्च त्यावर चालतात, रेल्वेचे भाडें हजारो रुपये त्यावर पडते. पुढें जहाजांत तो कापुस भरून विलायतेस जातो त्या जाहाजाचे लाखो रुपये भाडे त्यावर बसतें, व पुढें कापड विणणाऱ्या व्यापाऱ्याचें भाडें, मूळ भांडवलाचे व्याज, व नफा हीं सारीं त्या कापसावर बसतात. मग तें कापड पुन्हा हिंदुस्थानांत येण्याची तयारी! पुन्हा गठ्ठे बांधण्याचा, जहाजांचा, व विकणारांचा खर्च, भाडें, नफा, व पोटग्या या सर्व त्यावर बसून मग तें कापड आह्मी विकत घेऊन वापरावयाचें. अहाहा! हा किती आंतबट्ट्याचा धंदा आहे! हिंदुस्थानच्या प्रत्येक गाववाल्यानें असा अभिमान धरला पाहिजे कीं माझ्या गावीं पिकणारा कापुस माझ्याच धडोतीकरितां मला पाहिजे आहे. व गुजाऱ्या जोगें त्याचें वस्त्रप्रावर्ण मला करितां येतें असें असतां त्या माझ्या कापसाचे युरोपियन व्यापाऱ्यांकडून मी गठ्ठे कां दाबून घेऊं? तो आगगाडींतून कां पाठवूं? खाऱ्या पाण्यांतून तीन हजार कोस त्याची धिंड कां काढूं? त्यानें जातां येतां भाडें कां भरूं? विलायती यांत्रिक मागवाल्यांपासून मी बुचाडला कां जाऊं? व आपले देशबांधव लक्षावधि साळी, कोष्टी. कातकरी यांस मी उपाशी कां मारूं? एवढ्या पुरता अभिमान आतिशपूर्वक धरून लोक झटतील तर देशाची आबादी होऊन दारिद्र विच्छिन्न होईल. हिंदुस्थानचा कापुस असून त्याची हिंदुस्थानाकरितांच वस्त्रें मिळण्यास केवढा द्राविडी प्राणायाम हा होत आहे! व त्यावर परदेशानें लक्षावधि लोक कोट्यावधि रुपये हिंदुस्थानातून कसे घेऊन जात आहेत! हे आपणास धडधडीत दिसत असतां आपले डोळे उघडत नाहींत. ही कशी देखतभूल आहे हिचा सर्वांनीं विचार करावा.

आतां ही गोष्ट ज्यांच्या हातून होण्यासारखी आहे त्यांस व्यवहाराबाहेर देशाभिमान वगैरेची नजर नाहीं. व ज्यांस लोकहित व देशाचा कळवळा या विषयीं काहीं कळतें त्याच्या हातीं सदरील खटाटोप आवरण्याचीं साधनें नाहींत त्यामुळें दात आहेत त्यांस चणे नाहींत, व ज्यापाशीं चणे आहेत त्याला दात नाहींत अशी

स्थिति आपली आपल्यांत झाली आहे. व त्या मुळें ही अशी हेळसांड बहुत होत आहे. याजकरितां तिचा घोटाळा प्रथम नाहींसा करून दातांचें व चण्यांचें ऐक्य केलें पाहिजे. हा विचार पुढील अंकांत आह्मी थोडासा विस्तारानें सांगू आज वाचक कंटाळतील ह्मणून इतक्यावरच थांबतो.

## इंदुरचे होळकर सरकार.

श्रीमंत महाराज तुकोजीराव होळकर इंदुर संस्थानाचे राजे पुणे प्रांतीं जेजुरीस देवदर्शनाला गेले होते हें आमचे वाचकांस माहित आहेच. व होळकराचें राज्यही फार दूर नाहीं तरी या प्रसंगीं ते पुण्याकडे गेल्यानें व त्यांनीं जीं करावयास अवश्यक कामें तीं बहुतेक केल्यानें त्यांची या प्रांतीं मोठी चहा झाली आहे. व तिकडील वर्तमानपत्रें त्यांचें अतिशय वर्णन करीत आहेत व अशा प्रसंगीं होळकरांनीं स्तुत्य कृत्यें केलीं असतां त्यांचें वर्णन करणें देशहिताचे संबंधानें अवश्यकही आहे. कारण हिंदुस्थानांत स्वदेशीय राजे थोडेच राहिलेले आहेत व त्यांतही जे आहेत त्यांतू काळ वेळ प्रसंग जाणणारे अत्यल्पच आ[हेत]. ह्मणून जे कालमाना प्रमाणें वागून लो[कांत] मिसळतात त्यांचे लोकांनींही अलबत पवाडे गायले पाहिजेत. ग्वाल्हेरचे शिंदे सरकार दक्षिणेंत आले होते परंतु त्यांच्या समयानुसार सत्कृती कोठें वाचण्यांत आल्या नाहींत. बडोद्याचे गायकवाड सरकाराविषयीं तर बोलावयासच नको. पुढें मि० दादाभाई सारखे दिवाण झाल्यावर त्यांची चांगल्या संस्थानांत गणना होईल. अशी आशा आहे. असा भोंवताली प्रकार आहे ह्मणून होळकरांनीं आह्मा लोकांच्या शाळेकडे थोडेंच लक्ष दिलें तरी तें आह्मांस शतपट वाटतें हें केवळ गैरवाजवी आहे असें नाहीं. अस्तु.

श्री० तुकोजीराव होळकर पुण्यास गेल्यावर पुण्याच्या लोकांनीं त्यांच्या आदरार्थ सभा केली तींत ते गेले आणि लोकांच्या मानपत्रावर समयोचित असें त्यांणीं उत्तर दिलें तें गेल्या अंकांत आमचे वाचकांनीं वाचलेंच असेल. जे लोक होळकरांच्या भेटीस गेले त्यांशीं आदरपूर्वक त्यांणीं भाषणें केलीं. त्यांत आपल्या वेगवेगळ्या भाषाज्ञानाचा, विद्येचा, चातुर्याचा व बोधकपणाचा गुण दाखविला. डेक्कन कालेज, इंजिनियरिंग कालेज, बाबा गोखल्याचें इंग्लिश स्कूल वगैरे त्यांनीं स्वतः पाहिलें. मुलांस इंग्लिश भाषेंत प्रश्न केले व त्यांचीं उत्तरें ऐकून समाधान पावले. दोन कालेजांमध्ये आपल्या नावाच्या दोन दोन स्कालरशिप्स त्यांनीं करून दिल्या. सार्वजनिक सभेपासून महत्कार्यें होणारीं आहेत ह्मणून तिला ४००० रुपये बक्षिस दिले. इब्राहिमखान गारद्याचे वंशज गरीबींत आहेत त्यांचे मुलास विद्याभ्यासा करितां २००० रुपये दिले. कोणी कविता करून आणिली, कोणी कांहीं माहितीचे लेख लिहून आणिले, त्यांनां शालजोड्या वगैरे दिल्या नंतर जिल्ह्यांतील एका गरीब विद्यार्थ्याला विद्याभ्यासाकरितां १२ रुपये दरमहा करून दिला. माधुकरी विद्यार्थ्यांना कांहीं बक्षीस दिलें. दस्तुर नसरवानजी जामासजी पारशी लोकांचे धर्माध्यक्ष यांस हजार बाराशे रुपयांचें पोशाख दिले. खडकवासल्याचा बंधारा पाहिला, डेविड सासूनचा बगला पाहिला. व पुणे शहरांत गुप्त रितीने कित्येक वेळां जाऊन सारें शहर बारकाव्यानें पाहिलें. त्यांनां शहरांत मेजवान्याचे थाटही पुष्कळ झाले. पंत सचीव, गणपुलीकर फडणीस, गायकवाडीण बाई, दस्तुरजी पारशी, चंद्रचूड, पुरंदरे, मेहेंदळे, बाबा महाराज इत्यादि गृहस्थाकडे होळकर मेजवान्यांस गेले होते. व त्या त्या गृहस्थांनांही त्यांनीं आपल्या डेऱ्यांत बोलावून मेजवान्या केल्या. मध्यंतरीं अक्कलकोटास तेथील स्वामीचे दर्शनास सडे स्वारीने गेले होते. पुण्यास बेलबाग, तुळशीबाग, पर्वती हीं देवस्थानें त्यांनीं पाहिलीं त्यांकरितां ते पोषाख तयार करवित आहेत. भिक्षुक, शास्त्री, पुराणीक यांस पुतळ्या, शालजोड्या वगैरे दणग्या दिल्या याप्रमाणें होळकरांनीं दक्षिण प्रांतीं जाऊन मोठी स्तुत्य कृत्यें करण्याचे द्वारें आपली कीर्ती अखंड केली हें ऐकून आह्मांस फार संतोष वाटतो. आतां ते मुंबईस गेले आहेत. इतर राजेलोकांनीं यांचें उदाहरण घ्यावयाजोगें आहे. व तें घेतील तर त्यापासून आमच्या देशाचें खचित कल्याण होईल".

## वऱ्हाड

क्या० मेंजिस साहेब रजिष्टर खात्याचे इन्स्पेक्टर जनरल फेब्रुवारीचे दुसरे तारखेस येथें येऊन वाशिमाकडे जाणार असें समजतें.

—000—

डा० पीट साहेब येथील आपाथिकरी यांस वऱ्हाडात व्याक्सिनेशन (देवी) खात्याचे आसिस्टंट सुपरिंटेंडेंट नेमिले असें कळतें.

—000—

येथून २२ लक्ष रुपयांचा खजिना या आठवड्यांत स्पेशियल ट्रेनींतून मुंबईस रवाना झाला. त्याबरोबर मि० दस्तुर नहिमनजी साहेब आसिस्टंट कमिशनर, मि० बोमिसन साहेब पोलिस सुपरिंटेंडेंट, व पोलिस इन्स्पेक्टर वगैरे शिपाई प्याद्यासहित बंदोबस्तास गेले आहेत.

—000—

डिसेंबर अखेरच्या आठवड्यांत खामगाव व उमरावती रेलवेचें उत्पन्न मनुष्यांचें १०४ रुपये व मालाचें ३६८ रुपये झालें.

—000—

अकोल्याच्या लायब्ररीची स्थिति या महिन्यापासून बरी सुधारली आहे हें कळविण्यास आह्मांस संतोष वाटतो. रा. रा. विष्णू सखाराम बापट डिपुटी कमिशनरचे क्लार्क आफ धी कोर्ट यानीं मनावर घेतलें. व रा. रा. माधवराव हरि कमिशनर साहेबाचे क्लार्क आफ धि कोर्ट व रा. रा. गोपाळ महादेव भिडे स्मालकाज कोर्टाचे क्लार्क आफ धि कोर्ट यांच्या संमतानें जनरल सभा भरवूनवगैरे खटपट केली. तेणेंकरून सुमार ७५ वर्गणीदार लायब्ररीस झाले आहेत. व यांत सुमार ६० हून अधिक नवीन आहेत व तेही कचेऱ्याकडील लोक ह्मणजे वकील, राइटर, कारकून वगैरे त्यांचे अनुषंगी असेच आहेत. त्यावरून हे गृहस्थ येथें आहेत तोपर्यंत निदान त्यांनीं मन तिजवरून काढिलें नाहीं तोपर्यंत तरी लायब्ररीची सुस्थिति राहण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. डेली वर्तमानपत्रें आल्यापासून दोन दिवस पर्यंत टेबलावरून हालत नाहींत. व मराठी वर्तमानपत्र लायब्ररीच्या खर्चानें कित्येक घेऊं लागले आहेत. हे बरें आहे परंतु सध्या जेथें लायब्ररी ती जागा फार संकुचित व गैरसोयीची आहे. याजकरितां दुसरी प्रशस्त व सोयवार जागा लवकर पाहिली पाहिजे. शेट गंगाधर जोरावरमल यांनीं पुस्तकगृह देण्याचें जें औदार्य केलें होतें तें अगदिच शिथिल झालें आहे त्याला पुन्हा चेतन येईल तर पाहावें ! हें परोकाराचें काम आहे व आपलें वचन गेलें आहे तर शेटजीनींही डोळे झाकून बसू नये हें बरें आहे असें आह्मास वाटतें.

तालुक्याचा जो असिस्टंट कमिशनर तो म्युनसिपल कमिटीचा व्हाइस प्रेसिडेंट असतो. त्याप्रमाणें क्या० बुलक साहेब येथील म्युनसि. चे व्हाइस प्रेसिडेंट होत म त्यास तालुक्यांत फिरावयास जावें लागतें आणि मि. नौलीस साहेब यांची स्मालकाज जडजाचे जागेवर नेमणूक झाल्यानें ते येथें स्थाईक झाले आहेत ह्मणून त्यांस अकोला म्युनि० चे व्हाइस प्रेसिडेंट नेमण्याविषयीं चा ठराव झाला व ते त्याप्रमाणें काम पाहू लागले.

## वर्तमानसार

दिवाणी दाव्याच्या दरजातीवरून कोणा मनुष्याला रविवारीं पकडलें तर तें इंग्लिश ला प्रमाणें गैरकायदा नाहीं असें मद्रास हायकोर्टाच्या जडजांनीं ठरविलें आहे.

महाराणी साहेबांचे वडील पुत्र. प्रिन्स आफ वेल्स आपल्या पत्नीसहवर्तमान रशिया देशांत सेटपिटर्सबुर्ग येथें गेले आहेत.

खानदेशांतील एरंडोलचे सब जडज रा. सा. नारायण बाळकृष्ण पटवर्धन तीन महिन्यांचे रजेवर गेले आहेत. त्यांचे जागेवर एल एल बीचे परिक्षेत नवीन पास झालेले रा. रा. चिंतामण नारायण भट बी. ए यांस आक्टिंग नेमिलें. हे आमच्या वऱ्हाडांत रा. रा. पुरुषोत्तमराव एकरूट्टा असिस्टंट कमिशनर आहेत त्यांचे बंधू होत.

पुण जिल्ह्यांतील खेड तालुक्यांत एका गावीं येका मारवाड्यावर कांहीं लोक तुटून पडले व त्याचें नाक, कान, व तोंडाच्या वरचा ओठ त्यांनीं कापून नेला असें कळतें. मागें रायोजी भांग्र्याचें बंड उठलें होतें तेव्हां त्याचे लोक असेच मारवाड्यांचे राशीस लागले होते व त्यांची नाकें व कान कापून ते नेत असत.

बडोद्याचे गायकवाड सरकारांनीं मि० दादाभाई नवरोजी यांस दिवाण नेमण्याविषयीं आपली संमति असावी ह्मणून मुंबईसरकारास पत्र लिहिलें होतें त्याचा जबाब त्यांकडून त्यांस असा मिळाला कीं तुमचे बाबदींत कमिशन नेमिलें होतें त्याचा परिणाम समजल्यावर दिवाणाचे नेमणुकीविषयीं विचार होईल. तथापि आपले दरबारची सुधारणा होईल अशी कांहीं तजवीज योजण्याविषयीं आपणास आह्मी शिफारस करितो.

मि० जमशेटजी आर्देसर दलाल एम. ए. एल एल बी नडियादच्या हायस्कुलाचे हेड मास्तर यांस अमदाबाद जिल्ह्यांत बोरसद येथें अक. सबार्डिनेट जडज नेमिलें.

पुणें जिल्ह्यांत भोरे गावचे नवाब अलिमर्दान खान यांस होळकर सरकारांनीं त्यांच्या मुलाच्या विद्याभ्यासाकरितां २००० रुपये दिले. पानपत येथें अहमद शहा अबदालीवर पेशव्यांची फौज गेली होती त्या वेळा इब्राहिमखान गारदा ह्मणून सरदार होते हें इतिहास वाचणारांस माहित असेल. त्याचे अलिमर्दान खान हे वंशज आहेत. आणि सदहू गार्दी व होळकरई सरकारचे पूर्वज त्या लढाईंत अति ऐक्यानें होते हेंही वाचणारांस माहित असेल.

दक्षिण हिंदुस्थानांतील अर्काटचे नबाब या आठवड्यांत मरण पावले. त्यांचें वय ७२ वर्षांचें होतें. सरकारांतून त्यांस नेमणूक होती. व कर्ज फेडण्याकरितां २७ लक्ष रुपये त्यास दिले होते.

आमदाबादपासून पुढें रेलवे बांधण्यास परवानगी मिळण्याविषयीं बडोदारेलवेचा रपोट, मुंबईसरकारच्या शिफारशीसह, हिंदुस्थान सरकाराकडे गेला आहे.

मशीदबंदरावर ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेलवे नवें स्टेशन बांधणार आहे.

आज पर्यंत २२ वर्षांचे आंतलि नौकरी पेन्शनांत धरीत नव्हते ती पेन्शनांत धरण्यास हरकत नाहीं असा इंडिया सरकारानें नवीन ठराव केल्याचें कळतें.

पटियाळच्या महाराजांनीं बंगाल्यांतील दुष्काळ पीडितांच्या दुःखनिवारणार्थ १०००० रुपये दिले.

उत्तर हिंदुस्थानांत थंडी अति पडत आहे इतकी कीं लखनौस कांहीं मनुष्यें थंडीनें मरण पावलीं. ने. ओ.

मुंबईचे माजी म्युनिसिपाल कमिशनर मि. क्राफर्ड हे हल्लीं कलकत्त्यांत आहेत, व यांची आसाम येथें नेमणूक झाली असें कळतें.

वर्ध्यापासून हिंगणघाटापर्यंत जी सरकारी आगगाडीची सडक झाली आहे ती आतां लवकरच सुरू होईल. येणेंकरून हिंगणघाटांहून जो कापूस येतो तो मुंबईस येण्याची फार चांगली सोय होईल. व वर्धा शहरापासून २ मैलावर एक स्टेशन बांधलें आहे. वर्धा व हिंगणघाट यांच्या दरम्यान सोनेगाव एथेंही एक स्टेशन व्हावयाचें आहे. या रेलवेचें काम जी. आय. पी. रेलवेच्या मार्फत चालेल. वरील सडक चांदापर्यंत नेण्याचे काम चाललें आहे. ही पुरी झाली ह्मणजे चांदा व आसपासच्या प्रदेशांतून कोळसा बराच येऊ लागेल.

ना. मि. जे. केवाल हे येत्या एप्रिल किंवा मे महिन्यांत येणार असें समजतें हे आले ह्मणजे ना. मि. पिन्हे हे पुनः आपल्या पुण्याच्या सेशनजजाच्या जागेवर जातील. सु. प.

— मुंबई येथें नवीन सुताचे व कापडाचे कारखाने काढण्या करितां दोन कंपन्या लवकरच होणार आहेत-

— गोरा खोटे कागद करणारा — वाटून नावाचा एक युरोपियन ग्रे-ई-पे-रे-कंपनीकडे मागें क्लार्क होता त्यानें कांहीं खोटे कागद बनवून ३०००रु० घेतले- त्यास गेल्या जानेवारीच्या मागच्या शनवारी मुंबईस धरलें- त्याच्या घरच्या झाड्यांत आणखी कांहीं खोटे कागद सापडले- आतां ते गृहस्थ तुरुंगांत अटकेंत आहेत-

येथून विलायतेस आगगाडी—इंग्लंड व हिंदुस्थान आगगाडीच्या रस्त्यानें जोडण्याचा विचार चालला आहे. त्याची विचारपूस व तपास करून माहिती वगैरे मिळविण्याकरितां युरोपांतील प्रसिद्ध लेसेप्स साहे

व यांचे चिरंजीव यादेशास आले आहेत. त्यांच्या मनांत पेशावर पासून आगगाडीचा रस्ता करून मध्य एशियांतून रशियन सरकारच्या मुलखांतून व इतर देशांतून इंग्लंडापर्यंत न्यावा असा बेत आहे. व्यापार संबंधानें हा रस्ता हितावह होईल व बिलायतचा रस्ता नऊ दहा दिवसांचा होईल परंतु राजकीयसंबंधानें ह्मणजे रशियन व इंग्लिश या सरकारांमध्ये तंटा उत्पन्न झाल्यास या रस्त्यापासून हिंदुस्थानास व इंग्रजसरकारास उपयोग न होतां कदाचित रशियन सरकारास हिंदुस्थानावर हल्ला करण्यास सुलभ मार्ग होईल अशी भीति आहे. आतां काय विचार ठरेल तो पाहावा बिचाऱ्या हिंदुस्थानास स्वतांचें हिताहित पाहण्याचा अधिकारच नाहीं; तेव्हां इंग्लंडाच्या हितसंबंधानें काय तो निकाल होईल.

इं. प्र.

## वऱ्हाडचें वर्णन.

उमरखेड— हा गाव वाशिम जिल्ह्यात पुसद तालुक्यात आहे. या विषयीं विशेष इतिहास माहित नाहीं. पण हा गाव मोठा असून ब्राह्मण वस्ती यांत पुष्कळ आहे. कोकणस्थांचीं घरें यांत बरीच आहेत. सवाई माधवराव पेशवे यांचे कुटुंबास निजाम सरकारानें बहीण मानून चोळी पातळा बद्दल हा गाव दिला होता असें ऐकण्यांत आहे. शंभर वर्षांपूर्वीं सर्व उमरखेड परगणा पेशव्याकडे होता. शेवटचे बाजीराव पेशवे पुणें सोडून ब्रह्मवर्ताकडे गेले तेव्हां ते जातांना येथें कांहीं दिवस राहिले होते. तसेंच सन १८१९ मध्ये निजाम सरकारच्या कांटींजेंट फौजेची व हटकरांची एक लढायी या गावीं झाली होती. उमरखेडची खानेसुमारी ५७५३ आहे. हिंदु लोकांचे सांगण्यावरून औदुंबर क्षेत्र या शब्दाचा अपभ्रंश होऊन उमरखेड हें नाव पडलें आहे असें कळतें. व मुसलमान लोक ह्मणतात आमच्या उमर पादशहाच्या नावावरून हें या गावाचें नाव पडलें आहे. येथें गावा जवळ एक मोठा तलाव होता तो नादुरुस्त होऊन पडला आहे. साधु महाराज ह्मणून एक पुरुष होऊन गेला त्याचें दहन झाल्या ठिकाणीं एक टुमदार देवालय बांधिलेलें आहे. व गोमुख स्वामी नावाच्या एका महा पुरुषाचा येथें मठ आहे. हा गोमुख स्वामी चिपण भट्टाचा चेला आहे. तो एका घोड्यावर बसून गावोगाव भिक्षेस जातो. व जें मिळेल तें सर्व उमरखेडास पाठवितो. त्यांतून त्याचे कारभारी गरिबास धर्म करितात व दुसऱ्या चांगल्या कामीं खर्च करितात. लोकवार्ता अशी आहे कीं, गोमुख स्वामीची भिक्षा वर्षास सरासरी दोन लाखाची होते. यानें उमरखेडास देवालय बांधिलें आहे. मळिगावास बांधिलें आहे. व मोगलाईत त्याचीं कित्येक देवालयें आहेत. तसेंच त्यानें विहिरी जागोजाग पुष्कळ खणल्या व बांधल्या आहेत. उमरखेडास त्याचे मठांत कोणत्याही जातीचा अतीत अभ्यागत गेला तर त्यास अन्न मिळतें. यांच्या मठांत धान्य दळून पीठ करण्याचे कामाकरितां एक मोठी पवनचक्की केली आहे. पुष्कळ आंबजाबचे लोक यांच्या मठांत नवस फेडावयाकरितां येत असतात. मे० लायल साहेब कमिशनर यांनीं लिहिलें आहे कीं एका आठवड्यांत दररोज पाच पाच हजार लोक यांचे मठांत येऊन जेवत होते असें आह्मी पाहिलें आहे. गोमुख स्वामी स्वतां अगदी साधेपणानें वागतात व अन्नोदकाला स्पर्श करीत नाहींत. असें ह्मणतात कीं ते दिवसांतून एक वेळा खातात. तें असें:—गाईचे शेणानें सारविलेल्या जमिनीवर त्यांचे अन्नाचा एक गोळा करून ठेवितात मध्यें खोबळा करून त्यांत पाणी भरतात. मग स्वामी तेथें येऊन ओणवे होतात व अन्नाला हस्तस्पर्श न करितां तें भक्षण करितात.

उमरखेड हें परगण्याचें मुख्य गाव आहे. येथें पोलीस स्टेशन आहे, दवाखाना आहे, व सरकारी शाळा आहे.

---

रिसोड — हेंही वाशिम जिल्ह्यांतील एक परगण्याचें गाव आहे. याचें मूळ नाव ऋषिवटक्षेत्र ह्मणजे सर्व ऋषि एकत्र जमण्याचें स्थान होतें असें ह्मणतात. यांत लोकसंख्या ४७१६ आहे. यांत व्यापार बराच चालतो. पूर्वीं पेशव्यांना व भोसल्यांना हा गाव करभार देत होता. नंतर भोसल्यांना आणि निजमांना देऊं लागला होता. नंतर निजाम सरकारचे एकट्याचे सत्तेंत हा गाव गेला. या गावाला तळें बरेंच मोठें आहे. या गावाजवळ सन १८५८ त चिंचव्याची लढायी झाली तशीच सवाशे वर्षांपूर्वींही येथें एक मोठी लढायी झाली होती. त्या वेळीं पिराजी पवार ह्मणून येथें मुख्य होता त्याणे वाशिमच्या एका ब्राह्मणाची सुंदर स्त्री जबरीनें आपले घरांत घातली; तेव्हां त्या ब्राह्मणानें निजाम अलीपाशीं दाद मागितली. त्यांनीं लागलीच पिराजीवर फौज पाठविली व त्या फौजेनें येऊन पिराजीचा पराभव केला व ब्राह्मणाची बायको ब्राह्मणाचे स्वाधिन केली.

सिरपूर— हाही एक परगण्याचा गाव आहे. येथें जैन व भाटे लोकांचे दैवत अंतरिक्ष पारसनाथ यांचें मोठें देवालय आहे. हिंदु लोकांनां जसें काशि क्षेत्र तसें जैन मताचे लोकांनां सिरपूर हें पवित्र क्षेत्र आहे. येथील पारसनाथाच्या मूर्तीविषयीं दंतकथा आहे ती अशी:— इलिचपूरच्या राजाचा इकडे अंमल होता त्या वेळीं एलुक नांवें राजा सिरपुराजवळ शिकारीस आला असतां नदीच्या कांठीं त्याला ही मूर्ती सापडली. त्या वेळेस त्यानें त्या देवाची प्रार्थना केली कीं, आपण आमच्या इलिचपुरास चलावें तेथें आपलें सुंदर देवालय बांधितो. तेव्हां असा कौल आला कीं राजा पाठिमागे न पाहतां जेथपर्यंत जाईल तेथपर्यंत मूर्ती त्याचे मागोमाग येईल. राजास त्या गोष्टीचा भरवसा वाटून तो निघाला परंतु सिरपूर गावाजवळ गेल्यावर त्याचा निश्चय डळमळला. आणि खरोखर मूर्ती पाठीमागें येते आहे किंवा नाहीं याचा अनुभव घेण्याकरितां त्यानें मागें पाहिलें त्याबरोबर तेथेंच मूर्ती स्थिर झाली. व तेव्हांपासून बहुत काळमर्यादे ती मूर्ती जमिनीपासून कसलाही तिला आश्रय नसून अंतरिक्ष टांगल्या सारखी स्थीर राहिलेली आहे. व त्या मुळेंच या देवास अंतरिक्ष पारसनाथ हें नाव पडलें असावें असें वाटतें. तेव्हांपासून येथें ल्हानसे पण जुनें देवालय आहे. याचा कळस क्षितिजसमसूत्र असून त्याचे खोदींव काम फार चांगलें आहे.

सिरपुरची खानेसुमारी ३५८५ आहे. तेथें सरकारी शाळा आहे व पोलिस स्टेशन आहे.

---

## कायद्यासंबंधी माहिती.

दिवाणी वहिवाटी प्रकर्णी.

जनरल नं. २७८९ सन १८६७

डिपार्टमेंटल नंबर २२७

ज्या असिस्टंट कमिशनरांनां फुलपावर माजिस्त्रेटचा अधिकार आहे. त्यांच्या वरील दिवाणी मुकदम्याचीं अपिलें डिपुटी कमिशनराकडे न होतां कमिशनराकडे होत जावींत.

---

सर्क्युलर नंबर १३ सन १८६८।६९

(सि० प्रो०)

कमिशनर साहेब कोर्टांच्या तपासणी करितां जिल्ह्यांत फिरत असतां त्यांच्या आढळण्यांत असें आलें कीं हुकूमनामे मिळविणारे मनुष्य हुकूमनामे अमलांत आणण्याकरितां दरखास्ती देतात तेव्हां प्रत्येक दरखास्ती बरोबर त्यांत हुकूमनाम्याची नकल जोडून द्यावी लागते असी बहुत ठिकाणीं वहिवाट आढळली व कित्येक ठिकाणीं तर ती कायद्या दाखल होऊन गेली आहे. व त्या नकलेचा खर्च तीं कोर्टें आवश्यक खर्च ह्मणून मजरा देववितात.

२. ल्हान दाव्या संबंधी हुकूमनाम्याच्या अमलबारींत असे खर्च सामील झाल्यानें कधीं कधीं त्याचा मोठा बोजा होतो.

३. याजकरितां सिविल कोर्टांना कमिशनर साहेब असें फर्मावितात कीं दिवाणी कामें चालविण्याचे वहिवाटीचे कायद्याप्रमाणें हुकूमनाम्याची नकल अमलबारीचे दरखास्ती सोबत देणें अवश्यक नाहीं. याजकरितां या पुढें कोणीं इसमानीं हुकूमनाम्याचे नकलेस खर्च केला असेल तर तो सन १८५९ चा आक्ट ८ कलम १८८ प्रमाणें "दाव्याच्या बाबदींत आणि हुकूमनामा अमलांत आणण्याच्या बाबदींत वाजवीनें अवश्य करावयाचा खर्च" याजमध्यें तो येतो किंवा नाहीं या विषयीं विचार करून तो कोर्ट खर्चांत दाखल करावा अथवा दाखल करवूं नये. व या प्रमाणें वहिवाट शुरू झाली ह्मणजे या बाबदींत ज्या कित्येक गैर समजुती आहेत त्या नाहींशा होतील असें कमिशनर साहेबांचें मत आहे. येणेंकरून हुकूमनाम्याच्या नकला लोक कमी घेऊं लागतील व तेणें करून त्यांचा बराच खर्च वांचेल. तारिख १७ एप्रिल १८६९

---

नंबर ६ ग सन १८६४.

१, कमिशनर साहेबांपुढें नुकताच एक मुकदमा आला आहे त्यांत असें आढळलें कीं, कोर्टानें एका पेढीवाल्याला त्या मुकदम्यांत पंच (आर्बिट्रेटर) नेमिले होते. ही वहिवाट गैरशिस्त आहे. पंच नेमणें ते पक्षकारांनीं आपण होऊन नेमिले पाहिजेत. तारिख २१ माहे नोवेंबर सन १८६४.

---

### जाहिरनामा.

हुकुमनाम्यावरून जप्त झालेला जंगम माल विकण्याविषयींचे नियम.

१. जप्त झालेली मालमिळकत लिलावानें विकण्याच्या पूर्वीं १५ दिवस कायद्यांत सांगितल्याप्रमाणे स्पष्ट नोटिस सर्वकाळ दिली पाहिजे. ज्या ठिकाणीं विक्री व्हावयाची त्या ठिकाणीं या नोटिशीची एक प्रत डकवावी. व कचेरीमध्येंही एक डकवावी.

२. कोर्टामध्यें विक्री करित जाऊं नये. जिल्हाकोर्टाचे हुकुमानें माल जप्त झाला असेल तर जिल्ह्याच्या नाझरानें किंवा अमिनानें ज्या तालुक्यांत माल असेल त्या तालुक्याचे सदर स्टेशनांत त्याची विक्री करावी. स्मालकाज कोर्टाच्या अथवा दुसऱ्या कनिष्ट कोर्टाच्या हुकुमावरून जप्ती असेल तर त्या कोर्टाच्या नाजरानीं त्या गावच्या बाजारांत विक्री करावी.

३. लिलावाविषयीं अशी व्यवस्था ठेवावी कीं, बाजार भरण्याचे दिवस असतील तेच लिलावाला दिवस नेमित जावे. नोटिशीमध्यें लिलाव ज्या दिवशीं व्हावयाचा तोच दिवस लिहिलेला असावा. आणि जर कारणपरत्वें कांहीं अनिवार हरकतीमुळें नेमल्या दिवशीं लिलाव झाला नाहीं तर दुसरा बाजार भरण्याच्या दिवशीं लिलावाची तारिख मुक्रर करून दुसरी नोटिस लावावी व तींतही आठ दिवसांहून कमी मुदत नसावी.

४. लिलावाचा वेळ दिवसा बारावर एक वाजल्यापासून तीन वाजतपर्यंत असावा. कारण तेव्हां बाजारांत विशेष दाटी असते. लिलाव करण्याचें स्थळ पालटीत जाऊं नये.

५. कापसाचे हंगामाचे दिवसांत त्या त्या गावीं कापसाचा तग असेल तर त्या ठिकाणीं जप्तीमालापैकीं निर्मळ कापूस व सरकीचा कापूस निरनिराळा नेऊन विकावा.

६. जनावरें वगैरे जप्तींत असतील तर त्यांच्या चांगल्या संरक्षणाची जबाबदारी नाजरावर आहे. जरी त्यांनीं ती दुसऱ्या कोणावर सोंपविली असली तरी त्यांची जबाबदारी कमी होणार नाहीं.

---

सर्क्युलर ५२ सन १८६६

पेशजी सर्क्युलर नंबर ८६ तारिख १० सपटंबर सन १८६४ इसवीचें या सोबत पंजाबच्या बादारीचे रूळ वऱ्हाडांत पाठविले; परंतु ते वऱ्हाडास लागू करावयाचे किंवा नाहीं या विषयीं संशय उत्पन्न झाल्याचें समजल्यावरून सर्वांस कळविण्यांत येते कीं हिंदुस्थान सरकारचें पत्र नंबर ७२ तारिख ३१ माहे मे सन १८६४ इसवीचे यांत सदर्हू रूळ वऱ्हाड प्रांतास लागू केले ह्मणून ठराव झाला आहे.

तारिख ६ आगष्ट १८६६

---

हें पत्र अकोला येथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.